# माणूस

शनिवार । १७ सप्टेंबर १९७७ । ७५ पैसे

## श्री. मधू लिमये व मी एकमेकांना व साथी-मित्रांना खूपदा बजावीत असू की ' डोंट प्रोव्होक द लेडी ' ( बाईंना भडकवू नका ! )

## अपक्ष खासदार श्री. पु. ग. मावळणकर यांची मुलाखत !

पृष्ठ.... ४ वर

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक सोळावा**

**१७ सप्टेंबर १९७७**

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


# सप्रेम नमस्कार

## गांधीवंदन (ना)

¤ पुणे नभोवाणीवर दर शुक्रवारी सकाळच्या बातम्या सांगून झाल्यावर 'गांधी-वंदना' कार्यक्रम सादर केला जातो. राष्ट्रपिता पूज्य महात्मा गाधी हे ज्या प्रार्थना पूर्वी म्हणत असत त्याचे गायन या वेळेस होते. पूर्वी गांधीवंदन या नावाने व आता गांधीवंदना या नावाने तो सादर केला जातो. अलीकडेच या प्रार्थनेनतर गाधीजीचे काही विचार सांगण्याची प्रथा सुरू केली आहे ती निश्चितच स्तुत्य आहे. महात्मा गाधीनी हिंदुस्थानच्या राजकारणात तब्बल सत्तावीस वर्षे प्रत्यक्ष कार्य केले. सन १९३४ मध्ये जरी त्यांनी कांग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजिनामा दिला असला तरी हिंदुस्थानच्या राजकारणात ३१ जानेवारी १९४८ पर्यंत त्यांनी विधायक कार्य केले व कांग्रेसने त्यांचेच विचार कृतीत आणल्या कारणाने एक तऱ्हेने त्यानी अप्रत्यक्षरीत्या कांग्रेसपक्षाचेच कार्य केले. असहकार, खिलाफत चळवळ, सायमन कमिशन, रौलॅट बिल, जालियनवाला बाग प्रकरण, स्वदेशी, खादी, दारुबंदी, गरीब-श्रीमंत, विद्यार्थी, अहिंसा, सत्य, हरिजन, कारखानदार, स्वातंत्र्य इत्यादी शेकडो विषयांवर त्यांनी या देशास आपल्या विचारांची बहुमोल शिकवण दिली व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्याचे अतुलनीय असे साहाय्य झाले. गांधीच्या जीवनावर बऱ्याच जणानी चरित्रेही लिहिली आहेत बापूजीच्या निधनालाही आता २९–३० वर्षे झाली आहेत एवढ्या प्रचंड काळात आकाशवाणीने बापूजीच्या विचाराची जेमतेम ४–५ च रेकॉडिग केली आहेत ही अप्रशस्त बाब आहे. कामगार–मालक-सबंध कसे असावेत, गोरक्षण, दारुबंदी व पिकेटिंग, जनरल करिअप्पांना सांगितलेले अहिंसेबाबतचे विचार इत्यादी ४–५ विषयच आलटूनपालटून सध्या ऐकवण्यात येतात. उलट दर शुक्रवारी बापूजीचे नवे नवे विचार प्रस्तृत केले असते तरीसुद्धा त्यातील नाविन्य टिकले असते व खूप शिकवण दिली गेली असती. त्याचा चालू समाज-जीवनात खूपच परिणाम झाला असता. अर्थात आकाशवाणीने त्यांचे जास्तीत जास्त विचार प्रसृत केले नाहीत म्हणून म. गांधीचे महत्त्व बिलकूल कमी होत नाही. आकाशवाणीचा दर शुक्रवारचा गाधीवदना हा कार्यक्रम केवळ एक औपचारिकच झाला आहे असे म्हटल्याशिवाय राहवत नाही.

दि. १७–८–१९७७ **वैद्य श्री. आ. मांडके**

पुणे २४–८–७७

¤ पिंपरी पेनिसिलीन फॅक्टरीसबधी 'संवधिता'च्या लेखासबधी माणूस २०–८ ह्यातील माहिती आणि भाष्य अपूर्ण आहे.

पूर्वीच्या व्यवस्थापकाबद्दलची टिका ठीक आहे; पण ही पायवाट पूर्वीच्या पाच व्यवस्थापकानी घालून दिलेली आहे. १९५७ सालीही कारखान्याची अवस्था अशीच झाली होती तेव्हा अँटिबायोटिक्सची अखिल भारतीय वितरण व्यवस्था कंपनीला मिळाली. त्यामुळे कपनीला बाळसे आले व फायदा झाला. पुढे IDPL ला खोड्यातून बाहेर काढण्यासाठी वितरण व्यवस्था त्याना मिळाली. इकडे ह्या कपनीमध्ये एक Civil Eng., चीफ Eng., Work Manager, Managing Director असा उन्नत झाला. त्याने फॅक्टरीत बांधकामाचा धडाका उडवून कंपनीचा राखीव निधी रसातळाला नेला. हेमायसिन बाजारात येण्यापूर्वी Vitc चालू करण्यासाठी इमारत बांधली व Vitc स्थिर होण्यापूर्वी Amphicillin चा प्रकल्प हातात घेण्यात आला.म्हणून ह्यासाठी फॅक्टरीपेक्षा व्यक्तीच्या

हितसंबंधाचे प्राबल्य येथे दिसते. म्हणून सध्याच्या दुर्दशेचे एक कारण म्हणजे योग्य जागेसाठी योग्य माणूस, 'Proper man for proper Job' ह्या तत्त्वाला फासलेला हरताळ अगदी वरच्या ते खालच्या अधिकाऱ्यापर्यंत. औषधी कारखाना समजल्या जाणाऱ्या ह्या कारखान्यात औषधी-विज्ञान पदवीधर औषधालासुद्धा सापडत नाहीत. अधिकारीवर्गात त्याचे प्रमाण नगण्य करण्यात आलेले आहे. कारण त्याशिवाय हितसंबंधी वर्गाचे स्थानमहात्म्य कसे टिकणार? औषधी-विज्ञान-पदवीधराचे अधिकारीवर्गातील प्रमाण खालीलप्रमाणे—

१ उत्पादन २%
२ गुणनियंत्रण १०%
३. विक्री ०%

*जेणो काम तेणो छे*
*बीजा करे सो गोता खाय*

हेही त्यामुळे ओघाने आलेच. तेव्हा कारखाना आर्थिक दुर्दशेमध्ये सापडणे ह्यात काही नवल नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथील Patient & Proprietory किंवा Pharmaceutical Manufacturing ह्या विभागात एकही औषधी-विज्ञान पदवीधर नाही.

आतरराष्ट्रीय औषधी-निर्माण सकेताप्रमाणे अनभिज्ञ लोकांनी केलेली औषधे ही प्राणरक्षणाच्या ऐवजी प्राणभक्षकही ठरतात. (उदा. कानपूर ग्लुकोज् सलाइन प्रकरण) येथील इजिनियरिंग स्टोअर्स, परचेस्, अकौंटस् किंवा Personal खात्यातसुद्धा त्या त्या क्षेत्रातील प्रशिक्षिताचा अभाव दिसतो. ह्या कारखान्यात Civil Eng., दारुगोळा, दूध-प्रकल्प, मत्स्योद्योग, कापड, रंग-रसायन, वनस्पती इत्यादी क्षेत्रात अनुभव असलेले लोक आहेत. म्हणन झाले तर औषध नाही तर इतर काही तरी. माणसासाठी हेमायसिन नाही तर झाडासाठी Aurevfungin असा प्रकार आहे. येथील व्यवस्थापकांनी ही Factory Eng. cum Transport cum Chemical cum Pharmaceutical आहे असे मेहेर निवाड्याच्या वेळी सागितले होते. तेव्हा अशा भाऊ-गर्दीत वरिष्ठाना खूप करणे हेच काम ठरते. Ethis वगैरे पाण्यात (कायम आणीबाणी). तेव्हा लोकसभेत व सभेत घोषणा करून उत्पादन किंवा आर्थिक स्थिती सुधारणार नाही. त्यासाठी औषध-उद्योगाची पथ्ये पाळावी लागतील.

—माहितगार

## 'पिरंगुटला काय घडले ?'

□ *'माणूस' ता. १३ ऑगस्टच्या अकात* 'पिरगुटला काय घडले ?' ह्या लेख आपण प्रसिद्ध केला आहे. यावद्दल विषमता निर्मूलन *समितीच्या कार्यकर्त्यांचे व आपले मन.पूर्वक* अभिनदन. घडलेली हकीगत ज्याच्या त्यांच्या तोंडून जशी व्यक्त झाली तशीच सागितली आहे हे तर फारच चांगले झाले.

लेख प्रसिद्ध झाल्यामुळे आमच्या गावातील काही लोक नाराज झाले आहेत. *गावाची व घराण्याची नाचक्की जाहीरपणे* केली गेली असे त्यांना वाटते. माणुसकीला सोडून वागणूक दिली तर अस्पृश्याना किती दुःख होते *याचा विचार हे लोक का बरे* करीत नाहीत ? तरी पण आम्ही हे जाहीर करू इच्छितो की, हा लेख आमच्या कोणाच्या सागण्यावरून लिहिला गेला नाही. कारण लेख प्रसिद्ध होणार आहे असे आम्हाला काही माहीतसुद्धा नव्हते.

गावोगावी अनेक दुःखे आहेत. 'माणूस' हे नाव धारण करणाऱ्या साप्ताहिकाने त्यास अवश्य प्रसिद्धी द्यावी. आम्हा तरुणांना, मग ते अस्पृश्य असोत किंवा स्पृश्य असोत, जुन्या दुष्ट चाली-रीती, रूढी नको आहेत; पण पुष्कळांना उघडपणे ते सागण्याचे धैर्य होत नाही. आपणा सारख्यांनी प्रसिद्धी दिली म्हणजे ते धैर्य येण्यास मदत होईल. नसते वाद-विवाद वाढावेत असे आम्हाला वाटत नाही. त्याचे मूळच नष्ट व्हावे.

१९–८–७७ **बाळू ओव्हाळ,**
पिरंगुट, ता. मुळशी

# मुक्ताफळे

## □ अशोकवनातील 'सीता !'

'हे *पुण्याचे लोक हुषार आहेत. काही तरी* पिल्लू सोडून दुसऱ्याच्या मागे भुगा लावून देतात. स्वत मात्र सगळ्या कटकटीतून कटाक्षाने सुटतात. मिरवायला तेवढे अचूक हजर !'

—'बिल्वदल', सप्टेंबर १९७७.

आमचे किरकोळ मित्र अशोकराव शहाणे याचे हे मत. अशोकराव तूर्त मुबापुरीत असले तरी त्याच्या खाती असलेला बराचसा वात्रटपणा त्यानी पुण्यात असतानाच केला टवाळी हा त्याच्या लेखणीचा प्रधान-धर्म. उत्तम टवाळी. अचूक टवाळी. सहसा कुणाला झुकते माप नाही ! म्हणून हा मित्र आम्हाला आवडतो; पण दुर्गाबाई भागवत हा याचा वीक-पॉइंट ! खरे तर पुणेकराचे अशोकरावानी केलेले वर्णन लागू पडते दुर्गाबाई भागवतांना. त्या नुसत्या हुषार नाहीत. अनेक विषयात त्याची गती आहे. *त्यानी एक भुगा लावला का ?* त्या अनेकांच्या मागे अनेक भुगे लावीत असतात. पुण्याला भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाचे एकमताने निवडलेले स्वागताध्यक्ष श्री. मोहन धारिया हे शासनाचे मंत्री असल्याने, ते स्वागताध्यक्ष झाले तर आपण समेलनाला येणार नाही, असा पुकारा त्यानी केला ! मोहनराव गडबडले ! *त्यांनी दिला* राजीनामा. राजीनामा दिल्यावर लगेच दुर्गाबाईंचे अभिनंदन प्रसिद्ध झाले—

'इतका उदारपणा, एवढे सौजन्य क्वचितच कुणी दाखविले असते. माझे मन आनंदाने व कृतज्ञतेने भरून येते आहे. असा विचार करणारा पुरुष राष्ट्राला अधिक समाजाभिमुख करण्यात यशस्वी होईल; त्यांना मी सुयश चिंतिते आणि त्याचे उदारपणाचे ऋण मान्य करते !'

म्हणजे झाले काय ? दुर्गाबाईंना आनद झाला. त्यांचे मन कृतज्ञतेने भरून आले.

मोहन धारिया सौजन्यमूर्ती ठरले आणि इकडे पुणे नगर वाचन मंदिर कपाळाला हात लावून बसले ! धारिया हे सौजन्यमूर्ती आहेत, उदार आहेत, राष्ट्रपुरुष आहेत हे सर्व दुर्गाबाईंना आतापर्यंत माहित नसावे. पुणेकरांना ते आधीच ठाऊक होते. म्हणून तर त्यांना स्वागताध्यक्ष निवडले. आता स्वागताध्यक्षाला हे गुण लागत नाहीत का ? पण दिला त्यांनी भुंगा लावून पुणेकरांच्या मागे !

कऱ्हाड साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा झाल्या तेव्हा त्या म्हणाल्या होत्या–

' ज्याप्रमाणे लोकांनी मला निवडून दिले, तसेच लोकांनी यशवंतरावांना स्वागताध्यक्ष निवडले. त्यांना ते केन्द्रीय मंत्री आहेत म्हणून केवळ विरोध कसा करू ?'

श्री. मोहन धारिया यांना खरोखरच लोकांनी निवडले होते. हो ! कऱ्हाडच्या लोकांनी यशवंतरावांना निवडले तसे पुण्याच्या लोकांनी मोहन धारिया यांना ! जसे लोकसभेला निवडले तसे साहित्यसभेला निवडले. बरे, समारंभाला कुणाला बोलवावे म्हणजे समारंभ उत्तम होतो हे आद्य साहित्यिकानेच सांगितले आहे.

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात–

जरी राजा घरासी ये ।
तरी बहुत उपेगा जाये ।
आणि किर्तीही होये । यज्ञ न ठके ।।

लोक दुर्गाबाईंचे ऐकतात; पण कधीकधी ज्ञानेश्वर माउली ऐकण्याची चूक करतात. माऊली सांगते, 'यज्ञ करायचा झाला, कार्य करायचे झाले तर राजाला बोलवा. तो कार्याला आला तर त्याचा उपयोग फार असतो. लोकात नाव होईल. यज्ञात व्यत्यय येणार नाही !' आता राजे नाहीत. त्याच्या जागी तितकेच गुणसंपन्न मंत्री आले आहेत. तेव्हा संमेलन असले, पुस्तक-प्रकाशन असले, तर मंत्र्यांना बोलवावे म्हणजे कार्य उत्तम पार पडते.

कऱ्हाडचे कार्य कसे उत्तम झाले ! राजी यशवंतरावांनी सगळ्यांना भोजन दिले. इथे कोण बरे गेले नव्हते ? यशवंतरावांनी खांद्यावर हात टाकावा, म्हणून पुढे घुसलेल्यांच्या खांद्यावर त्यांनी हात सुद्धा ठेवला. ते खांदे धन्य झाले. केवढा मांडव ! किती खर्च ! जेवणा-खाण्याची उत्तम सोय. दुर्गाबाईंची काय कल्पना आहे ? की हे सगळे, कऱ्हाडचे साहित्यिक श्रीनिवास कुलकर्णी आणि प्रा. गो. म. कुलकर्णी यांच्यामुळे झाले ? ' मंत्री संमेलनासी आला-बहुत उपेगा झाला'. व्यापाऱ्यांनी जाहिराती दिल्या. पोलीस शहाण्यासारखे वागले. फडतूस सरकारी अधिकाऱ्यांनी धमक्या दिल्या नाहीत. कार्य कांय सुंदर झाले ! पुण्याचे कार्य असेच सुंदर व्हावे, असेच गाजावे, कशातच काही कमी पडू नये म्हणून पुणे नगर वाचन मंदिराने आणि पुण्याच्या स्वागत-मंडळाने, मंत्री मोहन धारिया यांना निवडले होते हो ! दुर्गाबाई कऱ्हाडला मान-मरातबाने मिरवल्या, तसे पुण्याला पु. भा. भावे मिरवले असते. जे पूर्वाध्यक्ष संमेलनाला आले असते, जेवण्याखाण्यास आले असते, त्यांना बायकोसह रहायला स्वतंत्र खोल्या, ' मेडिकल चेक-अप् ' ची सोय, अशी फुकट सर्व व्यवस्था पुणेकर करणार होते. आता काय होते कोण जाणे !

पुन्हा साहित्याचा 'पेट्रन' शोधायला सुरुवात झाली आहे. साहित्य-संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. के. क्षीरसागर म्हणतात –

' स्वागताध्यक्षपदासाठी मान्यवर साहित्यिकाला निवडण्याची गरज नाही. सातारा संमेलनात स्वागताध्यक्षपदी ना. ह. आपटे यांना निवडले ते बरोबर झाले नाही. साहित्याचा आश्रयदाताच संमेलनाला स्वागताध्यक्ष हवा–'

आता शासनाचा मंत्री नसलेला असा नितकाच बलवान, साहित्याचा आणि साहित्यिकांचा आश्रयदाता म्हणून आमच्यापुढे एकच नाव येते. ते म्हणजे लॉटरी-सम्राट व नामवंत प्रकाशक केशवराव कोठावळे यांचे. ते पुणेकर आहेत. मिळविलेला पैसा ते मुक्त हस्ताने साहित्यिकांसाठी खर्च करतात. मितभाषी आहेत. साहित्य-प्रेमी आहेत. त्यांच्या प्रकाशनांची प्रकरणेच्या प्रकरणे महाराष्ट्र टाइम्समध्ये छापून येतात.

यापुढे म. टाइम्समध्ये श्री. जयवंत दळवी, पुण्याच्या ' केसरी ' त साहित्य-परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. ज. जोशी, इंग्रजी टाइम्समध्ये ज्ञानेश्वर नाडकर्णी आणि श्री. श्री. पु. भागवत कबूल झाले तर ' सत्यकथे ' त प्रा. विद्याधर पुंडलीक साहित्याच्या या ' पेट्रन ' वर लेख लिहू शकतील. (आणि हे नाव स्वागताध्यक्षपदासाठी सुचवीत आहोत हे लक्षात ठेवून केशवरावांनी पुढे-मागे असेही एखादे पुस्तक



काढावे ). महाराष्ट्र राज्य लॉटरीने हजारो लाखोपती झाले की नाही हे आम्हाला ठाऊक नाही. महाराष्ट्राच्या विकासाला प्रत्यक्षात किती गती आली ? मुळात गती आली की नाही ? हे आमच्या कानी आलेले नाही; पण महाराष्ट्र राज्य लॉटरीचे साहित्यावर फार उपकार आहेत. या एका कारणासाठी तरी प्रत्येक मराठी भाषिकाने 'के. व्ही. कोठावळे' शिक्का असलेले महाराष्ट्र राज्य लॉटरीचे तिकिट नेहमी घ्यायला हवे.

तेव्हा या लॉटरीने मराठी साहित्यात एक मोठा 'पेट्रन' दिला. श्री. केशवराव कोठावळे स्वागताध्यक्ष झाले तर एक उदार, सौजन्यशील, मंत्री असलेल्या व्यक्तीइतकीच सरकार दरबारी वजन असलेली, वृत्तपत्रावर हुकमत चालवणारी व्यक्ती या पदाला लाभणार आहे.

शिवाय स्वागताध्यक्ष लांब भाषणे करतात अशी प्रा. क्षीरसागर यांची जी दुसरी तक्रार आहे, (खांडेकरांचे मिरज संमेलनातले भाषण आठवा !) त्याबद्दल श्री. कोठावळे यांच्याकडून धोका संभवत नाही. कारण ते व्यासपीठावरून बोलतच नाहीत ! त्यांच्या या विनयाचा फायदा इतरांना मिळेल.

अशोकराव शहाणे, तुमचा व दुर्गाबाई यांचा या नावाला विरोध होणार नाही ना हो ? एकदा तरी घ्या सांभाळून पुणेकरांना.

अशोकरावांनी दुसरी एक मजेदार गोष्ट सांगितली आहे. काय तर म्हणे मंत्रिमंडळातून बाहेर पडणाऱ्या मोहन धारियांचं अभिनंदन करायला 'माणूस' चे श्री. माजगावकर यांचेबरोबर दि. बा. मोकाशी गेले होते. मोकाशींचे म्हणणे– ' लोक येत होते, तोंडावर स्तुती करीत होते. हे सगळे हा गृहस्थ आपसुक घेतो. काहीच कसं वाटत नाही ? अन् इकडे आपण ! तुमची अमुक अमुक गोष्ट भलतीच चांगली आहे म्हणून कुणी सांगायला गेलं तरी बुजून जातो !'

अशोकराव तात्पर्य काढतात–' हा राजकारण आणि साहित्य-कारणातला फरक !' आम्ही मोकाशींना चार ख्यातनाम साहित्यिकांची नावे देतो. मोकाशींनी जमल्यास त्यांच्याकडे जावे. स्तुतीशिवाय त्यांना काहीच कसे आवडत नाही असा प्रश्न मोकाशींना पडेल ! पण अशोकराव धारियांना लहान करायला निघाल्यावर, त्यांनी सोईप्रमाणे मोकाशींना खर्ची टाकले आहे. हे बरं नव्हे हां अशोकराव !

ज्या अटीतटीच्या निवडणुकीत, पु. भा. भावे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले त्या निवडणुकीवर अशोकराव काय लिहितात ?

' इथं मतदारच फुगतो. पाठिराख्यांनी अटी-तटी विकोपाला नेली. लुंग्या-सुंग्या वृत्तपत्रांनी त्याला खतपाणी घातले. साहित्यपरिषदेसारख्या घटक संस्थेने उमेदवारांना आपापलं म्हणणं मांडायला पाचारण केले. कुणा उमेदवाराच्या वतीने कुणी शेटजीने पैसे सोडले, त्याला उत्तर म्हणून शिस्तशीर काम करणाऱ्यांचा फौजफाटा मैदानात उतरला अन् डोकी मोजून एकजण अपक्ष म्हणून निवडून आला–'


अध्यक्ष निवडून आला म्हणायचे असेल तर निवडणूक कशी टाळणार ? झटपट निवडणूक झाली. दुर्गाबाईंना ४०० वर मते पडली ! प्रतिस्पर्ध्यास ७ ! म्हणजे डोकी मोजणे टळत नाहीच! अशोकराव, आतापर्यंत साहित्य संमेलनाचा अध्यक्ष साहित्य परिषदातील राजकारणी करीत असत. आपलीच मंडळी स्वागत-समितीचे सभासद करून, सदस्यत्वाची नोंदणी झटकन् बंद होत असे. आणि मग निमंत्रक संस्था व यांच्या संगनमताने हवा तो अध्यक्ष निवडून आल्याचे जाहीर होत असे. खऱ्या-खुऱ्या अर्थाने फक्त यंदाच निवडणूक झाली. सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रा. बाळ गाडगीळ यांनी प्रा. गंगाधर गाडगीळ यांना विनाकारण भरीस टाकून, या निवडणुकीला अधिक रंग आणला. त्यामुळे काही बिघडले, असे नाही. पुणे नगर वाचन मंदिराने मुक्तपणे स्वागत सभासद नोंदणी केली. साहित्य परिषदेतून घुसलेले उपद्व्यापी लोक तिथून निघून गेल्याने परिषदेने पुणे नगर वाचन मंदिरावर 'अमक्यालाच निवडा आणि यासाठी नोंदणी झटकन् बंद करा' असे कोणतेही दडपण आणले नाही. परिणामी अनेक नवे सभासद झाले. यांना साहित्यातले काय कळते ? हा प्रश्न शहाण्याने विचारू नये. राजकीय निवडणुकीत मतदानाचा आपल्यास तरी अधिकार काय ? सर्वांना काय राजकारण थोडेच कळते ! पण सर्वजण मतदान करतात ना !

पु. भा. भावे काय किंवा प्रभाकर पाध्ये दोघे उत्तम साहित्यकार असूनही, दोघांनाही काही सामाजिक व राजकीय मत-प्रणाली होती. साहित्यिकाच्या ठिकाणी या वरवर साहित्य-बाह्य वाटणाऱ्या जिज्ञासा असणे हा साहित्याचा मुळीच कमीपणा नाही. नुसते साहित्य प्रसवतात ते, केवळ त्यांना राजकीय व सामाजिक मते नाहीत, म्हणून ' ग्रेट ' ठरत नाहीत. सबंध व्यक्तिमत्त्वातून माणसाची विवक्षित मते वगळता येत नाहीत. यामुळे ही निवडणूक रंगली. अशोकराव म्हणतात की,साहित्य परिषदेने उमेदवारांना आपले म्हणणे सांगण्यास पाचारण केले ! ही व्याख्याने ज्यांनी ऐकली त्यांची साक्ष काढाल की नाही ? प्रा. गाडगीळ बोलले– ' हरिभाऊंची सदाशिव पेठ ' या विषयावर. विषयाला सोडून एक शब्दही प्रा. गंगाधर गाडगीळांनी उच्चारला नाही. पु. भा भावे यांनी देखील ' काही साहित्यिक प्रश्न ' या विषयापुरताच आपला वाक्स्रोत सोडला.

तेव्हा अशोकराव म्हणतात त्याप्रमाणे अध्यक्षपदाची शान निवडणुकीत तरी मुळीच गेलेली नाही. सर्वसाधारण मराठी भाषिकांच्या हाती ही निवडणुक आल्याने शान वाढलीच आहे. अशोकवनात बसलेली 'सीता' तेवढी पतिव्रता आणि बाकी सगळ्या ' मुरळ्या ' असे समजावयाचे अशोकराव, मुळीच कारण नाही. सीतेचे पावित्र्य वादातीत समजण्याने इतरांचे वादग्रस्त असण्याचे मुळीच गरज नाही.

अशोकरावांचे लेखन आम्हाला आवडणं हा ज्याचा त्याचा ' वीक् पॉइंट ' ज्याला त्याला सांगितलेला बरा. असे 'पॉईंटस' नसते तर आम्हाला तरी हे सगळे कसे लिहिता आले असते ?

**–ग्यानबा**



इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व

# अपक्ष खासदार श्री. पु. ग. मावळणकर यांची मुलाखत

चंद्रशेखर

**प्रश्न :** आणीबाणीच्या काळात आपणास श्रीमती गांधींना संसदेत जवळून पाहण्यास मिळाले. त्यांचा एकदर मूड कसा होता?

**उत्तर :** श्रीमती गांधी अंतर्यामी अतिशय भेदरलेल्या अशा होत्या. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास नव्हता. संसदेतील विरोधकांना तोंड देण्याचे धैर्य त्यांच्यात राहिले नव्हते.

**प्रश्न :** त्यांनी सर्व लोकशाही संकेत धाब्यावर बसवून आणीबाणीची घोषणा केली. आपण म्हणता त्या भयग्रस्त होत्या हे कसे?

**उत्तर :** त्यांचा कणखरपणा, बेफिकिरी वगैरे सर्व वरवरचा देखावा होता असे मला वाटते. या सर्व काळात त्या खूप 'टेन्स' वाटत; कोणात विशेष मिसळत नसत. संसदेत प्रश्नोत्तराच्या तासात त्या उपस्थित राहण्याचे टाळीत. अशी प्रथा आहे की, या तासात पंतप्रधानांनी हजर राहावयास हवे; पण त्या केवळ बुधवारीच या तासाला हजर रहात. कारण बुधवारी त्यांच्या स्वत:च्या खात्यांबाबत प्रश्न असत. इतर दिवशी इतर खात्यांबाबत प्रश्न असत. त्या वेळी त्या गैरहजर रहात. इतर कोणाही मंत्र्याच्या बाजूने त्यांनी प्रश्नोत्तरामध्ये 'इंटरव्हेन' केले असे क्वचितच.

**प्रश्न :** श्रीमती गांधींनी आणीबाणी पुकारण्याचा धाडसी निर्णय कसा घेतला?

**उत्तर :** त्याची कारणे दोन– नेहरू राजघराण्यात जन्मल्यामुळे असेल, राज्य करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे त्या मानतात. त्यांची कधी चूक होऊच शकत नाही असे त्यांना वाटते.

दुसरे म्हणजे नेहरूंच्या अमदानीत सध्याच्या सर्व प्रमुख नेत्यांना त्यांनी जवळून पाहिले होते. या साऱ्यांचा विशिष्ट कमकुवतपणा, विचार-पद्धती, प्रतिक्रिया यांची श्रीमती गांधींना उत्तम कल्पना होती. आपल्या निर्णयावर या नेत्यांची, जनतेची कितपत प्रतिक्रिया होईल याचा अंदाज होता म्हणून त्या आणीबाणी पुकारू शकल्या.

**प्रश्न :** श्रीमती गांधींचे व्यक्तिमत्त्व आपणास कसे वाटते?

**उत्तर :** त्या अत्यंत 'रूथलेस,' कठोर आहेत. राजकारणाच्या खडतर अवस्थातून त्या कधीच गेल्या नसल्याने, त्यांच्याजवळ परिपक्व मन नाही. त्या चलाख, हिशोबी, कारस्थानी आहेत; पण त्यांच्या ठिकाणी बुद्धिजन्य हुषारी नाही. शिक्षण अल्प असल्याने त्यांच्यावर उदारमतवाद, सुसंस्कृती यांचे संस्कार अजिबात नाहीत. आणखी एक विशेष म्हणजे त्यांना विनोदाचे वावडे आहे. स्वत:कडे, जगाकडे त्या खेळकर वृत्तीने कधी पाहूच शकत नाहीत!

**प्रश्न :** त्यांची जमेची बाजू कोणती?

**उत्तर :** त्यांना आव्हान मिळाले, चॅलेंज् दिसला की त्यांची कामगिरी उत्कृष्ट होते. संसदेतदेखील कोणी व्यक्तिगतरित्या त्यांना आव्हान देत आहे असे दिसले की त्या उत्तम भाषण करीत; प्रतिस्पर्ध्याला निरुत्तर करून टाकीत. मधू लिमये व मी एकमेकांना व साथी–मित्रांना बजावीत असू की, 'डोंट प्रव्होक् द लेडी.'

**प्रश्न :** आपला व त्यांचा कधी व्यक्तिगत संबंध येत असे काय?

**उत्तर :** संसदेत आमची जी झटापट होई त्याखेरीज, संपूर्ण आणीबाणीत मला त्या जवळून अशा तीनदा पहाण्यास मिळाल्या. आणीबाणीपूर्वी मी त्यांना अनेक प्रश्नांवर पत्रे लिहीत असे व त्या उत्तरे पाठवीत. आणीबाणीत मी त्यांना पत्रे लिहिणे बंद केले. नोव्हेंबर ७६ मध्ये सभापती श्री. भगत यांनी 'स्पीकर्स लंच' दिला. मंत्रिमंडळ, विरोधी पक्षनेते व अपक्ष प्रतिनिधी म्हणून मी असे हजर होतो. या प्रसंगी श्रीमती गांधी आल्या, औपचारिक नमस्कारापलीकडे कोणाशीही विशेष बोलल्या नाहीत. त्यांचे सहकारीही त्यांना टाळीत होते. त्यांच्याबद्दल सर्वांच्या वागण्यात एक भीतीचीच भावना दिसली. त्यांची मुद्रा खूप उतरलेली, अस्वस्थ दिसत होती. बहुतेक सर्व आणीबाणीत त्यांची हीच अवस्था होती.

**प्रश्न :** त्यांचा कल व्यक्तिगत हुकुमशाही प्रस्थापित करण्याकडे आहे असे आपणास वाटते काय?

**उत्तर :** निश्चितच. त्यांना संसदेबद्दल फारसा आदर नव्हता. नेहरू संसदेचे अधिवेशन चालू असता कोठेही दिल्लीबाहेर शक्यतो जात नसत. ते संसदेत न चुकता उपस्थित राहात. श्रीमती गांधी संसदेत येण्याची टाळाटाळ करीत. त्या दिल्लीत असल्या तरी संसदेत येत नसत. मात्र आपल्या कचेरीत बसून, खास ध्वनिक्षेपण व्यवस्थेद्वारे त्या संसदेची कार्यवाही, भाषणे ऐकत रहात.

**प्रश्न :** याचे कारण काय?

**उत्तर :** आत्मविश्वासाचा अभाव हे मी आधी सांगितलेच. शिवाय आपल्या निर्णयाची छाननी, टीका, प्रतिवाद हे ऐकण्याची त्यांची तयारी नसे. त्यांना टीका अजिबात सहन होत नाही. आपल्या निकटच्या वर्तुळावरच त्या विसंबतात. राज्य चालविण्यात लोकमताचा काही भाग असतो याची त्यांना कल्पनाच नाही.

**प्रश्न :** या सर्व गोष्टीमुळे त्या हुकुमशाहीकडे झुकल्या काय?

**उत्तर :** तसेच; पण त्याबरोबरच आपल्या सत्तेला लोकमताचा, कायद्याचा पाठिंबा आहे असे मानणे त्यांना आवडे. ज्या ज्या वेळी पाश्चात्य वृत्तपत्रांत त्यांच्यावर टीका होई त्या त्या वेळी त्यांनी



खासदार पुरुषोत्तम गणेश मावळणकर-स्पीकर मावळणकरांचे चिरंजीव—राजकारणाचे व लोकशाही विषयीच्या आस्थेचे बाळकडू. सौम्य, मिस्किल, प्रसंगी तीव्र होऊ शकणारे सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व. 'लोकांची इच्छा' ही सार्वभौम शक्ती, ही विलक्षण श्रद्धा.

आणीबाणीच्या काळात, इंदिराशाहीविरुद्ध संसदीय आघाडी लढविणारे, कळकळीने, परखडपणाने सत्ताधाऱ्यांना चार गोष्टी सुनावणारे मावळणकर बहुधा एकटेच. आणीबाणीविषयी वारंवार विरोध नोंदविला. स्वच्छ, निर्वैर आवाजात सत्ताधाऱ्यांना संसदेत बजावले—

'सर्वंकष सत्ता हाती असल्याने तुम्हास कोणाची भीती राहिलेली नाही; पण निदान परमेश्वराचे तरी भय बाळगा !'.

घाई-गर्दीने केलेल्या घटना-दुरुस्तीबाबत ठामपणे भविष्यवाणी केली 'जितक्या घाईने या गोष्टी केल्या जात आहेत, त्याच त्वरेने त्या नष्ट होतील !' हे भविष्य इतक्या लौकर खरे झाल्याने सध्या खुषीत !

जोरदार उत्तरे दिली आहेत. त्यावरून 'फ्री वर्ल्डच्या' मताचे महत्त्व त्या मानीत असाव्यात असे वाटते.

**प्रश्न** : त्यांच्या या प्रयत्नाचे आणखी एखादे उदाहरण ?

**उत्तर** : सांगतो. जनतेचे मूलभूत अधिकार आणीबाणीत स्थगित करण्यात आले. इतर देशांतही असेच करतात. यात लोकशाही-विरोधी काही नाही असे सिद्ध करण्यासाठी त्यांनी खूप धडपड केली. त्यासाठी भर संसदेत खोटेपणा करण्यास त्या कचरल्या नाहीत !

**प्रश्न** : हे केव्हा घडले ?

**उत्तर** : मागच्या नोव्हेंबरमध्ये घटना-दुरुस्तीवर संसदेत चर्चा चालू असताना श्रीमती गांधींनी फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीच्या घटनेतील तरतूद वाचून दाखविली. ती तरतूद अशी होती की, नागरिकांचे मूलभूत हक्क रद्द करता येतील; पण त्यांनी ही तरतूद अर्धीच वाचून दाखविली व महत्त्वाचा भाग वाचलाच नाही !

त्या चर्चेत भाग घेताना मी फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीची घटनाच सभागृहात नेली व श्रीमती गांधींनी न वाचलेली तरतूद वाचून दाखविली.

ती अशी होती की, मूलभूत हक्क रद्द करण्याचा अधिकार केवळ फेडरल कॉन्स्टिटयूशनल कोर्टाचा राहील—सरकारचा नाही.

याच तरतुदीत पुढे असे म्हटले आहे की, मूलभूत हक्कांचे अनिवार्य विशेष कोणत्याही परिस्थितीत खंडित केले जाणार नाहीत.

**प्रश्न** : श्रीमती गांधींच्या राजवटीचे वैशिष्टयच या घटनेत दिसते असे तुम्हास वाटते काय ?

**उत्तर** : तसे म्हणायला हरकत नाही. अर्ध-सत्ये, असत्ये, उघडा-वाघडा जुलूम, दांडगाई, सर्व लोकशाही संस्थांची मुस्कटदाबी ही त्यांच्या कारकीर्दीची वैशिष्टये होत. पक्षामधील लोकशाही श्रीमती गांधींनी प्रथम नष्ट केली, मग देशातील लोकशाही मोडीत काढली!

**प्रश्न** : लोकशाहीबद्दल श्रीमती गांधींना आत कुठे तरी आस्था वाटते काय ? मधला सारा प्रकार एखाद्या मानसिक लहरीचा परिणाम असावा असे मानता येईल काय ?

**उत्तर** : मला तसे वाटत नाही. श्रीमती गांधींना लोकशाहीबद्दल, देशाबद्दल विशेष आस्था नाही. स्वतःचे सत्तापद हा त्यांच्या सर्व विचारांचा प्रथमपासून केंद्रबिंदू राहिला आहे. त्यांना कांग्रेसबद्दल-देखील काही सोयर-सुतक नाही !

**प्रश्न** : या निष्कर्षाचा आधार काय ?

**उत्तर** : पुष्कळ दाखविता येतील. त्यांचे राजकारण कारस्थाने, डाव-पेच यांनी भरलेले आहे. लोकांना विश्वासात घेणारे नाही ! उपयोग असेल तेव्हा एखाद्याला जवळ करायचे, काम झाले की फेकून द्यायचे ! लोकांना सांभाळून घ्यायचे श्रीमती गांधींना जमले नाही.

प्रतिस्पर्धी बेसावध, दुर्बल दिसला की राम-टोला द्यायचा; कसलीही नीतिमत्ता पाळायची नाही ही श्रीमती गांधींची राजकीय नीती आहे ! सार्वजनिक जीवनातल्या सर्व चांगल्या मूल्यांची त्यांच्या या राजकारणाने पीछेहाट झाली. भ्रष्टाचार, गुन्हेगारी, लांगूल-चालन, हेवे-दावे यांचा राजकारणात फार मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. माझी श्रीमती गांधींच्याबद्दल सर्वांत मोठी तक्रार ही आहे—राजकारणाला व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेहून अधिक चांगला, व्यापक आधार लागतो. राजकारणाचे उद्दिष्ट लोकहित हे असते हेच त्यांच्या कारकीर्दीत कोणी मानीनासे झाले ! ही वृत्ती फार घातक आहे !

**प्रश्न** : अद्यापही श्रीमती गांधी असेच मानतात की, आणीबाणी पुकारून देशाला त्यांनी वाचविले; संजय गांधीने कारभारात ढवळा-ढवळ केली नाही; हा सर्व विकृत प्रचार आहे; हे कसे ?

**उत्तर** : कारण एकच. श्रीमती गांधी खरे सांगू शकत नाहीत म्हणून त्यांना हे सारे सांगावे लागते. संजय गांधीने मोठ्या प्रमाणा-

वर हस्तक्षेप केला हे मी स्पष्टपणे सांगू शकतो. एवढेच नव्हे तर संजयच्या या दडपशाहीस श्रीमती गांधीचा पूर्ण पाठिंबा होता !

ससदेत त्यानी जाहीरपणे सागितले होते की, केवळ '२० कलमी कार्यक्रमच सरकारला महत्त्वाचा वाटत नाही तर सजयचा ५ कलमी कार्यक्रमदेखील सरकारचाच आहे. त्याना या गोष्टी नाकारता येणार नाहीत !

**प्रश्न :** मार्च ७७ मध्ये लोकसभा बरखास्त करून निवडणुका घेण्याचा निर्णय त्यानी का घेतला ?

**उत्तर :** आणीबाणीनंतर एक वर्षाने श्रीमती गांधीची परिस्थितीवर पकड राहिली नव्हती, जनतेत असतोष होता.

शिवाय संजय गांधीचे वर्चस्व वाढत जाऊन शेवटी तो आपल्याला बाजूस सारील अशी भीती श्रीमती गांधी यांना वाटू लागली होती. याबरोबरच संजयला सत्ता-केंद्रात निवडणुकीच्या मार्गाने आणून एखादे दुय्यम खाते त्याच्याकडे द्यावे व आपल्यानंतर त्याचा हक्क प्रस्थापित करून ठेवावा असाही त्यांचा डाव होता. त्यांना लोकांच्या मूडची नीट कल्पना नव्हती. आपल्यालाच पुन्हा पाठिंबा मिळेल अशी त्याना खात्री होती.

त्याखेरीज अमेरिकेत कार्टर यांची अध्यक्षपदी निवड झाली याचाही थोडा परिणाम झाला. त्याच सुमारास भुट्टोने पाकिस्तानात निवडणुका जाहीर केल्याने श्रीमती गांधींना आपल्या प्रतिष्ठेला आव्हान मिळाल्यासारखे वाटले व आपणही लोकमनाचा पाठिंबा सिद्ध करावा अशी ईर्षा निर्माण झाली. जनतेला आणीबाणी-प्रकरण कधीच न रुचल्याने त्यांचा दारुण अपेक्षा-भंग झाला हे निराळे !

**प्रश्न :** श्रीमती गांधीचे पुनरागमन होण्याची शक्यता कितपत वाटते ?

**उत्तर :** मला ही शक्यता वाटत नाही. श्रीमती गांधींबद्दल गरीब-वर्गात अद्याप काही आकर्षण शिल्लक आहे हे खरे. त्यांच्यामागे नेहरू घराण्याचे वलयही अद्याप काही प्रमाणात आहे. तरीदेखील त्या परत पंतप्रधान होऊ शकतील अशी शक्यता नजीकच्या भविष्यकाळात दिसत नाही !

**प्रश्न :** गेल्या दोन महिन्यातील त्यांच्या हालचालींचा अन्वय कसा लावायचा ?

**उत्तर :** आपण अजून पूर्णपणे संपलो नाही एवढे सिद्ध करण्याचा श्रीमती गांधीचा प्रयत्न आहे. त्यांनी जर आपले नेतृत्व पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न निकराने केला तर काँग्रेसमध्ये पुन्हा यादवी माजेल ! आज तरी श्रीमती गांधी या काँग्रेसच्या हिशेबी 'असेट' नसून 'हेवी लायबिलिटी' आहेत. संसदेतील दीडशे काँग्रेस खासदारांपैकी बहुतेक श्रीमती गांधीच्या विरुद्ध आहेत. त्यांचे राजकीय पुनरागमन ही गोष्ट अशक्य नाही; पण असंभाव्य आहे असे म्हणता येईल !

**प्रश्न :** आपल्या या चर्चेतून श्रीमती गांधीचे राजकीय व्यक्तिमत्त्व देशाला विशेष उपकारक ठरले नाही असेच निष्पन्न होत आहे. अशी व्यक्ती १९६९ ते १९७७ एवढा प्रदीर्घ काळ देशाचे एकमेव नेतृत्व करीत होती यावरून या देशाच्या जनतेबद्दल तुम्ही काय म्हणाल ?

**उत्तर :** माझा रोख अशिक्षित जनतेपेक्षा तथाकथित सुशिक्षित, सपन्न वर्गावर आहे या वर्गाने स्वार्थासाठी, प्रतिष्ठेसाठी, भितीपोटी इंदिराशाहीचा प्रतिकार करण्याचे टाळले. काही जण तटस्थ राहिले; पण कोणीच दोन्ही हातात 'करेज्' घेऊन मुकाबला केला नाही. आम जनतेनेच अखेर देशाला परत स्वातंत्र्य, लोकशाही मिळवून दिली ! आता या मूल्यांच्या रक्षणार्थ आपणा सर्वांना जागरूक राहावे लागेल, सुशिक्षित वर्गाला जास्त ! □


**यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली**
**दोन 'राजहंस' प्रकाशने**

# टॉलस्टॉय एक माणूस

**सुमती देवस्थळे**

# श्रीग्रामायन

**श्री. ग. माजगावकर**

**या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०.

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## ☐ अस्तंगत युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा– अंबिका सोनी

दिवस फिरले की जवळची माणसेही पाठ फिरवितात. राजकारणामध्ये तर हा अनुभव विशेष तीव्रतेने येतो. आता अबिका सोनी यांचेच संजय गांधींच्या बाबतीतील वर्तन पहा ना ! युवक कांग्रेमच्या अध्यक्षा म्हणून त्या जेव्हा भाषणासाठी उभ्या रहात असत, त्या वेळी दर पाच-सात वाक्यामागे एखादे वाक्य सजय गांधी यांची तारीफ करणारे असे आणि आता त्याच बाई– सजयचा आणि आपला राजकीय व्यासपीठावर काही विशेष सबंध नव्हता किंवा त्याने आपल्याला युवक कांग्रेसचे अध्यक्ष केले– या गोष्टीचा त्या साफ इन्कार करतात. वस्तुस्थितीचा इतका निर्लज्ज इन्कार केवळ राजकीय नेतेच करू शकतात. जनार्दन ठाकूर यांनी 'ऑल द प्राइम मिनिस्टर्स मेन' या आपल्या पुस्तकामध्ये आणीबाणी पर्वामध्ये असाधारण महत्त्व लाभलेल्या युवक कांग्रेसचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या या बाईंच्या कार्य-कर्तृत्वाची झलक पेश केली आहे.

पंजाब सरकारचे माजी मुख्य सचिव आणि गोव्याचे माजी लेफ्ट. गव्हर्नर नकुल सेन यांच्या अंबिका सोनी या कन्या. संपन्न घरात जन्मलेल्या या कन्येला अर्थातच संपन्न सासर मिळाले. इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण घेतलेल्या या मुलीचा विवाह भारतीय विदेशी सेवेमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याबरोबर झाला विवाहानंतर ती आपल्या पतीबरोबर क्युबामध्ये गेली. हवना विद्यापीठामध्ये स्पॅनिश भाषेचे चार धडे गिरविले आणि क्युबियन विद्यार्थी चळवळीपासून काही बोध घेतला. तिचा विवाह ही कोणत्याच दृष्टीने फारशी समाधानाची बाब नव्हती. घराच्या चौकटीमध्ये बंद राहणे तिच्या स्वभावातच नव्हते. १९६८ साली बाई भारतात परत आल्या आणि एअर फ्रान्सच्या दिल्ली येथील कार्यालयामध्ये स्वागतिका म्हणून काम केले. या काळामधील अबिकाबाईंच्या हालचालींबाबतच्या वेड्यावाकड्या गोष्टी आजही ऐकायला मिळतात. १९६९ साली कॉंग्रेसपक्ष दुभगला आणि इदिराजींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेल्या या बाईंनी कॉंग्रेस–स्वयसेवक म्हणून स्वत.चे नाव नोदविले. काही तरी करण्याची महत्त्वाकांक्षा असल्याने काय करावे याबाबत सल्ला मागण्यासाठी त्या हेमवतीनंदन बहुगुणा यांना जाऊन भेटल्या त्या वेळी. कांग्रेसचा महिला-विभाग सांभाळणाऱ्या मुकुल बॅनर्जी यांना भेटण्याचा सल्ला बहुगुणा यांनी दिला. महिला-आघाडीचे काही काम करीत असतानाच कांग्रेसचे सरचिटणीस चंद्रजित यादव यांची आणि अंबिकाबाईंची ओळख झाली. या ओळखीतूनच बाईंना पुढील वाटचालीची दिशा सापडली. बायकांच्या बाबतीत चंद्रजित यादव याचा फारसा लौकिक नव्हता; पण तरीही अबिकाबाईंनी चंद्रजित यादव याचे मार्गदर्शन पत्करले अन्य स्नेहभाव आणि दीर्घकालीन राजकीय मार्गदर्शन याची ती नांदी होती चंद्रजित यादव यांच्या सहकार्यामुळे अंबिका सोनी यांना ए. आय् सी. सी. मध्ये जाणविण्याइतपत काम आणि कामाच्या योग्यतेप्रमाणे स्थान मिळू लागले तथापि काही थोड्या मंडळींचा अपवाद वगळता अंबिका सोनी हे नावही फारसे कोणास माहीत नव्हते आणि ज्यांना त्यांचे नाव माहिती होते त्यानाही चद्रजितच्या निकट असलेली बाई, एवढाच त्याचा परिचय होता. १९७५ मध्ये दिल्लीमधील काही तरुण कार्यकर्त्यांसह त्या गुजरातमध्ये निवडणूक-प्रचारासाठी गेल्या होत्या त्याची आठवण काही नेत्याना आजही आहे; परंतु संजय गाधींच्या आतल्या गोटात दाखल झाल्यावरच बाईंच्या उत्कर्षाला खरी गती मिळाली. राजकीय उत्कर्षाच्या या पर्वामध्येच अंबिकाबाईंची अध्यात्मिक वाटचालही चालू होती. एका अपघाती योगायोगाने त्या साईबावांच्या उपासिका बनल्या. (हे साईबावा– म्हणजे आपले शिर्डीचे साईबाबा नव्हेत, हे दुसरेच कोणी साईबाबा आहेत ) अंबिकाबाई या संदर्भात म्हणतात, 'माझ्या आईचा आणि साईबाबांचा परिचय होता. क्युबामध्ये असताना मी त्यांच्यासबंधी थोडेफार वाचले होते; पण त्यांच्याबाबतीत माझ्या मनामध्ये विश्वासापेक्षा आश्चर्याची भावनाच जास्त प्रबळ होती. एक दिवस मी बाबांच्या कीर्तनाला गेले त्या वेळी मला जो अनुभव आला त्याचे शब्दात वर्णन करणे कठीण आहे.' त्यानतर अंबिकाबाई बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनाला गेल्या आणि दर्शनाला गेल्यावरही त्यांचे मन शंकाकुल होते. बाबांवर विश्वास ठेवायला का–कू करीत होते. बाबांनी ते ओळखले असावे. शेवटच्या दिवशी ते त्यांच्या जवळ आले आणि म्हणाले– 'अंबिका, तुम क्या चाहती हो ?' अंबिकाबाईंनी आश्रमात राहण्याची इच्छा व्यक्त केली आणि या वास्तव्यातूनच पुढे बाबांसंबंधीची श्रद्धा जन्माला आली. साईबाबांवरील श्रद्धा आणि राजकारण यामध्ये काही संघर्ष निर्माण होणार नाही याची काळजी त्यानी घेतली. राजकारणामध्ये कम्युनिस्ट-विरोधक संजय आणि कम्युनिस्ट म्हणून शिक्का लागलेले चंद्रजित यादव या दोघाचा तोल संभाळीत वाटचाल करणाऱ्या अबिकाबाईंना राजकीय कार्य आणि साईबाबा याना एकाच वेळी हाताळणे मुळीच कठीण नव्हते. संजय गाधी यांनी अंबिकाबाईंना युवक कांग्रेस अध्यक्षपदाची गादी बहाल केल्यावर पुष्कळ लोकांनी विचारले, 'या बाई का अध्यक्ष ?' या तर कम्युनिस्ट आहेत !' बाईंनी लगेच खुलासा केला, 'मी कम्युनिस्ट नाही तर मी नेहरूंच्या विचारसरणीची समाजवादी आहे.' कांग्रेसचे अध्यक्षपद संभाळणारे देवकांत बारुआ हे-पण त्या वेळी

पृष्ठ २८ वर

# चीन

## माओच्या मार्गापासून दूर

वा. दा. रानडे

चिनी कम्युनिस्ट पक्षाची अकरावी कॉंग्रेस नुकतीच पार पडली. नेहमीप्रमाणेच या बैठकीबद्दल गुप्तता राखण्यात आली होती. कॉंग्रेस केव्हा सुरू होणार, केव्हा संपणार हे आधी जाहीर करण्यात आले नव्हते. परिषद संपल्यानंतरच तिचे निर्णय चिनी वृत्तसंस्थेने त्रोटक स्वरूपात जाहीर केले चीनशी आपले राजकीय सबंध प्रस्थापित झाले असले तरी तेथील घटनांची सविस्तर माहिती 'समाचार' देऊ शकत नाही. आपले स्वतंत्र वार्ताहर तेथे नाहीत. फुकेन बंडासंबंधी लिहिताना 'माणूस'मध्ये मी याबाबत लिहिले होते तीच परिस्थिती अजून कायम आहे. 'समाचार'च्या पुनर्घटनेनंतर तरी यात काही सुधारणा होईल अशी आशा करावयाची. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत मोठा गाजावाजा करून वृत्तसंचयसंघ स्थापन करण्यात आला; पण चीनमधील घटनांबाबत त्यानेही काही विशेष वार्ता दिल्याचे दिसत नाही. पाश्चात्य वृत्तपत्रांच्या वार्ताहरांनी पाठविलेल्या अहवालावरून मात्र या कॉंग्रेसमधील कामकाज व निर्णयासबधी अधिक स्पष्ट कल्पना येते.

माओंच्या निधनानंतर भरलेली पहिलीच कॉंग्रेस या दृष्टीने तिच्या निर्णयांना महत्त्व आहे. चीन माओच्या मार्गापासून दूर जात आहे का ? माओंची कोणती तत्त्वे व धोरणे सोडली, कोणती ठेवली या दृष्टिकोनातून या परिषदेचा विचार केला तर काय दिसते ? 'क्रांतीला अंत नसतो' हा माओचा एक प्रमुख सिद्धांत. रशियाशी त्याच्या मतभेदाचा हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. रशिया क्रांतिमार्गापासून दूर जाऊन सुधारणावादी झाला आहे. वरिष्ठ अधिकारी व तंत्रज्ञाचा नवा वर्ग तेथे तयार झाला असून सुखासीन जीवन जगण्याकडे त्याची वाढती प्रवृत्ती दिसून येत आहे. या सुखासीन प्रवृत्तीतून पुन्हा भांडवलशाही मूल्यांचा पगडा बसण्याचा धोका माओना वाटत होता व चीनमध्ये हे टाळण्यासाठी सांस्कृतिक क्रांतीची मोहीम त्यांनी सुरू केली होती. क्रांतीच्या ध्येयवादावर सुखासीनतेची काजळी चढत जाते ती झटकून टाकण्यासाठी दर सात-आठ वर्षांनी सांस्कृतिक क्रांती करायला हवी असे त्याचे मत होते. सांस्कृतिक क्रांतीत काही अतिरेकी प्रकार घडले असतील; पण भांडवलशाही मूल्ये व कल्पना याचे उच्चाटन करण्यात ती बरीच यशस्वी झाली. क्रांतीच्या ध्येयवादाचा विसर नको हे खरे; पण सतत अस्थिरता असणेही विकासास पोषक नाही. माओंच्या सांस्कृतिक क्रांतीतून अशी अस्थिरता निर्माण झाली होती. आर्थिक घडी विस्कळित झाली होती. तेव्हा स्थैर्य निर्माण करून आर्थिक विकास साधण्यावर चीनच्या नव्या नेत्यांचा भर आहे. आजची ती गरज असली तरी त्यातून सुधारणावादी प्रवृत्ती बळावणार नाहीत याची दक्षता घ्यायला हवी. ती न घेतल्यास माओंनी इशारा दिल्याप्रमाणे चीन रशियाच्या मार्गाने जाऊ लागेल.

चिनी कम्युनिस्ट पक्षातून कट्टर डाव्या गटाची हकालपट्टी झाली असून अजून जे थोडे सभासद शिल्लक असतील त्यांना हाकलण्यासाठी सर्व पातळ्यांवर शुद्धीकरण मोहीम हाती घेण्यात येणार आहे. पक्ष पूर्णपणे नेमस्त गट आणि लष्करी नेत्यांचा गट यांच्या नियंत्रणाखाली गेला आहे. त्यातही लष्कराचे प्रभुत्व अधिक आहे. नव्या पोलिटब्यूरोच्या २३ सभासदांपैकी १० लष्कराचे प्रतिनिधी आहेत. माओंनी हकालपट्टी केलेले तेंग सियाओ पिंग याना पक्षात पुन्हा महत्त्वाचे स्थान मिळाले असून पंतप्रधानपदीही त्यांची निवड होण्याची शक्यता आहे. लष्कराच्या आधुनिकीकरणावर नवे नेते भर देणार आहेत. तेंग या धोरणाचे पुरस्कर्ते असून माओंशी त्यांचे या प्रश्नावर मतभेद झाले होते. रशियनपद्धतीची सेनारचना माओना मान्य नव्हती. गनिमी तंत्रच त्यांना अधिक पसंत होते. त्या बाबतीत नवे चिनी नेतृत्व *माओच्या मार्गापासून दूर जात आहे.*

लष्करावर राजकीय नेत्यांचेच नियंत्रण असले पाहिजे असा माओंचा आग्रह होता असे नियंत्रण नसेल तर लष्कराच्या हाती सत्ता जाईल आणि त्यातून लष्करी हुकुमशाही किंवा लष्करशाही निर्माण होण्याचा धोका माओंना वाटत होता आज चिनी कम्युनिस्ट पक्षावर लष्कराचा प्रभाव वाढला असून त्या दृष्टीनेही चीन माओच्या मार्गापासून दूर जात आहे असे म्हणावे लागेल.

नव्या चिनी नेतृत्वाने माओवादाशी पूर्ण फारकत घेतली आहे असा याचा अर्थ नाही. माओचा चीनवर अजून एवढा प्रभाव आहे की, त्यांच्या मताचा व धोरणाचा उघड विरोध करण्याचे धैर्य अजून काही वर्षे तरी नव्या चिनी नेत्यांना होणार नाही; पण उघड मतभेद किंवा विरोध न दर्शविता माओंची काही तत्त्वे व धोरणे कशी बाजूला सारली जात आहेत याचा उल्लेख मी वर केलाच आहे. अंतर्गत विकासावर नवे नेते अधिक भर देत असून परदेशातील कम्युनिस्ट चळवळी किंवा मुक्ति-आंदोलने यांना मदत करण्याकडे यापुढे कमी लक्ष दिले जाईल.

सर्वसाधारणपणे माओचेच परराष्ट्रधोरण नव्या नेत्यांनी पुढे चालू ठेवले आहे. त्यांचा रशियाविरोध थोडाही कमी झालेला नाही. रशियाशी संघर्षाची भीती त्यांना अजूनही वाटते आणि त्यात आपली बाजू बळकट करण्यासाठी अमेरिकेशी सलोखा करण्याचे माओचे धोरणही त्यांनी पुढे चालू ठेवले आहे; पण असा सलोखा हवा असला तरी आपल्या मुख्य मागण्यांवर नमते घेण्याची त्यांची तयारी नाही. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री व्हान्स यांनी नुकतीच पेकिंगला भेट देऊन चिनी नेत्यांशी बोलणी केली त्यात तैवानला पाठिंबा देणे अमेरिकेने सोडून द्यावे, तेथील अमेरिकन लष्कर काढून घ्यावे या मागण्या चीनने आग्रहाने मांडल्या. दोन बडी राष्ट्रे, इतर विकसित राष्ट्रे आणि अविकसित राष्ट्रे अशा तीन गटात जगाची विभागणी माओ करीत. नव्या नेत्यांना ते मान्य आहे. या प्रश्नावर अल्बानियाशी संबंध बिघडले तरी चिनी नेत्यांनी आपली भूमिका बदललेली नाही. तार्किकदृष्ट्या अल्बानियाची भूमिका बरोबर आहे. सर्व अविकसित राष्ट्रांना एका गटात घालणे योग्य नाही. त्यातली काही राष्ट्रे निश्चितपणे पाश्चात्यधार्जिणी व पाश्चात्यांच्या मदतीवर अवलबून आहेत; पण अविकसित राष्ट्रांचा नेता बनण्याची चीनची धडपड असून त्या दृष्टीने माओचीच भूमिका चिनी नेत्यांना सोयीची वाटते.

चीनचे आशियातील राष्ट्रांशी व विशेषत: भारताशी संबंध हा आपल्या दृष्टीने जवळचा विषय आहे. आशियातील अनेक देशांत चिनी अल्पसंख्य आहेत. त्यांनी त्या त्या देशाशी समरस व्हावे, त्याचे नागरिकत्व पत्करावे अशा सूचना चीनने त्यांना दिल्या आहेत. या देशातील कम्युनिस्ट चळवळींना चीन मदत करणार नाही असेही आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे मलेशिया, फिलिपाइन्स, इंडोनेशिया या राष्ट्रांशी चीनचे संबध सुधारले आहेत. व्हिएटनामशी मात्र त्याचे तेवढे सहकार्याचे संबंध नाहीत. कारण व्हिएटनाम स्वत:च आशियात बडी शक्ती होऊ पाहत आहे. पाकिस्तान व बांगला देशाशी मैत्रीचे सबध चीनने चालू ठेवले आहेत. भारताशी संबंध सुधारण्याच्या बाबतीतही सावधगिरीने पावले टाकली जात आहेत. दोन्ही देशांनी राजकीय सबध प्रस्थापित केले आहेत; पण त्यापलीकडे प्रगती झालेली नाही अनिर्णित सीमा प्रश्नाबाबत वाटाघाटीची भारताची तयारी आहे; पण चीनकडून अनुकूल प्रतिसाद अजून मिळालेला नाही. असे असले तरी आपला शेजारी या नात्याने चीनमधील नव्या प्रवाहांकडे आपले लक्ष हवे. □

# होनोलुलू येथील आंतरराष्ट्रीय बैठक रशियाचा निषेध !

चंद्रशेखर पुरंदरे

२८ ऑगस्टपासून हवाई बेटातील होनोलुलू येथे मानसोपचारतज्ज्ञाची एक आन्तरराष्ट्रीय बैठक सुरू झाली. ही सुमारे आठवडाभर चालणार होती. World Psychiatrists' Association ( WPA ) या सस्थेची हीं सहावी परिषद आहे. वस्तुत: अशा सघटना निरुपद्रवी असतात आणि औपचारिक वार्षिक ठराव पास करून अधिवेशने संपवितात; परंतु या वेळी मात्र ही सहावी कॉंग्रेस होणार होणार म्हणून आधीपासूनच गाजत होती. त्याचे कारण म्हणजे रशिया.

रशियातील राजकीय विरोधकाचे सरकारकडून केले जाणारे पद्धतशीर हाल हा विवाद्य प्रश्न होता आणि त्यानुसार रशियाचा निषेध करण्याचा ठराव कॉंग्रेसपुढे होता. एकूण साठ देशातील ४००० प्रतिनिधी तेथे जमले होते. त्यात रशियाचे तीसही सामील होते शिवाय रशियातून फुटून बाहेर आलेले काही प्रतिनिधी अनधिकृतपणे हजर होते. वस्तुत हा निषेध-ठराव ( तो कसा, कशाबद्दल, हे सविस्तरपणे याच लेखात पुढे दिलेच आहे. ) सोमवारीच मंजूर व्हायचा; पण रशिया व रशियाधार्जिणी पूर्व युरोपातील राष्ट्रे यानी हा राजकीय प्रचाराचाच भाग आहे असा ठराव आणण्याचा WPA ला अधिकारच नाही वगैरे मुद्दे उपस्थित करून तब्बल ४८ तास त्यावरील चर्चा पुढे ढकलली; पण अखेर हा ठराव बहुमताने मजूर करण्यात आला. रशियाला जागतिक सघटनेने मजूर केलेल्या या ठरावाने एक मोठा धक्का बसला आहे. कारण रशियाचा 'माणसात' येण्याचा प्रयत्न बराच काळपासून चालू आहे. त्याच वेळी रशियात केले जाणारे मानसिक हाल चवाठ्यावर आले आहेत केवळ ठरावच नव्हे तर WPA चा आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णयही रशियाला बोचक ठरण्याची शक्यता आहे. तो म्हणजे असे मानसिक हाल कोणत्याच देशात होऊ नयेत याकरिता 'ॲम्नेस्टी इटरनॅशनल' ही जशी सस्था आहे, तिच्याच धर्तीवर एक कायमची समिती बनवून तिने अशा तक्रारीची दखल घ्यावी.

या अधिवेशनात डॉ. मरीना विकान्स्काया व डॉ बोरीस झुबोक याने ( हे दोघेही रशिया सोडून आलेले आहेत. ) जे अनुभव सागितले त्याला अधिकृत रशियन प्रतिनिधी अनुउपस्थित होते; परंतु रशियातर्फेच आलेला सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आन्द्रे साखारोव हा मात्र उपस्थित होता.

रशियामध्ये राजकीय विरोधकाना किंवा रशियातील प्रस्थापित राज्यव्यवस्थेशी मतभेद दर्शविणाऱ्याना पद्धतशीर नाहीसे केले जाते सामान्य माणूस या प्रकाराविरुद्ध व दडपशाहीविरुद्ध सघटित नसल्याने व ताकद नसल्याने आवाज उठवीत नाही; परतु सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठित व अधिक सवेदनाक्षम माणसे कायमच आवाज उठवीत आलेली आहेत अलेक्झाडर सोल्झेनित्सिन हे नाव तर सुपरिचितच आहे; परतु आन्द्रे साखारोव हा शास्त्रज्ञ तर रशिया न सोडताच राज्यव्यवस्था वदलू इच्छित आहे. एकदा अशा विरोधकाना आतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली की, रशियाला त्याचा आवाज दडपणे जड जाते. म्हणून जो कोणी असंतोष प्रकट करू पाहील, त्याचा आवाज सुरुवातीलाच दडपण्यासाठी सरकारचा आटोकाट प्रयत्न असतो. यासाठी सगळयात भयानक प्रकार अवलंबिण्यात येतो तो म्हणजे अशा सशयिताचा मानसिक छळ. तथाकथित मानसोपचारकेंद्रे रशियात उभारण्यात आली आहेत ती याच हेतूच्या सिद्धीसाठी. तब्येतीने ठणठणीत असणारा माणूसही मानसिक दुखण्याच्या नावाखाली आत नेला जातो आणि मानसोपचाराच्या नावाखाली त्याचा मानसिक तोल ढळविण्यात येतो. एकदा असा एखाद्याला आयुष्यातून उठविला की रशियन गुप्त पोलिसखाते–KGB नव्या भक्ष्याच्या शोधाला निघते.

अशा विरोधाचा आवाज दडपण्याची चार उदाहरणे ( ती लाखोपैकी चार ) प्रकाशात आली आहेत. माणुसकीला काळिमा आणणारीही उदाहरणे उपरिनिर्दिष्ट बैठकीत जोरदार चर्चिली गेली

रशियातील युक्रेन भागातील इओसिप तेरेल्या याची पहिली केस वयाच्या एकोणिसाव्या वर्षी १९६२ साली त्याला राज्यसत्तेशी सशस्त्र झगडा करण्यचा प्रयत्न केला म्हणून अटक करण्यात आली आणि चार वर्षांची शिक्षा ठोठाविण्यात आली. तिथून तो सुटल्यावर त्याला १९७२ मध्ये युक्रेन प्राताच्या फुटीरतेचा प्रचार केल्याबद्दल परत अटक करण्यात आली आणि आधीच्या त्याच्या कर्तृत्वामुळे सरळ मॉस्कोच्या पश्चिमेला असणाऱ्या सायचोवका या मानसिक रुग्णकेंद्रात तीन वर्षांसाठी अडकविण्यात आले. तेथे त्याचा कॅथॉलिक धर्मावरचा विश्वास उडविण्यासाठी अघोरी उपाय योजण्यात आले; पण या साऱ्यातून तो खबीर मनाने सावध राहिला. १९७६ मध्ये त्याची सुटका करण्यात आली. मग त्याने १९६२ पासून त्याच्यासाठी थाबलेल्या त्याच्या प्रेयसीशी लग्न केले त्याला एका ठिकाणी नोकरीही मिळाली, पण लवकरच नोकरीतून त्याची KGB च्या आदेशावरून हकालपट्टी झाली. KGB त्याला दहशत दाखविण्याचे काम अव्याहत चालू ठेवीतच आलेली आहे त्याला परत दोन आठवड्यासाठी अडकविण्यात आले. तेव्हा अखेर त्याने युरी आन्द्रोपोव या KGB च्या प्रमुखाला पत्र टाकून तेथे करण्यात येणारे हाल, इस्पितळात असणारे आणखी अनेक प्रमुख राजकीय, धार्मिक नेते व त्याची स्थिती याचे अगावर काटा आणणारे वर्णन केले आणि

हेच पत्र नेमके प्योत्र ग्रिगोरेंको या जनरलने युक्रेनियनमधून इंग्रजीत भाषांतरित केले आणि युरोपात धाडले. या वर्षीच्या उन्हाळयात ते युरोपात प्रसिद्ध झाले आणि खळबळ माजली त्यामुळे साहजिकच सरकारचे पित्त खवळले आणि परिणामतः तेव्हा परत एकदा मेंटल हॉस्पिटलची वाट चालू लागला. या वेळी त्याला रशियाच्या ट्रान्सकार्पेथिअन विभागातील बेरेगोवा मेंटल हॉस्पिटलमध्ये बेमुदत ठेवण्यात आलेले आहे. त्याच्या बायकोने (ती स्वत डॉक्टर आहे) वारंवार तो डोक्याने शाबूत असल्याचे सांगितल्यावर तिथल्या डॉक्टरांनी 'ते सरकार ठरवील' असे नमुनेदार उत्तर दिले !

दुसरी घटना डॉक्टर मरिना वोय्कान्स्काया या लेनिनग्राडहून सायकिअॅट्रीचीच पदवी घेतलेल्या व आता ब्रिटनमध्ये स्थायिक झालेल्या आघाडीच्या सायकिअॅट्रिस्टची आहे तिने १९७५ ला देश सोडला. तोपर्यंत तिने सरकारला विरोध केला. तिचा ११ वर्षांचा मुलगा अजून तिला परत मिळालेला नाही. इंग्लंडमधील केंब्रिज मतदारसंघातून निवडून आलेला रोड्स् जेम्स हा खासदार या बाबतीत इंग्लंडमधल्या रशियन दूतवासाशी संपर्क साधून होता. 'मिशा' या त्या ११ वर्षांच्या मुलाची आईशी गाठ पडावी म्हणून त्याने अर्जही केला. 'हा प्रश्न रशियाच्या अन्तर्गत न्यायव्यवस्थेशी संबंधित आहे त्यामुळे बाहेरच्या लोकांनी खोटया बातम्यांवर विश्वास ठेवून अशी ढवळाढवळ करणे खेदजनक आहे. कुटुंबातील अन्तर्गत संबंध फार नाजूक असतात. केवळ कुटुंबातील एका व्यक्तीची बाजू ऐकून आपले मत बनविणे योग्य नव्हे' वगैरे वगैरे मखलाशी केली.

बेनिआमिन लेविश हा रशियन ज्यू शास्त्रज्ञ. जुलै महिन्यात ऑक्सफर्डमध्ये International Physics Scientists' Conference'ला हजर रहाण्यासाठी त्याने परवानगी मागितली. ती त्याच्या अशाच विरोधक पार्श्वभूमीने फेटाळलीच गेली असे नाही, तर २४ ऑगस्टच्या मॉस्कोमधील पत्रकारपरिषदेतून त्याचा कृतघ्न, अयोग्य माणूस म्हणून निषेधही करण्यात आला. तेवढ्यावरही न थांबता ही फिजिक्स-शास्त्रज्ञाची संघटना रशियाविरोधी असून इस्राएलच्या बाजूने कटकारस्थानात आहे असाही आरोप करण्यात आला.

रशियामध्येच राहून जनमत सरकारच्या दडपशाहीविरुद्ध उभे करण्यासाठी एक अनधिकृत संघटनाही स्थापण्यात आली आहे. तिचे नाव 'Working commission to Investigate the Use of Psychiatry for Political Purposes.' या समितीतर्फे जगाला रशियाच्या या तथाकथित मानसोपचार करून माणसे निकामी करण्याच्या भयानक खेळाकडे तातडतोब लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मध्यंतरी Punitive Medicine हे पुस्तक पाश्चिमात्य जगात फार गाजले होते. सशयिताना मेंटल हॉस्पिटल या मानसोपचारकेन्द्रात दाखल करून घेतल्यावर त्याना कोणती औषधे व वागणूक कशी देण्यात येते त्याचे यात सविस्तर वर्णन होते. 'पॅरॅनॉइड स्झिोफ्रेनिया' या रोगानेच बहुसंख्य रुग्ण आजारी असल्याचे नंतर कसे सांगण्यात येते तेही यात उघड केलेले होते. याचा लेखक अलेक्झांडर पोद्राबिनेक ह्यालाही नुकतीच दहा वर्षांच्या अंधारकोठडीची (हे उद्योग सोडले नाहीत तर) धमकी देण्यात आली आहे. WPA ला केलेल्या आवाहनावर मिस् शरिना काप्लन आणि फेलिक्स सेरेब्रो या व्यक्तींच्याही सह्या आहेत. ही मंडळी केवळ जिवावर उदार होऊन हे कार्य करीत आहेत.

हेल्सिंकी करारान्वये ठरलेल्या तत्त्वांना रशियाने हरताळ फासला आहे. हेल्सिंकी-कराराचे जे पाठिराखे त्यांच्या तत्त्वाची अमलबजावणी करा म्हणतात त्यांच्या नशिबीही याच हाल-अपेष्टा येतात २४ ऑगस्टला घेतलेल्या पत्रकार-परिषदेत आन्द्रे साखारोव आणि जनरल प्योत्र ग्रिगोरेंकोने अशाच आणखी तीन पाठिराख्यांना सरकारने अटक केल्याची खळबळजनक माहिती दिली. त्यात या ४७ वर्षांच्या सेरेब्रोवचाही समावेश आहे. इतर दोघे लिथुआनिआतील आहेत.

या साऱ्या घटनांचे पडसाद होनोलूलूच्या बैठकीत उमटावेत अशासाठी रशियाबाहेर असणारे रशियन्स प्रयत्नशील होते. WPAची ६ सभासदांची एक समिती बनविण्यात आली आहे. ती या आन्तरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नावर प्रमुख निर्णय घेईल तिचा एक सभासद मारात वर्तन्यन् हा रशियन आहे हे लक्षणीय.

रशियाला WPA ही डोकेदुखी झालेलीच आहे. ७३-७४ मध्ये तर रशियाने WPA ने रशियात मानसोपचारपद्धतीचे कौतुकच केल्याची तद्दन खोटी बातमी छापली होती. आताचे अधिवेशनही रद्द करण्याचे बरेच प्रयत्न करण्यात आले. त्यात परत त्या ११ वर्षांच्या मुलाची आई डॉ. मरिनाने रशियाच्या प्रश्नावर भाषण दिले !

व्लादिमिर बुकोवस्कीने १९७१ साली असाच एक प्रचंड गुप्त अहवालाचा ठोकळा मोठ्या हिकमतीने ७१ च्या मेक्सिको अधिवेशनात पोचविला होता; पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या वेळी मात्र प्रश्न गंभीर होता. रशियाचा निषेध करण्याचाच ठराव सरळ अधिवेशनापुढे आला आणि अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांनी त्याला पाठिंबा दिला. कम्युनिस्ट राष्ट्रे विरुद्ध गेल्याने प्रश्न आणखी चिघळण्याचीच शक्यता होती. मात्र व्लादिमीर बुकोवस्कीने म्हटल्याप्रमाणे WPA चा निर्णय हा हजारो लोकांचे आशास्थान राहील. अन्यथा रशियातील दडपशाही कमी होण्याची चिन्हे नाहीत या Declaration of Hawai'चा दृश्य परिणाम साखारोवचे रशियात परत कसे स्वागत होते यावरून दिसेल.

## पृथ्वीवरील जीवनाची सुरुवात

आजवर या मूळ विषयावर अनेक मते मांडण्यात आलेली आहेत. सध्या मात्र सर फ्रेड हॉइल व विक्रमसिंगे या दोन शास्त्रज्ञांनी मांडलेली क्रान्तिकारी उपपत्ती विचाराधीन आहे. त्याच्या मते पृथ्वीवर अणुप्रक्रियेने जीवोत्पत्ती झाली नाही. बाहेरच्या ठिकाणांहूनच येथे पहिला जीव आला

इन्फ्रारेड किरणांमधून ताऱ्याकडे पाहिले असता, ते ज्या रंगाचे दिसतात, त्यावरून अवकाशात सेल्युलोजचे अणु असण्याची शक्यता आहे असा त्याचा सिद्धांत आहे जर असे अणू अस्तित्वात असतील, तर ते एकत्र येऊन मध्ये कोणताही अडथळा न आल्याने पृथ्वीवर आले असतील. त्यापासून पुढे जीवोत्पत्ती झाली असावी.

या दोन शास्त्रज्ञांच्या या सिद्धांताला अजून कोणीही आव्हान दिलेले नाही. काही वर्षांपूर्वी हॉयलने, स्वत. 'The Black Cloud' म्हणून एक सायन्स फिक्शन कादंबरी लिहिली होती त्यात त्याने नेमकी हीच शक्यता व्यक्त केलेली होती जर ही शक्यता खरी असेल, तर पृथ्वीवर ज्याप्रमाणे ते अणु आले, तसेच ते अवकाशातील इतर ग्रहांवर गेले असण्याची शक्यता उघड आहे त्यामुळे संभाव्य मार्गाच्या व वातावरणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने आता संशोधन चालू आहे. ☐

आर्थिक टिपणे :

# आंतरराष्ट्रीय दडपणे !

नारायण वैद्य । सभासद, पुणे महापालिका

## □ कोकाकोला-प्रकरण

कोकाकोला तयार करणारा कोकाकोला कंपनीचा एक विभाग भारतात आहे. सदर पेयासाठी लागणारा अर्क अमेरिकेतून आयात करण्याचा परवाना (पूर्वीच्या), भारतसरकारने त्या कंपनीला दिला आहे. त्यात पाणी इ. मिसळून बाटल्या भरण्याचे काम येथे चालते. प्रचड लोकसंख्येच्या या देशात कोकाकोलाचा खप बेसुमार आहे. देशी बनावटीच्या पेयांच्या खपावर या आर्थिकदृष्टया संपन्न असलेल्या बहुदेशीय (multinational) कपनीचे फार मोठे अतिक्रमण चालू असते. ' अमेरिकन कोकाकोला कंपनीचे येथील कारखान्यात जे भाडवल आहे ते फक्त ४० टक्के ठेवावे व उरलेले भांडवल येथील जनतेचे म्हणून घ्यावे, तसेच अशा संयुक्त कारखान्याकडे कोकाकोलाचा अर्क येथेच तयार करण्याचे तात्रिक ज्ञान सुपूर्त करावे ' अशी मागणी भारत सरकारची आहे. ' जगभर खपणाऱ्या या पेयाचा दर्जा येथेही चागला व स्थिर राहावा यासाठी अमेरिकन कंपनीला हे (हस्तांतर) शक्य नाही ' असे कंपनीने कळविले आहे. अमेरिकेचे भारतातील राजदूत डॉ. रॉबर्ट एफ् गोहीन एका वार्ताहरपरिषदेत म्हणाले, ' कोकाकोला-प्रकरण ' प्रातिनिधिक ' (Symbolic) आहे; परंतु या प्रकरणामुळे भारतात विविध उद्योगांत भांडवल गुतवू इच्छिणाऱ्या अमेरिकन उद्योगपतीवर याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. '

कोकाकोलासारख्या पेय बनविणाऱ्या कपनीबाबत भारतात ( व परदेशातही ) या मुद्द्यावर इतका गाजावाजा व्हावा हा एक मोठाच विनोद आहे. या निमित्ताने या पेयाची देशभर जी जाहिरात झाली ती लाखो रुपये खर्चूनही झाली नसती याबद्दल ' कोका-कोला 'वाले आनदात असतील. एकूण हा प्रश्न प्रतिष्ठेचा बनला आहे सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटयूटने कोका-कोलासारखे पेय तयार करण्यात यश मिळविले आहे असे व्यापारमत्री मोहन धारिया व उद्योगमत्री श्री. जॉर्ज फर्नांडिस यानी जाहीर केले आहे हा ' शोध ' दोन-तीन वर्षांपूर्वीच लागला आहे असे म्हणतात. श्री. एच्. व्ही. कामथ यानी ' ७७ ' हे नाव सुचवून त्याचे बारसेही केले आहे. प्रश्न असा पडतो की दोन वर्षापूर्वीच या भारतीय फॉर्म्यूलाचा शोध लागूनही तो अधारात का राहिला ? त्याबाबत काही ' परकीय ' दडपण होते का ? का येथील काही बडच्या मंडळीचे हात या प्रकरणी गुतल्यामुळे कोकाकोलाच्या खपावर भारतीय पेयाचा परिणाम होऊं नये म्हणून दडपादडपी झाली ? कोकाकोला बनविणाऱ्या कंपनीचा दावा असा आहे की, त्यांचा फॉर्म्यूला इतका गहन आहे की, तसा अर्क कोणीही बनवू शकणार नाही !

परंतु या प्रकरणात सामान्य भारतीय माणसाला एक गोष्ट खटकते, ती ही की प्रचंड लोकसख्येच्या, लोकशाहीचे दृष्टीने एका बलाढ्य सरकारला साधे पेय बनविणारी एक परदेशी कपनी आव्हान देऊ शकते ! या देशात पेय बनविणाऱ्या दुसऱ्या मोठ्या देशी कपन्या नाहीत का ? कोकाकोलासारखे पेय मिळाले नाही तर माणसे पटापट मरणार आहेत की काय ? ज्या देशात कोकाकोला नाही तेथे काय घडते ? जनता सरकार महात्माजीचा आर्थिक धोरणाचा वारसा पुढे चालवू म्हणते तर खाद्य-पेयाच्या बाबतीत पूर्णपणे स्वदेशीचा पुरस्कार केला पाहिजे ! इतके दिवस कोकाकोला कंपनी काही कोटींनी येथून नफा गोळा करून घेऊन जात आहे हे घडले कसे ? काही झाले तरी या निमित्ताने कोकाकोलासारख्या खाद्य-पेय बनविणाऱ्या कंपन्यांची येथील मक्तेदारी संपली पाहिजे. स्वदेशी उत्पादनाला वाव मिळाला पाहिजे, नव्हे तसा आग्रह सरकारचा असला पाहिजे. या प्रकरणाबाबत अमेरिकन राजदूतही बोलले म्हणजे भारत सरकार व अमेरिकन सरकार याच्या सबधातला हा वाद आहे काय ? राजकीय स्तरावर हा वाद नेऊन यात अमेरिकेला काही साधायचे असेल असे वाटत नाही. ' सत्याहत्तर ' हे देशी पेय (कोकाकोलाच्या तोडीचे असो वा नसो) बनविण्याचा कारखाना तावडतोब सुरू करावा व कोकाकोला कपनी येथे बंद झाल्यामुळे बेकार होणारे कामगार व व्यवस्थापन याना नव्या भारतीय कपनीत सामावून व हा प्रश्न येथेच सपवावा.

फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन अॅक्ट (FERA फेरा) हा कायदा पास झाल्यावर कोका-कोला प्रकरण गेली चार वर्षे भिजत पडले आहे. धडकी भरावी असा ' फेरा ' हा शब्द नाही. या कायद्यानुसार भारतात ज्या परदेशी व्यापारी कपन्या आहेत त्यानी आपले (परकीय) भाडवल फक्त ४० टक्के ठेवावे व बाकीचे भाडवल गुतविण्यास देशी कंपन्याना ( वा भारत सरकारला ) मुभा ठेवावी. काही प्रकरणी महत्त्वाचे तात्रिक ज्ञान किंवा निर्यात अशा मुद्द्याचा सबध येईल तेथे हे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा अधिकही ठेवण्यात आले आहे. तसेच काही कंपन्यांत हे प्रमाण ४० पेक्षा कमीही आहे. फेरामध्ये परकीय कपनीच्या व्यवस्थापनात ढवळाढवळ नाही. कित्येक कपन्यांनी हा कायदा मानूनसुद्धा व्यवस्थापनावर नियत्रण त्यांचेच आहे. फक्त नफ्यातला वाटा कमी होतो. कोकाकोला कंपनीला भारतात वर्षाला सुमारे १० कोटी रुपये नफा होतो असे म्हणतात. एखाद्या दुर्मिळ किंवा औद्योगिकदृष्टया महत्त्वाच्या प्रकल्पात नफा कमी होतो म्हणून परदेशी कपनीने तक्रार केली तर समजू शकते. उद्या कोणी परकीय कपनी म्हणेल की, आइस्क्रीम, लोणची, पापड, मुरावे, ब्रेड याचे कारखाने आम्ही येथे

काढतो व सर्व नफा परदेशी घेऊन जातो तर ते आपण चालू द्यावयाचे का ? *

## 'तारापूर'ची अडवणूक

तारापूर अणुविद्युतकेंद्राला सुधारित ( enriched ) युरेनियम पुरविण्याबाबत अमेरिका आणि भारत याच्यात ( असाच एक ) नवा वाद निर्माण होऊ पाहात आहे. अमेरिकेने तारापूर केंद्राला हे सुधारित युरेनियम पुरविण्याबाबत बरेच दिवस घोळ चालू होता. शेवटी गेल्या महिन्यात १२ टन युरेनियम पाठविण्याचे अमेरिकेने मान्य केले; पण त्यापाठोपाठ एक नवीन करार भारतावर लादला जावा असे दडपण येत असल्याचे वृत्त आहे

२५ ऑक्टोबर १९६३ ला भारत–अमेरिका यामध्ये एक करार अस्तित्वात आला. अणुशक्तीचा उपयोग शांततामय कार्यासाठी करण्यात परस्पर सहकार्य देण्यासबधीचा हा करार आहे व त्यामध्ये तारापूर अणुकेंद्राला सुधारित युरेनियम कायमचे ( Life time ) पुरविण्याची तरतूद आहे. या करारानुसार भारताने इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सीबरोबर त्रिपक्ष करार केलेला आहे. त्यानुसार सदर एजन्सीने तारापूर प्लँटची नियमितपणे तपासणी करावयाचे वचन मान्य करण्यात आले आहे. तसेच अमेरिकेन सरकारने वेळोवेळी याबाबत प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्तात हे मान्य केले आहे की, तारापूर भट्टीमधील कोणतेही अणुविषयक पदार्थ वा द्रव्य अणुशस्त्रांची निर्मिती करण्यासाठी भारत वापरत नाही. उलट तारापूर रिॲक्टर्समध्ये इंधन म्हणून सुधारित युरेनियम वापरल्यानंतर जो पदार्थ रक्षा म्हणून बाहेर पडतो त्या पदार्थाचे पुढे काय करावयाचे हा प्रश्न येथील शास्त्रज्ञापुढे व अधिकाऱ्यांपुढे उभा आहे. या रक्षेपासून प्रक्रिया करून प्ल्युटोनियम तयार करण्यास अमेरिकन सरकारची परवानगी नाही किंवा करारात चालू किंमतीला ती रक्षा पुन्हा खरेदी करण्याची तरतूद असताना तसे करण्यासही अमेरिका तयार नाही.

याबाबत पूर्वीच्या करारापासून अमेरिकन सरकार दूर जात आहे असे दिसते. कारण केवळ तारापूर अणुविद्युतकेंद्रासाठीच सुधारित युरेनियम पुरविण्याची जबाबदारी अमेरिकेने पूर्वीच्या करारानुसार उचललेली असली तरी देशातले अणुविषयक सर्व प्रकल्पाची आंतरराष्ट्रीय तपासणी करू देण्याचा नवा करार करण्याबाबत भारतावर सर्व बाजूनी दडपण येत आहे. ( या सर्व प्रकल्पांमध्ये भारतीय शास्त्रज्ञानी आणि तंत्रज्ञानी स्वदेशी तंत्रज्ञान वापरून उभारलेल्या अणुशक्तिकेंद्राचा व प्रकल्पाचाही समावेश आहे )

एखाद्या गरीब माणसाच्या मुलाना दूध मिळत नाही म्हणून श्रीमत शेजाऱ्याने त्याला म्हैस घेण्यास सागावे व म्हैस मरेपर्यंत तिला फुकट चारा पुरविण्याचे वचन द्यावे, परंतु पुढे 'तुझ्या घरातील दुधासकट सर्व खाद्यपदार्थांची तपासणी करू दे नाही तर गवत–चारा बद करतो' अशी धमकी द्यावी असा हा प्रकार आहे अमेरिकेने १२ टन सुधारित युरेनियम जे पाठविण्याचे मान्य केले ते डिसेंबरपर्यंत पुरेल असा अंदाज आहे त्यानतरचे ७ टन जर वेळेवर आले नाही तर तारापूर अणुविद्युतकेंद्र बंद करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. युनायटेड स्टेट्स् न्युक्लिअर रेग्युलेटरी कमिटीने ( NRC ) १२ टन युरेनियम पाठविण्याची शिफारस केली तेव्हा असे वाटले की प्रेसिडेंट कार्टर याच्या 'विद्युतनिर्मितीसाठी प्रामाणिकपणे उपयोग करणाऱ्या देशाना युरेनियम पुरविण्यात अडचण येणार नाही.' या धोरणाला अमेरिकन सरकार चागला प्रतिसाद देत आहे; परंतु आता असे दिसते, की प्रेसिडेंट कार्टर यांच्या एन. आर सीमधील हस्तक्षेपामुळे हे १२ टन युरेनियम मिळाले असावे. भारत–अमेरिका-सबध सुधारण्यासाठी प्रेसिडेंट कार्टर याची ही खटपट एन. आर. सी. यशस्वी होऊ देणार नाही की काय ?

तारापूर अणुविद्युतकेंद्राला इंधन म्हणून युरेनियम पुरविण्याचे थांबवावे व भारतातील सर्व अणुशक्तिकेंद्रे–मग ती अमेरिकेच्या मदतीने उभारलेली असोत वा नसोत–त्यांची आंतरराष्ट्रीय तपासणी करू देण्यास भारताला भाग पाडावे अशी मागणी एन्. आर. सी. मधील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ अनेक वर्षांपासून करीत आहेत. अणुविषयक वाटाघाटी असोत वा इतर विषयावावत असोत, त्या सफल होण्याच्या प्रक्रियेतला एक भाग म्हणून तारापूर अणुविद्युतकेंद्राला युरेनियम पुरवठा केला जात आहे असे अमेरिकन सरकार सागत आले आहे. अशा परिस्थितीत अमेरिकन सरकारच्या संबंधित खात्याला भारताशी चागले संबंध ठेवण्याच्या प्रयत्नांत एन. आर. सी. सहकार्य करील असे वाटत नाही. या प्रकरणाबाबतचा आपली तीव्र प्रतिक्रिया अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटमधील अणुविषयकतज्ज्ञ श्री. जोसेफ नाय याचेजवळ भारताने व्यक्त केली आहे.

प्रकरण कोकाकोलाचे असो वा अणुविषयक अडवणुकीचे असो, दबावाचे राजकारण भारताला दीर्घकाळ परवडणारे नाही. स्वाभिमान व स्वातंत्र्य विकून त्याच्या मोबदल्यात काही घ्यावयाचे नाही असे जनतेनेच आता ठरवावे. 'सुरक्षिततेची हमी' म्हणून सर्व अणुकेंद्राची तपासणी करू देण्याची परवानगी देण्याचे परिणाम फार गंभीर होतील तारापूर अणुभट्टया बद पडल्या तरी चालतील त्यामुळे पर्यायी इंधन शोधण्याच्या कार्याला भारतीय शास्त्रज्ञ वेगाने लागतील. तसेच सुधारित युरेनियम अमेरिकेशिवाय दुसऱ्या देशांतून मिळविण्याची खटपट करावी. फ्रान्स व रशिया हे देश ते पुरवू शकतात; पण तेही अशीच 'सुरक्षिततेची हमी' म्हणून काही बंधने घालू पाहातील. कारण गेल्या वर्षी राजस्थान रिॲक्टरसाठी २०० टन हेवी वॉटर पुरविण्याचे रशियाने मान्य केले होते; परतु असे कळते की त्याही वेळी राजस्थान रिॲक्टरसह देशातील सर्व अणुशक्तिकेंद्राची सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करू देण्याची अट रशियाने घातली होती. भारताने ती अर्थातच अमान्य केली होती. गॅस–डिफ्युजन पद्धतीवर सुधारित युरेनियम तयार करण्याची भट्टी देशात उभारली जात आहे. ती १९८१ मध्ये कार्यान्वित होईल. केरळच्या किनाऱ्यावरील वाळूत (U–२३२) मिळू शकेल व त्याचा उपयोग तारापूर अणुभट्टीसाठी होऊ शकेल अशी वार्ता आहे. आज दुसरा पर्याय आपल्यापुढे नाही. तरीसुद्धा शरणागती पत्करणारा कोणताही करार आपण यापुढे करू नये. *

## भाऊगर्दी !

मुंबई बंदरात परदेशाहून येणाऱ्या बोटींची भाऊगर्दी झालेली आहे बंदरात दाखल झालेल्या अनेक बोटींना माल उतरवून घेण्यासाठी धक्क्याला लागायला १५ दिवस थांबावे लागते. पूर्वी इतका खोळंबा होत नव्हता. बॉम्बे पोर्टट्रस्टचा प्रवक्ता म्हणाला, '१ ऑगस्ट रोजी ४० बोटी खोळंबून समुद्रात उभ्या होत्या. सध्या पावसामुळे माल उतरवून घेण्यात अडथळा येतो हवा चांगली पडली तर बरीचशी गर्दी कमी होईल.' मालवाहू बोटींना अनेक दिवस थांबावे लागते याचे कारण केवळ 'हवा' हे नाही फेब्रुवारी ७७ मध्ये इंदिरा–गोदीमधील लॉकगेटला एका बोटीने धडक मारली व गेट मोडले. त्यामुळे समुद्राच्या लाटा आतपर्यंत येऊ लागल्या. त्यामुळे बोटींना प्रवेश देणे व मालाची चढ-उतार करणे यांचा वेग बराच कमी झाला. मेमध्ये लॉकगेट दुरुस्त झाले; परंतु गोदीकामगाराचा १० दिवसाचा सप त्या महिन्यात झाला. जून-जुलैमध्ये सपाचे वातावरण म्हटले नाही तरी होतेच. त्यामुळे मदगतीने कामे चालू होती. गेल्या ६ महिन्यातल्या या परिस्थितीमुळे बोटीतील मालाच्या चढउताराबर मोठाच परिणाम झालेला आहे म्हणून बंदरात बोटींची भाऊ–गर्दी ! □



# नक्षलवादाच्या शोधात

लेखांक नऊ

## काळाच्या कसोटीवर नक्षलवाद

शिरीष सहस्रबुद्धे । चन्द्रशेखर पुरंदरे

मागील लेखात म्हटल्याप्रमाणे ठिकठिकाणच्या माओवादी उठावानंतरही नेतृत्व चाचपडतच राहिले. कोणत्याही नवीन तत्त्वज्ञानाचा अभूतपूर्व असा वापर करताना हे अपरिहार्यच होते. तरीही क्रांतिकारक या नात्याने जी किमान संवेदनशीलता अपेक्षित असते, तिच्याबाबतीत नेतृत्व व पर्यायाने नक्षलवाद थिटा पडला.

विशेषतः चारु मुझुमदारच्या बाबतीत हे खरे ठरले. मुशाहरी व गोपीवल्लभपूर यांच्या अपयशानंतर त्याने नक्षलबारी व श्रीकाकुलम् या मार्गांवरून चळवळ न नेता गोपीवल्लभपूरच्याच मार्गाने न्यावी असा निर्णय घेतला.

मुझुमदारच्या मते नक्षलबारीने एकूण सहा मुद्दे स्पष्ट झाले :

१ : शेतकरी राजसत्तेसाठी लढले, जमीन वा पिकांसाठी नाही.

२ : त्यांनी राज्याच्या सशस्त्र हल्ल्यांना सशस्त्र हल्ल्यांनीच प्रत्युत्तर दिले.

३ : गावठी शस्त्रांवरच भिस्त टाकून त्यांच्या मदतीने जेवढी आधुनिक शस्त्रे मिळविता आली, तेवढी त्यांनी मिळविली.

४ : ते पूर्णपणे स्वावलंबी होते.

५ : प्रतिक्रियावाद्यांनाच निवडून त्यांनी ठार मारले.

६ : याचाच अर्थ असा की, माओच्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला होता व ते त्यांना पूर्णपणे पटलेले होते. तसेच श्रीकाकुलम्‌वरून असे लक्षात आले की, गनिमी काव्याचे युद्ध हाच दीर्घकालीन युद्धाचा एकमेव संभाव्य प्रकार होता. तरीही आणखी चार प्रश्न राहिले. त्यांचे स्पष्टीकरण मुझुमदारने केले :

१ : गनिमी युद्ध कोठे सुरू करावे? गनिमी युद्ध फक्त वन्य प्रदेशात व पर्वतराजीमध्येच सुरू करता येते हे खोटे आहे. सखल प्रदेशातही ते सुरू करून वाढविता येते. किंबहुना जेथे जेथे शेतकरी आहेत तेथे तेथे ते सुरू करता येईल, मग तो प्रदेश कसाही असो. कारण माओने म्हटल्याप्रमाणे फक्त शेतकऱ्यांच्याच सहभागाने ते पुढे नेता येईल.

२ : जनसंघटन आणि जनआंदोलन यांखेरीज गनिमी युद्ध टिकू शकेल काय? या दोन्ही गोष्टींचा गनिमी युद्धाशी काहीच संबंध नाही. त्या गोष्टी गनिमी युद्ध करणाऱ्याच्या मार्गातील अडथळेच आहेत.

३ : या गनिमी युद्धासाठी कोणावर अवलंबून राहावे? फक्त

गरीब व भूमिहीनवर्गच हा लढा पुकारू शकेल ज्या ज्या ठिकाणी पेटी बूर्ज्वा इंटेलिजेन्शियाने लढ्याचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला तेथे तेथे लढा पुढे सरकू शकला नाही आणि वर्गलढा या सदरातही बसू शकला नाही.

४ · गनिमी युद्ध कसे सुरू करावे ? वर्गशत्रूचे निराकरण करून ग्रामीण विभाग सरंजामशाहीपासून मुक्त करणे.

राज्यसत्ता हस्तगत करण्याच्या या भरावर चीनने जोर दिला, पण चीनने प्रत्येक वेळी जास्तीत जास्त लोकांचा सहभाग आहे वा नाही हे पाहण्याचा सल्ला दिलेला आढळतो. इथेच CPC व CPI (ML) च्या भूमिकातील फरक स्पष्ट होतो. १९७० च्या फेब्रुवारी लिबरेशनच्या अंकातील 'पेकिंगरिव्ह्यू'च्या लेखाप्रमाणे चीनने सोईस्कर गैरसमज करून घेतलेला दिसतो.

## मुझुमदारचे मर्डर मॅन्युअल

मुझुमदारला १९७०–१९८० हे दशक मुक्तिदशक व्हायला हवे होते. त्याने पुढील मार्ग सांगितला : 'एक विशिष्ट विभाग निवडा. आपले पथक निश्चित करा. त्या विभागात निराकरण पूर्ण करा. तशाच पद्धतीने सगळीकडे ही क्रांती पसरवा!' मर्डर मॅन्युअल म्हणून जे पत्रक त्याने प्रसिद्ध केले ते स्वप्नाळूपणावरच जास्त अधिष्ठित होते. मनोरंजन म्हणून ते इथे द्यायला हरकत नाही. 'पेटी बूर्ज्वा इंटलेक्चुअलने खेड्यात जायचे. जो शेतकरी क्रांतिदृष्ट्या त्याला परिपक्व वाटेल त्याच्या कानात कुजबुजायचं · 'या जमीनदाराची इहलोकीची यात्रा संपवायची वेळ जवळ आली आहे असं नाही का तुला वाटत ?' असेच आणखी सहा निवडून सातजणांची एक तुकडी तयार करायची. त्यात कमालीची गुप्तता पाळायची. साधारण बहुमत ज्याच्या विरुद्ध असेल त्या जमीनदाराचा बकरा करायचा हे ठरवायचं. विळे, कोयते, जंबिये, भाले ही गावठी शस्त्रच वापरायची. हल्ला नीट आखायचा. पहिला प्रयत्न सर्वांत महत्त्वाचा श्रीमंत शेतकरी, मध्यमवर्गीय शेतकरी आणि पेटी बूर्ज्वा याना शक्यतो तुकडीतून डच्चू द्यायचा. मग मूळ काम फत्ते झाल की तुकडीन परागंदा होऊन झालेल्या घटनेच्या आधारे जनजागरण करायच. अशाच प्रकारे निराकरणाची संख्या वाढली की, लोकांना पीक बळकावण्याच्या सूचना द्यायच्या. वस्तुत. माओने 'ठार मारणे' या प्रकारावर सगळयात कमी भर दिलेला आहे. वर्गशत्रूचा भेद करणे ही नीती प्रमुख. वर्ग म्हणून तो नष्ट करायचा, व्यक्ती नव्हे अगदीच जो क्रूरकर्मा आणि अन्यायी असेल त्याच्यावर पीपल्स कोर्टमध्ये आरोप जर सिद्ध झाले तरच त्याला फाशी द्यावी. हा फरक अर्थातच CPI(M–L)च्या बाहेर राहिलेल्या, त्यामानाने खऱ्या माओवाद्यांच्या लक्षात आलेला होता. त्यांच्यावर मुझुमदारने प्रतिक्रियावादी, प्रतिक्रांतिवादी, इतिहास याचे पितळ उघडे पाडील असे शिव्याशाप देऊन तळतळाट व्यक्त केला. इतिहासाने मात्र मुझुमदारलाच अयशस्वी ठरविले. फेब्रुवारी १९७० मध्ये 'लिबरेशन'मधून परत एकदा माओ–लिनपिआओच्या नावाचा गजर करण्यात आला. याच सुमाराम दुर्दैवाने (आणि जे कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीने अपरिहार्य ठरले) मुझुमदारचे व्यक्तिमाहात्म्य वाढू लागले. मुझुमदारला विरोध हा क्रांतीला विरोध ठरू लागला. डोळस परीक्षण बंद पडले. मुझुमदारला 'भारताचा माओ' म्हणण्यापर्यंत मजल गेली. 'श्रीकाकुलम्ची मशाल विझणार नाही' असे जेव्हा तो म्हणाला होता त्या वेळेला श्रीकाकुलम्वर काजळी धरू लागली होती आणि हा मिणमिणता प्रकाश जेव्हा अंधाराची वाट धरीत होता तेव्हा त्या क्रांतिसूर्याने आपले डोळे दिपल्याचा अभिनय करण्यात मुझुमदार आणि मंडळी गर्क होती. १९७० च्या मध्यापर्यंत भारताचे येनान–श्रीकाकुलम्–विझले होते.

## परत एकदा आंध्र

आंध्र नक्षलवादाचे CPI(M–L) शी तात्त्विक मतभेद फारसे नव्हते. भारत अर्धवसाहत आहे, कॉम्प्रादोर ब्यूरोक्रॅट कॅपिटॅलिझम हा आंतरराष्ट्रीय साम्राज्यवादाचा भारतातील हस्तक आहे व तो प्रमुख शत्रू आहे, कष्टकरीवर्गाच्या संघटनेने प्रश्न सुटतील, राष्ट्रीय लोकशाही क्रांतीची वेळ आलेली आहे इत्यादी गोष्टींवर फारसे मतभेद नव्हते. एप्रिल १९६९ च्या आंध्रप्रदेश रिव्होल्यूशनरी कम्युनिस्ट कमिटीच्या 'इमिजिएट प्रोग्रॅम' या अप्रकाशित पत्रकात हेच विचार मांडलेले आहेत. ग्रामीण भागात क्रांतीकेंद्रे निर्माण करून साम्राज्यवाद, सरंजामशाही आणि त्याचे दोस्त, बिग बूर्ज्वाझी याचे निराकरण करणे वगैरे वगैरे. मतभेदाचा मुद्दा भारतीय परिस्थितीतील प्रमुख अंतर्विरोधाच्या चर्चेत उपस्थित झाला. सरंजामशाही व जनता याच्यातील भेद हा प्रमुख नसून साम्राज्यवाद व जनता हाच खरा अंतर्विरोध आहे असे APRCC चे म्हणणे होते. साम्राज्यवाद सरंजामशाहीचा पुरस्कर्ता असल्याने खरा शत्रू तो असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. CPI(M–L) च्या मते नॅशनल बूर्ज्वाझी क्रांतीचा निश्चित वा संभाव्य साथी नव्हता. APRCC ने त्याला क्रांतिकारी आघाडीतच सामील केलेले होते. CPI(M–L)अमेरिकन भांडवलशाही व रशियाचा तथाकथित समाजवाद हे दोनच प्रमुख साम्राज्यवाद मानते तर APRCC ने याबरोबरच ब्रिटिश साम्राज्यवादही तितक्याच तीव्रतेचा शत्रू असल्याचे सांगितले. प्रमुख मतभेद क्रांतीचा पथ कसा असेल यावर होते.

**APRCC व CPI(M-L) मधील मतभेद** श्रीकाकुलम्च्या लढ्याच्या बाबतीत APRCC ची भूमिका वास्तववादी होती. एप्रिल १९६९ मध्ये या विषयावर प्रसिद्ध केलेल्या पत्रकात या चळवळीत लोकाचा मोठया प्रमाणावर प्रथम जो सहभाग होता, त्याची स्तुती त्या मर्यादेपर्यंतच करण्यात आली होती. अंतिम मूल्यमापन मात्र करण्यात आले नाही. कारण श्रीकाकुलम् जिल्हा कमिटीने CPI(M–L)शी संधान बांधल्यामुळे पुढचे वळण फारसे आशादायक नव्हते. नंतर उघड उघडच वैयक्तिक हल्ले करण्यात येऊन अनिष्ट वळण लागले वगैरे भाग पूर्वी येऊन गेलेलेच आहेत. याच वेळी वरंगळ, खम्मम, करीमनगर, नालगोंडा आणि पूर्व गोदावरीच्या भागात APRCC लोकाचा मोठा पाठिंबा असलेल्या पण सशस्त्र उठावाचे प्रमाण कमी असणाऱ्या चळवळी चालवीत होती. याच वेळी गिरिजनानी चालविलेल्या श्रीकाकुलम् चळवळीचे कौतुक करण्यात आले; पण त्याचबरोबर मतभेदाचा प्रमुख मुद्दा स्पष्ट करण्यात आला : 'काही लोक गट स्थापन करून जमीनदार व जुलमी वर्गावर हल्ले करीत आहेत. बहुसंख्य जनतेशी नाळ नसणाऱ्या या

हल्ल्यानी सरंजामशाही नष्ट होणार नाही किंवा जनतेचा लढा पुढेही सरकणार नाही. फक्त क्रांतिकारी जनतेच्या सततच्या समेलनाच्या, जनतेचा बहुसख्येने सहभाग असलेल्या सशस्त्र लढयानी वर्तमान बडया जमीनदारांची, बडया बूर्ज्वा साम्राज्यवादाची प्रस्थापना नेस्तनाबूत करता येईल. मार्क्सिझम–लेनिनिझम माओचे विचार हेच सत्य सागत आलेले आहेत. या दृष्टीने हे हल्ले मार्क्सिझम–लेनिनिझम–माओइझमची उघडउघड प्रतारणा आहेत.'

## नागी रेड्डींची मुलाखत

**लोकांच्या या लढयाविषयी नागी रेड्डीने आपले विचार पुढील-प्रमाणे प्रकट केले. नागी रेड्डी म्हणजे APRCC चा प्रवक्ता असल्याने हे विचार म्हणजेच तेव्हाचा आंध्र–नक्षलवाद होय. सशस्त्र लढा हा जमीनदारांच्या गुंडांशी द्याव्या लागणाऱ्या सामन्यातून जन्मतो. हा वस्तुत. लोकांचा विरोध असतो. (आक्रमकता नसते) पथकांची निर्मिता या पायावर व्हायला पाहिजे; पण CPI(ML)ला याची पर्वा नाही. जिथे लोकांचा असंतोष व चळवळ नाही, अशा विभागातसुद्धा त्यांनी पथके उभारली. त्यामुळे ही पथके लोकांच्या पाठिंब्याअभावी एकाकी पडली. पोलीस आणि जमीनदाराचे हस्तक यांच्या दडपशाहीला विरोध म्हणून मूलत: यांचा जन्म व्हायला हवा. म्हणजेच जनयुद्ध हे लोकाच्या मागण्यांच्या समर्थनार्थ, विरोधी–नकारात्मक भूमिकेतून जन्माला येते आणि याच मुल्य समजूतीवर खरी लोकसेना उभारली जाईल. तात्पर्य, आम्हाला जनसेनेचे प्रयोजन संरक्षणासाठी आहे, CPI(ML) ला ते आक्रमणासाठी आहे.**

पार्वतीपुरम् विभागात लोकाचे अस्सल युद्ध चालू होते; परंतु सकल विभागात खऱ्या अर्थाने लोकयुद्ध चालू आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून पथके उभारली तरी तेथे भविष्यातही तशी शक्यता नाही.

**यामुळे श्रीकाकुलम्च्या मूल्यमापनाच्या संदर्भात दोन प्रमुख प्रश्न उभे ठाकले. पहिला: श्रीकाकुलम्चा लढा हा राष्ट्रीय मुक्तीचाच आविष्कार मानता येईल काय आणि दुसरा. श्रीकाकुलम्सारख्या उठवानी सशस्त्र लढे करता येतील काय?**

**नागी रेड्डीची यावरील उत्तरे :** नागी रेड्डीच्या मते प्रत्येक सशस्त्र लढा हा राष्ट्रीय मुक्ति युद्धाचा आविष्कार मानता येईलच असे नाही; पण राष्ट्रीय मुक्तियुद्ध गर्भावस्थेत असताना ते सशस्त्र लढाच असते. मात्र प्रत्येक कृषकअसंतोषाचा उद्रेक हा सत्ता हस्तगत करण्यासाठी झालेला आहे असा शिक्का मारणे हे वस्तुस्थितीला सोडून होईल. यामुळे लोकाच्या मूलभूत मागण्या [जमीन हवी, कर नकोत यासारख्या] बाजूलाच राहतील. अनेक ठिकाणी सशस्त्र हालचाली झाल्यास त्या एकत्र गुंफून लोकसेना उभारली, तरच राष्ट्रीय मुक्तियुद्ध सुरू करता येईल. रेडिओ पेकिंगनेही नक्षलबारीचा लढा हा प्रामुख्याने जमीन मिळविण्यासाठी होता आणि गर्भावस्थेतील राष्ट्रीय मुक्तिलढा होता असे म्हटलेले होते.

श्रीकाकुलम्सारख्या चळवळीनी [यात चळवळीचा उत्तरार्ध अभिप्रेत असावा.] सशस्त्र चळवळीची मार्गक्रमणा होईलच असे नाही. कारण पहिली गोष्ट म्हणजे जनसघटन मजबूत नसल्याने सशस्त्र पथकाच्या कृत्यानी मूळ प्रश्नालाच वगळ मिळत होती, दुसरी गोष्ट अशी की लोकांना 'उद्धरेत् आत्मना आत्मानम्' ही भावना न येता दुसरा कोणी तरी आपल्यासाठी लढतो आहे अशी भावना CPI (ML) मुळे जोपासली जाते. दुसऱ्या शब्दात, आंध्र नक्षलवादपक्ष सशस्त्र लढा आणि सयुक्त आघाडी या तीन गोष्टी अविभाज्य असल्याचे मानीत होता

**पुनर्रचना :** आंध्र नक्षलवादाच्या मते सर्व लढयाचा प्रारंभ, विकास, दृढीभवन आणि विस्तार हे कृषिपुनर्रचनेवरच आधारित असणे आवश्यक होते; सपूर्ण मुक्ती ही देशभर क्रांतिकेंद्रे उभारणे, सपूर्ण देशान्तर्गत सत्ता हस्तगत करणे यानीच साध्य होणार होती. तरीही जमीनदाराच्या विरुद्धच्या युद्धातच या साऱ्याचे बीज होते आणि हे युद्ध कृषिपुनर्रचनेखेरीज तडीला जाणे अशक्य आहे. CPI (M–L) च्या निराकरणाच्या धोरणामुळे कृषिपुनर्रचनेचा प्रमुख कार्यक्रम पुढे ढकलला जातो, त्यामुळे चळवळ जनसामान्यापर्यन्त पोचू शकत नाही व परिणामत: बद पडते. देवगोपीवल्लभपूरमध्ये हेच झाले. श्रीकाकुलम्नतर जेव्हा पथके विखुरली तेव्हा चारु मुजुमदारने 'आणखी सहा महिन्यात हे व्हिएटनाम होणार' असे छाती ठोकपणे सागितले; पण आणखी सहा महिन्यात व्हिएटनाम दूरच, श्रीकाकुलम्ला पवनारची कळा येण्याची वेळ आली याचे कारण पथके इतस्तत: पांगली, तेव्हा ती भूमिगत राहून कार्य करतील अशी अपेक्षा होती; पण पोलिसी दमनशाहीपुढे ती निष्प्रभ झाला. म्हणून जर लोकाना शत्रूशी लढण्याचे शास्त्रोक्त शिक्षण दिले, तरच हे लढे यशस्वी होणार. सगळयात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा लोकाना हे कळेल की, जमीन बळकविण्यासाठी अथवा शेतीच्या सदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या चळवळी तात्कालीन फळे देणाऱ्या असल्या तरी त्या चिरस्थायी होण्यासाठी सत्ता आपल्या हातात असणे आवश्यक आहे, तेव्हाच लोक सत्तेच्या मागे वळतील आणि तो लढा अतिम असेल. CPI (M–L) चे क्रान्तिकेन्द्रे उभारून वर्ग-शत्रूला पळवून लावणे व त्यायोगे हा प्रदेश मुक्त झाला असे जाहीर करणे हे माओच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णत: विसंगत होते.

**माओचे या बाबतीतील विधान :** सशस्त्र सैन्याची उभारणी करणे, शत्रूचा पराभव करणे आणि लोकाच्या ठिकठिकाणच्या केन्द्रामध्ये संपर्क साधून एक विस्तृत क्रान्तिभूमी तयार करणे हे तीन टप्पे माओच्या मते प्रदेश मुक्त करण्यासाठी आवश्यक होते आन्ध्र नक्षलवादाच्या माओच्या अभ्यासानुसार सशस्त्र सैन्याची उभारणी म्हणजे वर्गशत्रूच्या सशस्त्र हल्ल्याना तोंड देण्यासाठी आपल्याकडून करण्यात येणारी सशस्त्र तयारी. त्याचा अर्थ वर्गशत्रूचे निराकरण असा नव्हे [जसा CPI (M–L) ने घेतला.] आणि क्रान्तिभूमी तयार करणे याचा अर्थ सपूर्ण जनतेलाच उठावात सामील करून घेणे (CPI M–L) प्रमाणे अलिप्त पथकानी चळवळ चालविणे नव्हे.

APRCC ने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या पत्रकांनुसार विशेषत: 'Some Problems concerning the People's War in India' या पत्रकानुसार, लोकाच्या क्रान्तीविषयीच्या जागृतीप्रमाणे राज्याचे तीन भाग पाडण्यात आले होते. पहिला, वन्यप्रदेश. इथे चळवळ सशस्त्र लढयाच्या टप्प्यापर्यंत पोचलेली होती. दुसरा प्रदेश असा की जेथे वर्गसघर्ष तीव्र आहे पण अजून सशस्त्र लढा जवळ आलेला नाही आणि तिसर प्रदेश जेथे चळवळीने मूळच धरलेले नाही

यापूर्वी केलेल्या विश्लेषणानुसार आता चळवळ फक्त पहिल्याच प्रकारच्या प्रदेशात जरी दृश्यमान असली तरी आज देशाच्या बहुतांशी भागात असंतोष खदखदत आहे, परंतु येथे चळवळीने मूळ धरलेले नाही. कारण आजवर या असंतोषाला निश्चित दिशा नाही. म्हणजेच दुसऱ्या व तिसऱ्या प्रदेशात सीमारेषा अस्पष्ट आहेत.

श्रीकाकुलम्‌पासून APRCC ने कृषिपुनर्रचनेशिवाय सरंजामशाहीविरोधी चळवळीला भवितव्य नाही हे ओळखले. श्रीकाकुलम्‌खेरीज आन्ध्रमधल्या चळवळीचे मात्र लोकांशी फारसे नाते नव्हते. फार तर संसदीय लोकशाहीवरचा व प्रस्थापित मूल्यांवरचा पोटाच्या चिमटयामुळे विश्वास उडाल्याने स्वप्नाळू व संतप्त तरुणांनी नवीन काही तरी करण्यासाठी शोधलेला तो मार्ग व त्या संतापाचे ते प्रकटीकरण होते असे म्हणावे लागेल.

APRC चे विश्लेषण वास्तववादी होते मुझुमदारचा आदर्शवाद पुस्तकी व भोळा होता. शहरांकडचे दुर्लक्ष व पुढे 'White Terror' म्हणून घेतलेला चमत्कारिक दृष्टिकोन [ ज्याचा नक्षलवादाशी संबंध असला तरी आन्ध्र नक्षलवादाशी फारसा नाही म्हणून येथे सविस्तर चर्चा अनावश्यक ] व सर्वांत प्रमुख म्हणजे जनतेशी फारकत यामुळे चळवळ मागे गेली CPI (M–L) मधूनच त्याला अन्तर्गत विरोध मोठया प्रमाणावर झाला त्याचा आदर्शवाद किती भाबडा होता याचे एकच उदाहरण पुरेसे आहे. १९ जुलै १९७० च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये 'देशव्रती' या बगाली पत्रातील मजकुरावर आधारित बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार चारु मुझुमदारचे मत असे होते की, निराकरणाच्या annihilation च्या कार्यक्रमातून असा एक नवा मनुष्य जन्माला येईल, की जो निःस्वार्थी असेल, तो मृत्यूला घाबरणार नाही, तो शत्रूच्या हातातील बदूक हिसकावील आणि हुतात्म्यांची स्मारके उभारील इत्यादी. क्रान्ती तर दूरच, साध्या मनुष्यस्वभावाच्या अपरिपक्व अभ्यासाची ही एक झलक आहे. कनु सन्यालचे आणि त्याचे उत्तरोत्तर मतभेद होत गेले आणि पुढे कनु सन्यालला अटक झाली, ती बहुतांशी फितुरीनेच झाली असावी असा संशय व्यक्त करण्यात आला.

आज CPI (M–L) या नावाने जो पक्ष उभा आहे, त्याचा एक पाय तळयात, एक पाय मळयात आहे. आज तो धोरणाच्या वावतीत किती संदिग्ध आहे ते पुढे येईलच. मात्र आजचा CPI ( M–L ) हा APRCC चा उत्तरार्ध आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्वीच्या CPI (M–L) पेक्षा त्याची जवळीक APRCC शी जास्त आहे. त्यामुळे नागी रेड्डी गट्याला जरी आन्ध्रमधील नक्षलवादी जिवाच्या कराराने शत्रू मानीत असला, तरी काळाच्या कसोटीला नागी रेड्डीचे तत्त्वज्ञान, चारु मुझुमदाराच्या तत्त्वज्ञानापेक्षा उतरलेले आहे. ते किमान तत्त्वज्ञान म्हणण्याच्या योग्यतेचे तरी आहे. देशाच्या संदर्भात ज्याप्रमाणे जनतापक्ष हा कॉंग्रेसचा पुनर्जन्म असल्याचे मत RGK ने व्यक्त केले आहे. तशाच प्रकारे APRCC हीच आजच्या CPI ( M–L ) च्या स्वरूपात जन्मली आहे असे म्हणावे लागेल. आता, आजच्या CPI (M–L) चे तत्त्वज्ञान काय आहे ते पाहू.

## भारतीय परिस्थितीचे विवेचन

१९७६ जून–जुलैच्या 'लिबरेशन'च्या अंकात CPI ( M ) च्या सभासदांना एक आवाहन करण्यात आले आहे. त्यात ही चर्चा केलेली आहे दुर्दैवाने CPI (M–L) चे प्रकाशित साहित्य व प्रवक्ते स्वत चे तत्त्वज्ञान सरळ माडण्याऐवजी 'नेति नेति' असा नकारात्मक पवित्रा घेतात. कोणते तत्त्वज्ञान पटकन् बूर्ज्वा होईल याचा दोन अकांत मेळ नसतो. त्यामुळे भारतीय परिस्थितीचे विवेचन हे CPI ( M ) चे विवेचन कसे चूक यातून फुलते अर्थात CPI(M) वरची टीका हेही नक्षलवादाच्या शोधातील महत्त्वाचे स्थान आहेच.

भारतीय सत्ताधारीवर्गाचे स्वरूप काय ? CPI ( M–L ) च्या मते भारतीय बिग बूर्ज्वाझी कॉम्प्रादारे स्वरूपाचे आहेत. ते जमीनदाराच्या सहकार्याने सत्ता राबवीत आहेत CPI ( M ) च्या मते नॅशनल बूर्ज्वाझी सत्तेवर आहे. यावर CPI ( M–L ) चे म्हणणे जर नॅशनल बूर्ज्वाझी सत्तेवर असेल, तर साम्राज्यवादाशी तो सहकार्य का करील ? म्हणजेच भारतीय सत्ताधारीवर्ग ( त्याला आवडते म्हणून तो साम्राज्यवादाशी तडजोड करतो हे काही उत्तर होऊ शकत नाही. ) कॉम्प्रादोर बूर्ज्वाझी आहे. कारण साम्राज्यवादाच्या आश्रयाखेरीज तो जगूच शकत नाही. यावर CPI ( M ) चे उत्तर असे की भारतीय बूर्ज्वाझी हा औद्योगिक बूर्ज्वाझी आहे म्हणून तो चीनच्या बूर्ज्वाझीसारखा कॉम्प्रादोर होऊ शकत नाही, पण फक्त व्यापारी बूर्ज्वाझी कॉम्प्रादोर होऊ शकेल असे गृहीत धरता येणार नाही. जो साम्राज्यवादी भांडवल गुंतवू इच्छितो, तो सोइस्कर स्थानिक भागीदारी निवडतो. प्रमुख ध्येय फक्त लोकांचे शोषण असल्याने कोणताही बूर्ज्वाझी त्याला चालू शकतो. हे सहकार्य स्थानिक बिग बूर्ज्वाझीच्या अस्तित्वाचे व वर्धनाचे प्रमुख कारण असणाऱ्या साम्राज्यवादी भांडवलाच्या भूमिकेवर पडदा टाकतो यामुळेच भारताचे जेव्हा सत्तांतर झाले, तेव्हा फक्त साम्राज्यवादाच्या भारतीय हस्तकाकडे–कॉम्प्रादोर बिग बूर्ज्वाझीकडे आणि जमीनदाराकडे खरी सत्ता आली. म्हणजेच भारत वसाहत या स्वरूपातून फक्त अर्धवसाहत या स्वरूपात आली.

भारतातील सत्ताधारीवर्गातच अन्तर्गत मतभेद का व्हावेत ? त्याचे कारण अमेरिकन व रशियन साम्राज्यवादातील चढाओढ हे होय. म्हणून एक फॅसिस्ट विरोधी आघाडी उभारण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यात विरोधी पक्ष, कॉम्प्रादोर बूर्ज्वाझी आणि बडे जमीनदार याचाही समावेश करता येईल.

**माओत्से–तुंगचे चिनी परिस्थितीचे विवेचन :** चिनी बिग बूर्ज्वाझी कॉम्प्रादोर स्वरूपाचा आहे. तो साम्राज्यवादाचा हस्तक आहे आणि साम्राज्यवादाचेच रक्षण करणारा म्हणून तो नष्ट करणे हे क्रांतीच्या अनेक ध्येयापैकी एक ध्येय आहेच; पण त्याच वेळी निरनिराळया साम्राज्यवादाचे हस्तक एकमेकाविरुद्ध उठण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रोलेटेरिअेटला विशिष्ट वेळी, विशिष्ट मर्यादेपर्यंत साम्राज्यवाद उलथण्यासाठी साम्राज्यवादाचीच मदत घेता येईल. थोडक्यात, भारतात अशाच रीतीने 'शत्रूमधील दुहीचा फायदा उठवा, बहुजनसमुदाय जमवा, अल्पसंख्याक शत्रूना विरोध करा आणि एकेका शत्रूला उडवा !' हे माओचे तत्त्व अंमलात आणायला हवे.

ही आघाडी फक्त साम्राज्यवादच नव्हे, तर इतरही ध्येयासाठी राबवन सशस्त्र कृषकक्रांती, CPI ( M–L ) च्या नेतृत्वाखाली विक-

सिन करता येईल. नॅशनल बूर्ज्वाझी व इतर संभाव्य दोस्ताना सत्ताधारीवर्गातून फोडून देशभक्त व लोकशाहीवर्गांची संघटना उभारता येईल. प्रोलेटॅरिअट, शेतकरी, पेटी बूर्ज्वाझी आणि नॅशनल बूर्ज्वाझी हे ते वर्ग होत. सत्ताधाऱ्यामधीलच जे एकमेकाविरुद्ध तात्कालिक मदत करतील, ते या आघाडीत समाविष्ट नाहीत

अर्धवसाहत व अर्धसरजामशाही भारतात पेटी बूर्ज्वाझीचा वर्ग फार मोठा आहे. त्याच्यातील फार मोठा भाग प्रोलेटॅरिअट आणि मार्क्सिझम–लेनिनिझमकडे इतिहासातील त्यांची भूमिका शोधण्यासाठी वळलेला आहे. त्यामुळे त्याचे पेटीबूर्ज्वा तत्त्वज्ञान क्रांतिकारीवर्गापर्यंत आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रोलेटॅरिअटचा मोठा भाग असाही आहे जो पेटीबूर्ज्वा वर्गातून हाकलेला गेलेला आहे. यात शेतकरी, हस्तकौशल्य असणारे ग्रामीण कामगार किंवा शहरी मध्यमवर्ग याचा समावेश होतो. अशा रीतीने प्रोलेटॅरिअटलासुद्धा पेटीबूर्ज्वा रंग चढलेला आहे. अशा सामाजिक परिस्थितीतूनच संधिसाधुपणा जन्माला येतो आणि सत्ताधारीवर्ग त्यायोगे लोकांचे लक्ष मूळ क्रांतीपासून प्रतिक्रियावाद्याकडे वळवितो. CPI (M) याच्यापैकीच एक संधिसाधू पक्ष आहे.

आजवर भारतीय प्रोलेटॅरिअट, शेतकरी, पेटीबूर्ज्वा यानी साम्राज्यवाद व सरजामशाहीचा शेवट करण्यासाठी असंख्य लढे उभारले, समाजवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले; परंतु उजव्या आणि डाव्या कम्युनिस्टांनी त्याचा द्रोह केला. अजून या लढ्याचे फळ मिळाले नसले तरी हुतात्म्यांचे रक्त वाया गेलेले नाही.

१९६७ मध्ये आमच्या पक्षाने चारु मुझुमदारच्या नेतृत्वाखाली वर्गलढा कट करून खून करण्याच्या पातळीपर्यंत खाली आणला; पण तदनंतर पक्षांतर्गत वादविवाद, टीका यायोगे पक्षाने तो कार्यक्रम नाकारला. पक्षाने संसदीय लोकशाही आणि वैयक्तिक दहशतवाद दोन्हीचा त्याग केला आणि निरनिराळ्या स्वरूपातील संघर्ष तीव्र करून जनसामान्याना सहभागी करून सशस्त्र लढा व सशस्त्र संघटना उभारणे सुरू केले.

चिनी क्राती हाच आमचा आदर्श आहे. CPI ( M ) ला प्रमुख शंका चार आहेत.

१) चिनी कम्युनिस्ट जेव्हा शेतकरीवर्गाचे नेतृत्व करू लागला, तेव्हा त्याच्याकडे सैन्य तयारच होते.

२) भारतात अधिक आधुनिक, विस्तृत दळणवळणाची साधने आहेत.

३) भारतीय कामगारवर्ग फार मोठा आहे.

४) समाजवादी रशिया, चिनी क्रांतिकारी पक्षाचा पाठिराखा होता तसा भारताला कोणी नाही.

यावर CPI ( M–L ) हा पक्ष पहिला आरोप स्वीकारतो; पण त्यावरून निष्कर्ष असा काढतो की, यावरून असे लक्षात येते की कृषकक्रान्तीच्या मार्गासाठी आपल्याला जनसैन्य उभारावे लागेल. मूळ प्रदीर्घ युद्धाचा मार्ग बदलावा असा त्याचा अर्थ नाही. तसेच चीनची क्रान्ती शेतकऱ्याच्यावर आदर्शवाद म्हणून नव्हे तर दुसरा पर्यायच नव्हता म्हणून अवलंबून राहिला, हा जो निष्कर्ष सुदरय्यानी काढला आहे त्याच्याशी CPI ( M–L ) सहमत नाही. माओत्सेतुंगने Introducing the Communist मध्ये म्हटल्याप्रमाणे **प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सशस्त्र लढ्यांनी राष्ट्रीय पातळीवर कामगारांचे लढे उभारण्यात आले; तरुणांचे, स्त्रियांचे आणि जनतेच्या सर्व थरांचे लढे उभारण्यात आले आणि ते राज्यसत्ता ताब्यात घेण्यासाठीच होते. हे सर्व प्रकारच्या लढ्यांचे एकत्रीकरण आणि त्याला दिलेली शेतकऱ्यांच्या गनिमी युद्धाची जोड हेच खऱ्या अर्थाने सशस्त्र कृषकक्रान्तीचे स्वरूप आहे. अशा रीतीने कामगारवर्ग पहिल्यापासून क्रान्तीत अन्तर्भूत आहे.**

अर्थात भारतीय संदर्भात कामगारवर्ग प्रत्यक्षात पुढाकार घेईल हे उघडच आहे; पण तो पुढाकार कसा असेल ? CPI ( M ) च्या मते शहरांमध्ये सशस्त्र उठाव आणि त्याच वेळी खेड्यामध्ये शेतकऱ्यांचा उठाव; पण ही चिनी आणि रशियन मॉडेलसची वरवरची जोडणी झाली ; पण आपल्या देशात राजकीय सत्ता प्रथम ग्रामीण विभागात बळकवावी लागते आणि हे 'लाल प्रदेश' शहरे पादाक्रात करण्यास उपयोगी पडतात. एकाच वेळी दोन्ही विभागात सत्ता हस्तगत केली जात नाही.

## कामगारवर्गाची भूमिका

अर्थात शहरात सत्ता नतर हस्तगत केली जाते याचा अर्थ कामगारवर्ग तोपर्यंत गप्प बसणार असा होत नाही. ते वर्गभेदाविषयी जागृत असल्याने कम्युनिस्टपक्षाचे सभासद म्हणून सरळ संघटना करून सशस्त्र कृषकयुद्ध पुढे नेऊ शकतात. अन्युआन प्रातातील खाणकामगारांनी चिंगकागशान पर्वतात क्रान्तिकेंद्र उभारले होते हे अशाच प्रकारचे उदाहरण आहे. कामगारवर्ग संघटितरीत्या इतर लोकशाहीवादी वर्गासाठी लढेल. राष्ट्रीय व आतरराष्ट्रीय राजकीय घटनांवर प्रभाव पाडेल. **सरंजामशाहीमध्ये शेतकरी कामगार संयुक्त आघाडीचा खरा अर्थ कामगारांनी शेतकऱ्याचे सशस्त्र कृषकक्रांतीत नेतृत्व करणे आणि क्रांतीच्या मदतीसाठी संघटना बांधणे असा आहे.** कामगारवर्ग शेतकऱ्यावरच विसबून राहून, ग्रामीण भागात क्रांतिकेंद्रे उभारून प्रदीर्घ सशस्त्र लढ्यात चिकाटीने भाग घेऊन ग्रामीण भाग मुक्त करील. या संघटना उभ्या करताना. कामगारानी काळजीपूर्वक गुप्त, स्वयसेवी व स्वसंरक्षकदलांची उभारणी केली पाहिजे. स्थानिक शस्त्रानी युक्त अशी ही दले ग्रामीण नेतृत्व करतील आणि फॅसिस्ट गुंडांपासून व सरकारी सशस्त्र दलापासून शेतकऱ्यांचा बचाव करतील; पण शहरातील व ग्रामीण भागातील कार्याचे भिन्नत्व आपल्याला शहरे शेवटीच ताब्यात घ्यायला भाग पाडील. शहरातील सशस्त्र लढा हा प्रामुख्याने संरक्षणाकडेच झुकणारा असेल.

**अशा रीतीने सशस्त्र लढा हाच प्रमुख लढा असल्याने प्रोलेटॅरिअन सैन्य पहिल्यापासून त्याकरिता तयार असले पाहिजे. अशा वेळी संसदीय लोकशाहीत भाग घेणे वा न घेणे हा फक्त व्यूहाचा प्रश्न राहात नाही तर तो धोरणाचा भाग बनतो. संसदीय लोकशाहीत भाग घेणे हे कायद्याच्या चौकटीत बसते; पण सशस्त्र लढा बसत नाही. म्हणून भारतीय कम्युनिस्ट चळवळ जनयुद्ध आणि ससद हे पूर्णतः परस्परविरोधी आहेत हे लक्षात घेतल्याशिवाय राहू शकणार नाही.** आपल्या देशामध्ये सरजामशाहीवर वैयक्तिक निष्ठा असल्याने ससदेची चेष्टा होते आणि बोगस मतदानाने निवडणुका जिंकल्या

जातात म्हणून प्रदीर्घ लोकयुद्ध हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. हाच लेनिनियमचा भारतीय संदर्भातील अर्थ होय.

'Opportunism and the Collapse of the Second International' मध्ये लेनिनने क्रांतीची स्थिती परिपक्व केव्हा असते याचे विश्लेषण केलेले आहे. क्रान्तियोग्य स्थिती असल्याखेरीज क्रान्ती होणे अशक्य असते; पण प्रत्येक क्रान्तियोग्य स्थिती क्रान्तिकारक ठरेलच असे नाही. क्रान्तियोग्य परिस्थितीची सामान्य लक्षणे कोणती ?

१ : जेव्हा सत्ताधारी वर्गाला धोरणामध्ये मूलभूत बदल केल्याखेरीज राज्य करणे अशक्य होते, जेव्हा दबलेले व दडपलेले वर्ग आपला असतोष आवेशाने माडू लागतात तेव्हा अशी स्थिती निर्माण होते. म्हणजेच समाजातील खालचाच थर नव्हे, तर वरच्या थरातील लोकानाही आहे तसे जगणे अशक्य होते, तेव्हा बदल अभिप्रेतच असतो.

२ : दडपलेल्या वर्गांचे हाल कधी नाही एवढे तीव्र होतात.

३ : याच कारणामुळे लोकाची हालचाल असतोष व्यक्त करण्यासाठी पूर्वीहून फार मोठ्या प्रमाणात सुरू होते. एरवी जे स्वस्थतेने व अलिप्ततेने अवलोकन करू इच्छितात पण आता असतोषाने खेचले जातात ते आणि सत्ताधारी वर्ग आपापल्या स्वतत्र ऐतिहासिक कार्यास उद्युक्त होतात. या वस्तुनिष्ठ परिवर्तनाखेरीज कोणतीही क्रान्ती अशक्य आहे. ही वस्तुनिष्ठ परिवर्तने कोणत्याही एका व्यक्तीच्या अथवा एका वर्गाच्या मर्जीवर अवलबून नसतात. १९०५ मध्ये रशियात अशी परिस्थिती होती; पण त्याच वेळी क्रान्तिकारी वर्गाने जर सपूर्ण परिस्थिती ताब्यात घेऊन सरकार उलथण्याची क्षमता नसेल, तर कोणताही सत्ताधारी वर्ग हाकलून दिल्याखेरीज सत्ता सोडीत नाही या नियमानुसार क्रान्ती होऊ शकणार नाही.

भारतामध्ये अशी वस्तुनिष्ठ क्रान्तियोग्य स्थिती फार काळापासून अस्तित्वात आहे. आणीबाणी लादली गेली याचाच अर्थ सत्ताधारी वर्ग जुन्या मार्गाने राज्य करू शकला नाही. लोकांचाही असतोष वाढत आहे. म्हणूनच यशस्वी क्रान्तीसाठी लोकांना तयार करणे हे क्रान्तिवादी म्हणविणाऱ्या प्रत्येक पक्षाचे ध्येय असले पाहिजे. परिस्थितीला याच पक्षाने तोड फोडले पाहिजे. परिस्थितीला आपोआप तोंड फुटेल म्हणणे म्हणजे कार्य-कारणभाव लक्षात न घेता अचानकतेवर विश्वास टाकणे आहे. आपल्याला कायदेशीर जनसघर्षाच्या प्रत्येक संधीचा पुरेपूर फायदा उठविला पाहिजे; पण त्याच वेळी असे संघर्ष बेकायदेशीर सशस्त्र लढ्याशी संलग्न असले पाहिजेत. कारण बेकायदेशीर भूमिगत संघटन व सशस्त्र लढाच प्रमुख भाग आहेत. तर आणि तरच लोकाना त्याचे साम्राज्य आणण्यास मदत होऊ शकेल अन्यथा कायदेशीर बाबीपुढे मान तुकविल्यास लोकाना सत्ताधारी वर्गापुढेच भक्ष्य म्हणून टाकल्यासारखे होईल.

## लेनिन उवाच

कोणत्याही परिस्थितीत आणि कोणत्याही वेळी राजकीय लढा उभा करण्यास समर्थ अशा मजबूत सघटनेखेरीज पद्धतशीर कार्यपद्धती आखता येणार नाही. निश्चित तत्त्वांवर आधारित चळवळ उभी राहणार नाही. फॅसिस्ट शक्तींचा फटका बसल्यावर हालचाल करण्यात काहीच हशील नाही. कारण अशी हालचाल फारच मर्यादित असणार. तेव्हा आपली तयारी जय्यत असलीच पाहिजे अशी तयारी CPI(M-L) ची होती म्हणून आणीबाणीतही CPI(M-L) गोंधळून गेली नाही. ससदेकडे पाठ फिरविणे याचा अर्थ कायदेशीर सवलतीकडे पाठ फिरविणे असा नव्हे. कायदेशीर व बेकायदेशीर याच्या संयोगानेच लेनिनच्या तत्त्वाचे खरे पालन होईल. लोकाना प्रस्थापित राजवट उलथून टाकण्याचे माहात्म्य लक्षात आणून देणे आणि संघर्ष आणि सघटना याची अशी निवड करणे की ज्यामुळे ही उलथून टाकण्याची प्रक्रिया जवळ येईल; हे लगोलग हातात घेण्याचे कार्य आहे. लोकाच्या मनात ससदीय लोकशाहीबद्दल स्वप्ने निर्माण करणे व पर्यायाने क्रान्तीच्या मार्गात अडथळा आणणे हे अदूरदर्शी काम आहे.

स्टॅलिनने म्हटल्याप्रमाणे बेकायदेशीर चळवळ सवलतीच्या बुरख्याखाली जास्तीत जास्त तीव्र करणे म्हणजेच साम्राज्यवादाच्या हातून क्रान्तिकारी पुनर्रचना अधिकाधिक कशी होईल ते पाहणे आवश्यक आहे. CPI(M) हे ध्यानात घेत नाही. कारण हे ध्यानात घेण्याची CPI(M) ची इच्छाच नाही. त्यामुळे त्याच्या संधिसाधूपणाविरुद्ध लढणे ही नितांत गरजेची गोष्ट आहे. संधिसाधूपणाविरुद्धचा लढा, सशस्त्र लढा हाच अतिम व प्राथमिक लढा असल्याचे ओळखल्यावरच जिंकला जाईल. माओने म्हटल्याप्रमाणे पक्षाचे यश व अपयश, चढाया व माघार, विस्तार वा खच्चीकरण, विकास वा स्थैर्य हे सारे बूर्ज्वाझीशी आणि सशस्त्र लढ्याशी असणाऱ्या पक्षाच्या नात्याशी सबधित असते. सशस्त्र लढ्याखेरीज प्रोलेटॅरिअट, जनता, कम्युनिस्ट पार्टी कोणीच चीनमध्ये टिकू शकले नसते आणि क्रान्ती जिंकणे अशक्य झाले असते. क्रान्तिकारी युद्धातूनच पक्षाची वाढ झालेली आहे रक्ताने मोजलेली किंमत कधीही विसरून चालणार नाही. 'Introducing the Communist' मधील माओचे हे तत्त्वज्ञान आजच्या या परिस्थितीला लागू पडते.

तेव्हा लगतचा कार्यक्रम कोणता ?

१ : भारतीय बिग बूर्ज्वाझी केवळ साम्राज्यवादाशी सहकार्यच करीत आहे असे नाही, तर तो साम्राज्यवादाचाच दलाल आहे, म्हणजे कॉम्प्रादोर बूर्ज्वाझी आहे.

२ : सत्तांतरामुळे भारत स्वतंत्र झाला नाही, तर केवळ वसाहतीतून अर्धवसाहतीच्या स्वरूपात आला.

३ : भारत हा अर्धवसाहत अर्धसरजामशाही स्वरूपात आहे. कॉम्प्रादोर ब्यूरोक्रॅट कॅपिटॅलिझम (तथाकथित पब्लिक सेक्टरमधील) आणि जमीनदार हे सत्ताधारी वर्ग होत.

४ : नव्या लोकशाही क्रान्तीची अवस्था भारतात परिपक्व आहे. रशियाचा समाजवादाच्या नावाखालचा साम्राज्यवाद, अमेरिकन साम्राज्यवाद, सरंजामशाही आणि कॉम्प्रादोर ब्यूरोक्रॅट कॅपिटॅलिझम हे लोकाचे शत्रू. सगळ्यात महत्त्वाचा शत्रू रशियन साम्राज्यवाद.

५ : सर्व मूलभूत अन्तर्विरोधामध्ये सरंजामशाही आणि लाखो लोक यांच्यातील विरोध हा प्रमुख होय.

६ : नव्या लोकशाही क्रान्तीचा कणा कृषकक्रान्ती हा आहे.

### हा कार्यक्रम अंमलात आणण्यास मार्ग कोणता ?

१ : पक्षाने ससदीय लोकशाही आणि वैयक्तिक दहशतवाद दोन्हीचा त्याग करायला हवा. कारण हे लोकयुद्धातील अडथळे आहेत.

२ : कामगारवर्ग शेतकऱ्यांवर अवलबून, प्रदीर्घ लढा उभारून अखेरीस शहरे ताब्यात घेईल.

३ ' तीन घटकाखेरीज क्रान्ती अशक्य होय पहिला मार्क्सिस्ट लेनिनिस्ट पार्टी, दुसरा लोकसैन्य, तिसरा क्रान्तिकारी सयुक्त आघाडी. पार्टी लोकसैन्याला दिशा दाखवील आणि आघाडीचे नेतृत्व करील.

४ : कॉम्प्रादोर बूर्ज्वाझीमधल्याच सरकारला स्वतःच्या हेतूसाठी विरोध करणाऱ्यांना आपल्याबरोबर घेऊन सरकारपक्षीय कॉम्प्रादोर बूर्ज्वाझीना हतप्रभ करता येईल तद्नतर आपल्याबरोबरच्याचा समाचार घेऊ.

५ : इदिरा गाधीनी आणीबाणी लादली म्हणजेच लोकांना शस्त्रे हातात घेण्याखेरीज पर्यायच राहिलेला नाही. सशस्त्र कृषकक्रान्ती हेच प्रमुख व अतिम ध्येय आहे.

६ : मार्क्सिस्ट–लेनिनिस्टानी कामगारवर्ग, विद्यार्थीवर्ग आणि शहरी पेटी बूर्ज्वाझीचे लढे उभारले पाहिजेत. ते लढे शहरात असन तील आणि खेड्याशी त्याचा सपर्क साधला म्हणजे कृषकक्रान्ती जवळ आली.

### पक्षसंघटना हा प्रमुख भाग :
### पक्षसंघटना कशी करावी ?

१ : इतर लढे उभारताना सशस्त्र लढा हाच प्रमुख लढा उभारण्याच्या दृष्टीने पक्षसघटना करायची.

२ : निरनिराळया प्रकारच्या सघटना आणि सघर्ष याची तंत्रे पक्षाने आत्मसात करून घ्यायला हवीत कायदेशीर–बेकायदेशीर, जनसंघटन व भूमिगत कार्य याचे मेळ बसवून भूमिगत, गुप्त व बेकायदेशीर सशस्त्र लढयाची तयारी हा त्यातील प्रमुख घटक आहे

३ . बहुसख्य लोकाशी पार्टीचा कायम सपर्क असला पाहिजे. लोकाकडून लोकाकडे हा सर्व हालचालीचा व ध्येयधोरणाचा पाया असायला हवा काम करताना हुकुमशाही टाळायला हवी. (हा मुझुमदारचा चटका ! )

एक प्रमुख गोष्ट म्हणजे १९६७ च्या निवडणुकावर १९४७ नतरचे मोठ्यात मोठे फ्रॉड म्हणून शिक्का मारण्यात येऊन चार फेब्रुवारी १९७७ ला त्यांच्यावर बहिष्कार घालण्याचे आवाहन जीव तोडून करण्यात आले होते; पण ही चूक नतर तेवढयाच प्रामाणिकपणे कबूलही करण्यात आली.

CPI(M–L) च्या मते भारतीय सरकार विस्तारवादी आहे. बागला देशाचा तुकडा पाकिस्तानपासून तोडणे हे रशियाच्या प्रोत्साहनाने करण्यात आलेले कृष्णकृत्य आहे बांगला देशाला भारत अजूनही त्यातील मुजीबचे बाहुले उलथून पडल्यावर फराक्कावरून त्रास देत आहे बागला देश युनोमध्ये हा प्रश्न उपस्थित करतो याचे कारण त्या दुबळ्या राष्ट्राला भारताने पर्यायच ठेवलेला नाही, वाटाघाटी करूनसुद्धा भारत आपला हेका सोडायला तयार नाही.

तीच गोष्ट सिक्किमबाबत. त्या लोकाच्या अन्तर्गत प्रश्नात हस्तक्षेप करून तो प्रदेश भारताने स्वत मध्ये सामील करून घेतला हे साम्राज्यवादाचेच द्योतक आहे नेपाळचा भारतावरील विश्वासही याच धोरणामुळे उडालेला आहे आग्नेय आशियात आपली अधिसत्ता स्थापन करणे हे या बूर्ज्वा सरकारला साजेसेच धोरण आहे. १९६२ ला तिबेटवर भारताने आक्रमण केले तेव्हापासूनची ही जुनी खोड आहे.

**आणीबाणी का आली ?** : आणीबाणी लादली गेली याला CPI (M–L) अजिबात बिचकली नाही कारण लेनिनने म्हटल्याप्रमाणे आता सत्ताधारीवर्ग जुन्या धोरणानी राज्य करू शकत नव्हता. त्यामुळे इतर पक्ष जसे गोंधळले व किंकर्तव्यमूढ झाले, तसे CPI (M–L)चे झाले नाही. कारण ससदीय लोकशाहीच्या बुजगावण्यावर CPI (M–L)चा कधीच विश्वास नव्हता. जेव्हा नॅशनल बूर्ज्वाझीच्याच एका वर्गाचा फायदा होईनासा झाला, तेव्हा त्यानी आणीबाणी स्वार्थ साधण्यासाठी लादली आणि त्यामुळे सगळ्यानाच फटका बसला. अगदी नॅशनल बूर्ज्वाझीही त्यातून सुटले नाहीत. विरोधी पक्षाना मोठ्या प्रमाणात तुरुगात डाबण्यात आले व अस्तित्वात असणाऱ्या कायद्याची चेष्टा झाली. या गोष्टी बेकायदेशीर मार्गच सच्चा होता हे दाखवतात. कारण कायद्याचा झिरझिरीत पडदा केव्हाही टरकावला जाऊ शकतो; पण समाजवादी पक्षासारख्याना तोच आधार होता त्यांचे जुने भाषणाचे दिवस अचानक सपल्याने जे कोणी बाहेर राहिले ते मूकस्तभ झाले.

यावरूनच प्रदीर्घ सशस्त्र लढ्याची अपरिहार्यता लक्षात यावी.

अशी अंतर्गत परिस्थिती CPI(M–L) च्या मते अपेक्षितच होती. हे झाले आणीबाणीपर्यंतचे नक्षलवादाचे मत. त्याचेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विवेचन आता पाहू व त्यानतर जनतापक्षाच्या विजयानतरच्या तत्त्वज्ञानाकडे वळू

### आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे परीक्षण

जानेवारी–फेब्रुवारी १९७७ च्या 'लिबरेशन' च्या अंकातील लेखाप्रमाणे आजच्या जगातील प्रमुख विरोध खालीलप्रमाणे :

१ : समाजवादी राज्यव्यवस्था व भांडवलशाही राज्यव्यवस्था,

२ : साम्राज्यवाद व दडपलेली राष्ट्रे

३ : बूर्ज्वाझी व प्रोलेटॅरिअट

४ : साम्राज्यवादी शक्तींच्यातील अतर्गत तणाव आणि बूर्ज्वाझी व सत्ताधाऱ्याच्यातील अतर्गत तणाव.

आर्थिक व राजकीय बिकट समस्या हे विरोध तीव्र करीत आहेत. चीनची जग तीन भागात विभागण्याची कल्पना बरोबर आहे. पहिला अमेरिकन व रशियन साम्राज्यवाद हे दोन्ही जगावर आपलेच स्वामित्व असावे यासाठी धडपडत आहेत दुसरा विकसनशील भांडवलशाही देशाचा. ते या दोन बड्या शक्तीपासून वाचण्यासाठी धडपडत आहे। तिसरा चीनसह आशिया, आफ्रिका आणि लटिन अमेरिकेतील देशाचा. ते सार्वभौमत्वासाठी आणि स्वतत्रतेसाठी नववसाहतवाद आणि बड्या शक्तींचा साम्राज्यवाद याविरुद्ध लढत आहेत.

**पहिला विभाग– दोन बड्या शक्ती :** लेनिनने म्हटल्याप्रमाणे

विषम विकसन हे भाडवलशाहीत अटळ आहे. साम्राज्यवादी शक्तीची तात्पुरती शय्यासोबत आणि खऱ्या अर्थाने चढाओढ याचा अपरिहार्य परिणाम युद्धात होतो. म्हणून जेवढा काळपर्यंत साम्राज्यवाद आहे तेवढा काळपर्यंत युद्धे होणारच. दोन्ही साम्राज्यवाद तीच धोरणे अवलबतात दुबळया राष्ट्राना आर्थिक मदत देऊन त्याच्या अर्थव्यवस्थेच्या नाडचा हातात ठेवणे व त्यायोगे राजकीय व आर्थिक नियत्रण ठेवणे, निर्वाचित सरकारे लाचार करणे वा त्याच्याविरुद्ध लष्करी उठाव घडवून आणणे, ती जर लाचार झाली नाहीत तर चिलीमध्ये अमेरिकेने व सुदानमध्ये रशियाने घडवलेली उलथापालथ करणे हा त्याच्या धोरणाचाच भाग आहे. दोन्ही सत्ता विभिन्न राष्ट्रातील विषमता वाढवून प्रतिक्रियावाद्याना मोठया प्रमाणावर शस्त्रे चारून मृत्यूचे ठेकेदार झाल्या आहेत. सध्या युरोप हे त्याचे लक्ष्य आहे कारण औद्योगिक दृष्टचा पुढारलेल्या युरोपच्या नियत्रणाने जागतिक नियंत्रण सोपे जाईल. यातही अमेरिकन साम्राज्यवाद व्हिएतनाम, लाओस, कबोडिया यानी युद्धात, जपान व रशियाने व्यापारात मार दिल्याने दिवसेंदिवस निष्प्रभ होत आहे; पण स्टॅलिनच्या मृत्यूनंतर भाडवलशाही बनलेला रशिया अजून समाजवादाचा बुरखा पांघरून असल्याने जगाला फसवू शकत आहे. त्याचे आरमार, लष्कर जगभर पसरले आहे आणि खरा धोका त्याच्यापासूनच आहे. कारण अमेरिकेचे पितळ उघडे पडले आहे. अमेरिकेचे अंतर्गत प्रश्न बेकारी, चलनफुगवटा, अवमूल्यन, उत्पादनघट, भाववाढ तिला पुरेसे त्रस्त करीत आहेत. त्यात विद्यार्थी, कामगार, निग्रोंचे प्रश्न आहेतच.

रशियाने लष्कराकडेच प्रचड लक्ष पुरविल्याने सामान्य वस्तूचा पुरवठा तेथे होऊ शकत नाही. कामगारवर्ग नियमाप्रमाणे काम, सप याद्वारे, बुद्धिमत लेखाद्वारे व भूमिगत संस्थाद्वारे नव्या झारांना विरोध करीत आहेत. युरोपात तरी रशियाचे वजन कमी होत आहे. रुमानिया, युगोस्लाव्हिया, अल्बानिया यानी रशियाचे सामर्थ्य ओळखायचे नाकारले आहे EEC (युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी) मध्ये भाग घेणे हा रशियालाच टोला आहे. अगोलातील चढाईपासून तिसऱ्या जगातील लोकानाही त्याचा खरा रग कळत आहे. चीनला वेढण्यासाठी असलेल्या Asian Security Pact वर सह्या करण्याचे त्यामुळेच तिसऱ्या जगाने नाकारले आहे. इजिप्तने रात्रीत रशियाला हाकलून दिले, बागला देशातील मुजीबचे बाहुले फेकले गेले. अशा रीतीने रशियाचीही पीछेहाटच आहे. भारतीय जनतेलाही त्याचे खरे स्वरूप जाणवत आहे

चीनवर या दोन्हीचा डोळा आहे. रशिया भारताशी, ज्या भारताने १९६२ ला तिबेटवर आक्रमण केले, त्या भारताशी करार करून चीनला शह देत आहे. जपानलाही रशिया यात ओढू पाहत आहे, तैवानमध्येही प्रतिक्रियावादी सरकारला मदत करीत आहे. आग्नेय आशियावरचे अमेरिकेचे प्रभुत्व, दक्षिण कोरिया आणि तैवानमधील सैंवेरियायोगे अमेरिकाही हिंदी महासागर प्रभावक्षेत्र करू पाहत आहे.

पण थोर चीन याना पुरून उरला आहे. चीनने त्याच्यामधीलच विरोधाचा फायदा उठवून तिसऱ्या जगाला मदत केली आहे.

**दुसरा विभाग–भांडवलशाहीने प्रगत झालेले देश :** यामध्ये पश्चिम युरोपातील देश व कॅनडा आणि जपानचा समावेश होतो. हे देश दोन्ही बडया शक्तीपासून त्रस्त आहेत आणि त्याच्याशी लढत आहेत. EEC स्थापणे हा त्यातीलच एक भाग आहे. ते अरब राष्ट्रातही शस्त्रे व पैसा ओतीत आहेत, ज्यायोगे त्याना तेथे Voice राहील. त्यातसुद्धा पश्चिम जर्मनी व फ्रान्स, युरोपवर आधिक्य मिळविण्याच्या मागे आहेत. NATO मुळे त्याच्यावर बधने पडली आहेत. त्याना बाजारपेठाही नाहीत. तिसऱ्या जगाला राजकीय पाठिंबा देऊन त्याचा प्रयत्न त्यात शिरकाव करण्याचा आहे

**तिसरा विभाग–तिसऱ्या जगातील राष्ट्रे.** या राष्ट्रांना युरोपियन राष्ट्राच्या आधिपत्याखालून स्वातंत्र्य मिळाले; पण अजूनही दोन बडचा शक्तीचे ते चढाओढीचे मैदान झालेले दिसतात. या साम्राज्यवादाकडून शोषण अव्याहत चालू आहे. बहुताशी देशात सरजामशाही पूर्ण वा अर्ध स्वरूपात अस्तित्वात आहे. हे जमीनदारच साम्राज्यवादाचे दलाल असल्याने कॉम्प्रादोर बूर्ज्वाझी स्वरूपाचे आहेत. म्हणून प्रदीर्घ लढा देणे या राष्ट्राना आवश्यक आहे. राजकीय, आर्थिक व लष्करी स्वरूपाची बंधने त्याच्यावर बडचा शक्तींनी लादलेली आहेत त्याच्यापासून मुक्त व्हायला हवे. या राष्ट्रांच्यातसुद्धा प्रकार पडतात. इंडोनेशिया, फिलिपाइन्स, थायलड व लॅटिन अमेरिकेतील काही देश अमेरिकेचे अकित आहेत व अमेरिकावादीच आहेत भारतासारखे इतर काही देश आहेत जे रशियाचे अकित आहेत आणि जवळच्या पाकिस्तान, बांगला देश, नेपाळसारख्या स्वतत्र सार्वभौम राष्ट्रांवर आक्रमण करीत आहेत. दक्षिण आफ्रिका, ऱ्होडेशियासारखे अजून अल्पसख्य गोऱ्याच्या आधिपत्याखालचे देश तिसऱ्या प्रकारात आहेत. इतर काहीमध्ये नॅशनल बूर्ज्वा सरकारे अस्तित्वात आहेत आणि कधी अमेरिकेला तर कधी रशियाला अनुकूल अशी भूमिका ते देश घेतात. इतर काही लष्करी आधिपत्याखालील आहेत. म्हणजेच बहुताशी राष्ट्रे याना त्या स्वरूपात साम्राज्यवादाने पीडित आहेत.

## या दोन्ही साम्राज्यवादांच्या विरुद्ध लढणाऱ्या शक्ती कोणत्या ?

१ : कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग आणि नॅशनल बूर्ज्वाझी म्हणजेच बहुसख्य लोक सतत यांच्याविरुद्ध खऱ्या स्वातत्र्यासाठी लढा देत आहेत

२ : काही ठिकाणची सरकारे प्रतिक्रियावादी असूनही याच्याविरुद्ध जनमताच्या दडपणाखाली लढतात.

३ : राष्ट्रीय मुक्ति–आदोलने ऱ्होडेशिया, साउथ आफ्रिका, साउथ वेस्ट आफ्रिका, पॅलेस्टिनियन विभाग येथे कार्यरत आहेत.

४ काही ठिकाणी अस्सल मार्क्सिस्ट–लेनिनिस्ट पार्टी प्रदीर्घ सशस्त्र लढे चालवीत आहे.

हे तिसरे जग नव्या जागतिक अर्थव्यवस्थेसाठी प्रयत्न करीत आहे. त्यानी निर्यात केलेल्या कच्च्या मालाला योग्य किंमत मिळावी, जागतिक बँकेने पक्षपातीपणा करू नये याकरिता ते लढत आहेत. OPEC ची स्थापना (ऑर्गनायझेशन ऑफ पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज्) याचेच प्रतीक आहे. बऱ्याच ठिकाणी स्थानिक सरजामशाही व कॉम्प्रादोर बूर्ज्वाझीना असणारे स्वातत्र्य मर्यादित करण्यात येत

आहे. 'Detente'च्या नावाखालील विस्तारवाद ते UNO द्वारे झुगारीत आहेत. त्याचे अतर्गत प्रश्न (जसे इराण–इराक, इराक–सीरिया) ते दोन बड्या शक्तीना चार हातावर ठेवूनच सामंजस्याने सोडवीत आहेत.

अमेरिकन आणि रशियन साम्राज्यवादाच्या हस्तक्षेपात फरक आहे पराभूत होत असणाऱ्या प्रतिक्रियावाद्यांना मदत करणे हे अमेरिकन साम्राज्यवादाचे धोरण आहे, तर रशिया अधिक सूक्ष्म मार्ग अवलंबितो. तिसऱ्या जगाला त्याचा पाठिंबा हा केवळ बुरखा आहे. म्हणूनच जेव्हा हे मार्ग सपतात तेव्हा चेकोस्लोव्हाकियासारख्या देशावर तो आक्रमणही करतो.

हे दोन्ही साम्राज्यवाद मध्यपूर्वेत 'शातता नको आणि युद्धही नको' अशी परस्पर सोईची भूमिका घेत आहेत. त्यामुळे तो प्रश्न चिघळला आहे. तीच गोष्ट आफ्रिकेच्या बाबतीत ऱ्होडेशिया व दक्षिण आफ्रिकेत अमेरिका राष्ट्रीय लढे दडपण्यासाठी आपले सामर्थ्य गोऱ्याच्या बाजूने उभे करीत आहे; पण हे उघडे पडू नये म्हणून रशियासारखेच राष्ट्रीय मागण्याकडे लक्ष देण्याचे ढोंग करीत आहे. दक्षिण आशियात रशियाने विस्तारवादी भारताला हाताशी धरून बांगला देशची निर्मिती केली. रशिया १० लाखाचे सैन्य चीनच्या सीमेवर सज्ज ठेवून आहे. दक्षिण अमेरिकेत अमेरिका राज्ये उलथवीत आहे अशा रीतीने जगभर या दोन शक्तीनी पाशवी धुमाकूळ घातलेला आहे. अशा वेळी तिसऱ्या जगातील राष्ट्रांना एकमेव आशास्थान आहे ते म्हणजे द ग्रेट सोशलिस्ट चायना.

**थोर, अचूक, समाजवादी, क्रांतिवादी, अजिंक्य,**
**शूर, अविनाशी इत्यादी इत्यादी चीन**

चीन हे जागतिक क्रातीचे आद्य प्रेरणास्थान आहे. क्रातिविरोधी सर्व शक्तीचा बुरखा फाडून जागतिक क्राती जवळ आणण्यास चीन कटिबद्ध आहे. अशा या चीनची अंतर्गत धोरणे कोणती आहेत ? मार्क्स, एंगेल्स, लेनिन आणि स्टॅलिन याच्या तत्त्वानुसार चीनने डोळे उघडे ठेवून रशियन उदाहरणावरून समाजवादातील संभाव्य धोके टाळले आहेत. (रशियात समाजवादाच्या नावाखाली आज भांडवलवादच रूढ झाला.) लोकांच्यातील अंतर्विरोध नीट दाखविण्यात माओ-त्से-तुगच्या महान प्रोलेटॅरिअन क्रातीच्या मार्गावरूनच जावे लागेल हे चीन यशस्वीरीत्या दाखवीत आहे. हा मार्ग म्हणजे प्रोलेटॅरिअनच्या हुकुमशाहीखाली क्राती धगधगती ठेवणे. अजूनही समाजवादी समाजामध्ये वर्ग, वर्गविरोध आणि वर्गलढे अस्तित्वात आहेत. प्रमुख विरोध बूर्झ्वाझी व प्रोलेटॅरिअटमध्ये आहे. वर्गविरहित समाजरचनेच्या चुकीच्या तत्त्वाला वर्गविरोध, वर्गलढे एकदम सपुष्टात येतील या तत्त्वाला मूठमाती देण्यात आलेली आहे. 'सगळ्यांनी कामाला लागून अधिक मोठे, अधिक वेगवान, अधिक चांगले, अधिक लाभ मिळवून समाजवादाला बळकटी आणण्यास मदत करा!'. या माओच्या वचनाला जागून लोक राबत आहेत. शेती हा पाया व उद्योगधदे हा नेतृत्व करणारा घटक अशा स्वरूपाच्या विभागणीमुळेच (जी विभागणी सर्व मागासलेल्या व विकसनशील देशात आवश्यक आहे) हे शक्य झाले आहे. कारण अशा विभागणीमुळे एक सतत विकास होणारी अतर्गत बाजारपेठ लाभते. वर्धमान उद्योगांना कच्चा माल आणि जनतेसाठी धान्य पुरविले जाते. शिक्षण व संस्कृतीचा विकास होऊन समाजवादी उद्योगीकरणासाठी एक भक्कम पाया रचला जातो कारण चीनने ठिकठिकाणी 'कम्युन्स' उभारून शेतीचे सामूहिकीकरण फार आधी केले व मग उद्योगीकरणाकडे लक्ष दिले.

चीन दुसऱ्या राष्ट्राच्या चुकापासून स्वत धडे घेत आहे आणि परदेशी गोष्टीचे अंधानुकरण टाळीत आहे. त्यामुळे परकीय सत्तेचा हस्तक्षेप कमीत कमी होतो आणि शेषजगताच्या नित्याच्या Crises पासूनही राष्ट्राला त्रास होत नाही. म्हणूनच तिसऱ्या जगातल्या राष्ट्राना चीन आज मदत करू शकत आहे अशा रीतीने चीन पूर्ण आदर्शपणे अंतर्गत धोरणे हाताळीत आहे

**परराष्ट्रीय धोरण :** जगामध्ये भांडवलशाही अस्तित्वात असताना आपल्या देशातील समाजवाद चिरस्थायी होऊ शकणार नाही याची चीनला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच जागतिक क्राती जवळ आणण्यासाठी चीन पुढीलप्रमाणे मदत करीत आहे .

१ : दोन बड्या शक्तीविरुद्ध विशेषत. रशियाविरुद्ध जागतिक लढा तीव्र करणे.

२ : दोन बड्या शक्तीमधील अंतर्गत विरोधाचा फायदा उठवून आपली परिस्थिती बळकट करणे व त्यायोगे साम्राज्यवादविरोधी भूमिका कायम ठेवणे.

३ : दुसऱ्या जगातील जपान, कॅनडा आणि पश्चिम युरोपातील देशांना त्यांना साम्राज्यवादविरोधी भूमिकाना पाठिंबा देणे. त्या देशातील कामगाराना प्रस्थापित भांडवलशाही राज्यव्यवस्थेविरुद्धच्या लढ्यात सहकार्य करणे

४ : सर्व राष्ट्रीय मुक्ति–आदोलनाना पाठिंबा देणे.

५ : तिसऱ्या जगातील राष्ट्राना निःस्वार्थी आर्थिक व तांत्रिक मदत करणे.

६ : तिसऱ्या जगातील देशांनी अतर्गत भांडणे शांततेने व दोन्ही बड्या शक्तीना दूर ठेवून सोडवावीत म्हणून प्रयत्न करणे.

७ : क्रातीची निर्यात करण्यापासून म्हणजे स्वतःच्या सीमांबाहेर सैन्य पाठविणे, हल्ले करणे यांपासून चीन दूर राहतो. तरीही दुसऱ्या देशात अतर्गत ढवळाढवळ न करता राजकीय व नैतिक पाठिंबा या क्रांतियोग्य राष्ट्राना देणे अशी त्याची भूमिका आहे.

अशा रीतीने चीन अत्यत योग्य पावले टाकीत आहे. ही धोरणे माओच्या मृत्यूनंतरही चालू आहेत. कारण हुआ-कुआ-फेंगच्या नेतृत्वाखालील महान कम्युनिस्ट पक्षाने आपली समर्थता माओचा मृत्यू ते हुआ-कुओ-फेंग याची निवड या सधिकालात दाखवून दिलेली आहे. तेव्हा स्टॅलिनने १९२७–२८ च्या रशियासाठी जे आवाहन केले होते, की प्रत्येक सच्चा क्रातिकारक रशियाला पाठिंबा देईल तेच आज द ग्रेट सोशॅलिस्ट चायनाला लागू आहे.

**CPI(M–L) ची चीनभक्ती अशी जाज्वल्य आहे !**

काळाच्या कसोटीवर नक्षलवादाची तपासणी करताना अर्थातच वर्तमानकाळाला महत्त्व येणार. कारण नक्षलवाद, एक प्रवाही तत्त्वज्ञान म्हणून जिवत असो किंवा नसो, एक संस्था म्हणून तो नक्कीच जिवंत आहे आणि या देशाच्या राजकीय सक्रमणाच्या काळात या संस्थेच्या अस्तित्वाचा आणि हालचालीचा मागोवा घेणे अपरिहार्यच आहे. जनतापक्ष आणि नक्षलवाद याच्यातील वैचारिक आंतरक्रिया

समजून, घेणे यादृष्टीने उद्‌बोधक ठरेल

जनता पक्षाच्या स्वरूपाचा व अंतर्बाह्य जडण-घडणीचा नक्षलवादाच्या चष्म्यातून स्पष्ट होणारा अन्वयार्थ व विश्लेषणात्मक प्रतिक्रिया प्रथम पाहू. मे १९७७ चा 'रेड फ्लॅग' या गुप्त बुलेटिनचा पहिला अंक (मे १९७७ पासून CPI (ML) च्या 'लिबरेशन' यापूर्वीच्या मुखपत्राची जागा 'रेड फ्लॅग'ने घेतली आहे.) आणि सीपीआय्(एम्.एल्) च्या आंध्र राज्यसमितीने १ जुलै १९७७ रोजी प्रसिद्ध केलेली 'फॅसिझमविरोधी आदिवासी संघर्ष' अशा आशयाच्या शीर्षकाची पुस्तिका यात हे विश्लेषण व पर्यायाने नक्षलवादाचे भावी राजकीय धोरण सुस्पष्ट प्रतिबिंबित झालेले आढळते. शिवाय नक्षलवाद म्हणजे काही केवळ सीपीआय्(एम्एल्)चे तत्त्वज्ञान नव्हे, तेव्हा त्यातल्या इतर प्रवाहांचा व त्यायोगे उद्भवणाऱ्या मत-मतांतरांचाही उल्लेख येईलच.

## जनता पक्षाचे वर्गविश्लेषण

'आपल्या जनतेने फॅसिस्ट इंदिरा सरकारचा पाडाव करून एक महान आणि ऐतिहासिक विजय या सार्वत्रिक निवडणुकामध्ये संपादन केलेला आहे', अशीच सुरुवात करून या विजयाचे ठरीव साच्याचे गोडवे या पुस्तिकानी गायले आहेत या विजयामुळे पाश्चात्य भांडवलदारी साम्राज्यवाद, रशियन सामाजिक साम्राज्यवाद आणि हुकुमशाही-विस्तारवाद याचा एक पराभव झाला असल्याच निदान करून मग नक्षलवादाशी सुसंगत अशा विश्लेषणाची सुरुवात होते. इंदिरेची हुकुमशाही जाऊन जनता-राजवट आली यामुळे भारताच्या अर्ध-वसाहती व अर्ध-सरंजामदारी स्वरूपामध्ये काहीच फरक पडलेला नाही. सरंजामशाही जमीनदारीविरुद्ध बहुसंख्याक सामान्य जन हाच आजही भारतातला सर्वात महत्त्वाचा संघर्ष आहे **कारण जनतापक्षाची सूत्रेही बिग बूर्झ्वा-बडे जमीनदार यांच्याच हाती आहेत. प्रत्यक्षात हा एक बळकट पक्ष नसून राजकीय व संघटनात्मक दृष्ट्या एकजीव, एकसंध नाही. परस्परविरोधी तत्त्वप्रणाल्या व ध्येये असणाऱ्या घटकपक्षांचे, विषमता अंर्तविरोध व परस्परमतभेद यांनी भरलेले असे ते एक मिश्रण आहे, यात बडे जमीनदार, बिग बूर्झ्वा, नॅशनल बूर्झ्वा पेटी बूर्झ्वा, प्रतिक्रियावादी, सुधारणावादी प्रागतिक गट आणि लोकशाही समाजवाद व बूर्झ्वा उदारमतवाद यांचे सर्वांचेच प्रतिनिधी दिसतात. या सर्वांमधील लाथाळ्या वाढत्या आर्थिक समस्यांसमवेत वाढतच जाणार आहेत. कारण एकीकडे आर्थिक सुबत्तेविषयी जनतेच्या अपेक्षा वाढतच आहेत आणि जनता सरकारने अबाधित ठेवलेली व बड्या जमीनदार-बिग बूर्झ्वांच्या वर्चस्वाखाली गेलेली सध्याची भारतीय अर्थव्यवस्था या अपेक्षा पूर्ण करण्यास अधिकाधिक असमर्थ ठरणार आहे. यामुळे क्रांतीला अधिकाधिक अनुकूल अशी परिस्थिती तयार होत आहे.**

इंदिरा सरकार हे राजकारण, अर्थकारण, लष्कर आणि मुत्सद्देगिरी या चारही दृष्टिकोनातून सोव्हिएत सोशल इंपीरियलिझमवर जास्त प्रमाणात अवलंबून होते, तर जनतासरकारचा कल पाश्चात्य साम्राज्यवादाकडे, मुख्यत. अमेरिकन साम्राज्यवादाकडे अधिक राहणार आहे. इंदिरा राजवटीमध्ये लष्कर, सार्वजनिक उद्योगधंदे आणि अर्थव्यवस्था यांमध्ये सोव्हिएत भांडवलाचा ओघ सरकारी कृपेनेच वाहात होता. विस्तारवादी रशिया आपली ही आर्थिक वसाहत सोडायला तयार होणार नाही. अमेरिकन भांडवलदारांनी भारतातल्या खाजगी उद्योगक्षेत्रात अगोदरच हात-पाय पसरलेले आहेत. त्यातच आता त्याना सरकारचा आशीर्वाद लाभणार असल्याने, भारताला आपलीच एकट्याची वसाहत बनविण्यासाठी चाललेला या दोन बड्या शक्तींचा लढा यापुढे आणखीनच उग्र होत जाईल. या दोन्ही बड्या शक्तींना सारख्याच योग्यतेचे शत्रू मानून विरोध केला पाहिजे.

**'जनता सरकारचे वर्गविश्लेषण केल्यानंतर ते कोणतेही मूलभूत परिवर्तन घडवू शकणार नाही याची साक्ष पटते आणि म्हणून या सरकारला मूलतः आमचा विरोधच राहील, असे स्पष्ट केल्यानंतरही नक्षलवाद हे मान्य करतो की, जनता सरकारविषयीचा आपला पवित्रा हाच जनतेचा पवित्रा / दृष्टिकोन आहे असे मानावयास जागा नाही.'** या व पूर्वीच्या सरकारमध्ये वर्गविश्लेषणाच्या दृष्टिकोनातून कोणताही महत्त्वाचा फरक नसला आणि जमीनदार-भांडवलदाराच्या आधिपत्याखालचे हे सरकार निवडणूक-आश्वासने पुरी करण्यास असमर्थ ठरत असले तरी अजून लोकाच्या मनातून ते उतरलेले नाही. लाखो लोक त्यांच्याकडून फार अपेक्षा बाळगून आहेत आणि त्या सफल करण्यासाठी नव्या सरकारला थोडा अवधी द्यायची त्यांची तयारी आहे. मागील सरकारप्रमाणे ह्या सरकारकडे जनता आपले शत्रू म्हणून पहात नसल्यामुळे इतक्यातच ते सरकार उलथवून टाकण्याचा प्रयत्न करता येणार नाही. तसा प्रयत्न म्हणजे वेडा साहसवाद ठरेल आणि त्याला प्रतिसाद मिळणार नाही. लोकांचे नीतिधैर्य खचलेले नाही आणि नागरी स्वातंत्र्याचा ते पुरेपूर उपयोग करू इच्छितात.

भावी काळातील क्रांतिकारी (नक्षलवादी) संघर्षांची उभारणी या सध्याच्या लोकमताच्या पायावरच केली पाहिजे. प्रथम फक्त निवडणूक-आश्वासने पुरी करण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यास लोकाना प्रवृत्त केले पाहिजे. त्यासाठी आपला प्रचार लोकमत विरोधी असता उपयोगी नाही. जसजसे अधिकाधिक लोक अशा प्राथमिक लढ्यात (आश्वासनपूर्तीच्या आग्रहासाठी लढा) सहभागी होतील तसतसा या सरकारच्या वर्गीय स्वरूपाबाबत त्यांचा भ्रमनिरास होत जाईल. यानंतर त्यापेक्षा प्रगत अशा तीव्रतर क्रांतिकारी संघर्षासाठी त्याना तयार करणे शक्य होईल. याप्रमाणे पायरी-पायरीने व धीमेपणानेच त्यांना सर्वंकष परिवर्तनशील कृषकक्रांतीच्या दिशेने नेले पाहिजे.'

## वाटाघाटी कशासाठी ?

जनतापक्षाबद्दलची ही नक्षलगीता वाचल्यानंतर सहजच असा प्रश्न कुणाच्याही मनात येईल की, जनता पक्षाचे वर्गीकरण जर कॉंग्रेस सरकारपेक्षा फार वेगळे नाही तर बूर्झ्वा संसदीय लोकशाहीचे केंद्र असलेल्या दिल्लीत बसून सीपीआय् (एम. एल्)चा जनरल सेक्रेटरी असलेला सत्यनारायणसिंग हा सद्‌गृहस्थ काय करतो आहे? केंद्रीय गृहमंत्र्यांशी त्याच्या कसल्या वाटाघाटी चालल्या आहेत? विशेषत: 'जनतासरकारला आमचा मूलभूत विरोध राहील' अशी नक्षलवाणी झाल्यानंतरही?

प्रश्न अचूक आहे. विशेष म्हणजे हेच प्रश्न सीपीआय् (एमएल) शी फटकून राहणारे नक्षलवादीही विचारीत आहेत. कनू संन्याल, सौरिन बोस, अपूर्व रॉय, असीम चतर्जी, डी. व्ही. राव (यू. सी. सी. आर् आय्. (एम्. एल्.) चा नेता) व जंगल सथाळ हे नेते अगदी नक्षलवादाचे एके काळचे अध्वर्यू आणि (लाल) तारे म्हणता येतील असे. तथापि त्यानीच सत्यनारायण सिंग आणि कपनीवर वाटाघाटीद्वारे क्रातीचा विश्वासघात केल्याचे आणि इतर नेहमीचे आरोप केले आहेत या हल्ल्याला तोड द्यायचा निकराचा प्रयत्न 'रेड फ्लॅग 'ने चालविला असला तरी व्यावहारिक डावपेचाना तात्विक आदर्शांचा मुलामा देताना सिंगगटाची बरीच तारावळ उडालेली दिसते जनता सरकारशी, कम्युनिस्ट (नक्षलवादी) क्रातिकारकाची सुटका करून घेण्यासाठी चाललेल्या या वाटाघाटीचे समर्थन खालील आठ मुद्द्यावर करण्यात आले आहे–

१ : जनता सरकारने नागरी स्वातंत्र्याचे पुनरुत्थान करण्याचे वचन दिलेले आहे, त्यामुळे कम्युनिस्ट क्रातिकारकाना राजबदी म्हणून अजूनही तुरुगात डाबून ठेवण्याने अन्याय व वचनभग होतो

२ : वाटाघाटीसाठी सर्वप्रथम हात पुढे केला तो आम्ही नसून जनता पक्षानेच. (गृहमन्त्र्याचे राज्यसभेतील निवेदन : ६ एप्रिल १९७७) त्यानी अशी तयारी दाखविल्यानतर आपण प्रतिसाद देण्यात काहीच गैर नाही. कारण हे सरकार पूर्वीच्या अत्याचारी सरकारपेक्षा वेगळे आहे. या जनता सरकारमधल्या अनेक जणानी आपल्या कॉम्रेड्स्-प्रमाणेच पूर्वीच्या सरकारचे जुलूम-अत्याचार सहन केलेले आहेत व प्रतिकारही केलेला आहे.

३ : 'सर्व राजबंद्याची विनाशर्त सुटका करावी' या आमच्या मागणीला पाठिंबा देणाऱ्यामध्ये जनता पक्षातले अनेकजण आहेत. कृष्णकात, जॉर्ज फर्नांडिस, मधू लिमये, चद्रशेखर, रामधन, सुरेंद्र-मोहन याचा समावेश त्यात आहे कुलदीप नायर आणि न्या. तारकुंडे हेही नक्षलवादी क्रातिकारकावर पूर्वीच्या सरकारने केलेल्या अत्याचाराची चौकशी व्हावी यासाठी प्रयत्नशील आहेत

४ . सध्याच्या लोकप्रिय सरकारने पुढे केलेला वाटाघाटीचा हात नाकारणे याचा अर्थ लोकशाहीवादी लोकगट आणि तटस्थ लोकगट (democratic & neutral masses) याची सहानुभूती गमाविणे असा होईल आणि जनता पक्षातल्या व बाहेरच्या कम्युनिस्टविरोधी प्रवृत्तीना खत-पाणी मिळेल. विरोधकाची वाटाघाटीची मागणी इंदिरा सरकारने सतत फेटाळली आणि त्याचा परिणाम ते लोकशाहीवादी आमजनतेपासून दूर होण्यात झाला हे विसरून चालणार नाही

५ सीपीआय् (एम्एल्.) ला दहशतवादी व कटवाले म्हणून हिणवणारी कनू संन्याल, असीम चतर्जी, सौरिन बोस व इतर मडळी स्वत च क्रातिद्रोह करीत नाहीत काय ? वरील तिघे व जगल सथाळ यानी तुरुगातून दिनाक ३० एप्रिल १९७७ रोजी कृष्णकात यांच्या हवाली केलेल्या एका निवेदनात 'राज्यविधानसभा निवडणुकीत कांग्रेसला पराभूत करण्यासाठी होणाऱ्या सघर्षाला आपला पाठिंबा आहे आणि या लोकशाही प्रक्रियेत भाग घेण्याची संधी सर्व राजबद्याना देण्यात यावी' अशी मागणी केलेली आहे तिचा अर्थ काय होतो ? बगालच्या भूतपूर्व कांग्रेस सरकारातील एक मत्री ग्यानसिंग सोहनपाल यांना असीम चतर्जीने आपल्या सुटकेसाठी विनवण्या करणारी तीन पत्रे लिहिली नाहीत काय ? सुनीति घोषने जॉर्ज फर्नांडिसची भेट कशासाठी मागितली आहे ? मुख्य म्हणजे इंदिरेच्या फॅसिस्ट हुकुमशाही राजवटीविरुद्ध या सर्वांनी चकार शब्दही का उच्चारू नये ?

६ या वाटाघाटीसाठी आम्ही आमच्यावर कोणत्याही अटी लादून घेतलेल्या नाहीत.

'७ मार्क्सिझम-लेनिनिझमच्या तत्वज्ञानाने आपल्या विरोधकांशी वा शत्रूंशी तडजोड किंवा वाटाघाटी करण्यास तत्वतः व सार्वत्रिक, सार्वकालिक बदी केलेली नाही वेळप्रसंग ओळखून हे मार्ग स्वीकारणे क्रांतीच्या हिताचेच आहे आणि जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा इतिहास याचा साक्षीदार आहे. अशा वाटाघाटी नाकारण्याचा जो मूर्ख आदर्शवाद अपूर्व रॉय, डी. व्ही. राव; खोकन मुजुमदार, कनू संन्याल व इतराना कवटाळून धरला आहे तो मार्क्सिझम–लेनिनिझमच्या व्यावहारिक तत्त्वांशी सुसंगत नाही 'लेफ्ट विंग कम्युनिझम : अॅन इन्फन्टाइल डिसऑर्डर' या शीर्षकाच्या आपल्या लिखाणात महागुरू लेनिन यानेही अशा आंधळ्या आदर्शवादाचा निषेधच केलेला आहे व्हिएतनाममध्ये युद्ध चालू असतानासुद्धा अमेरिका व व्हिएतनाम यांची बोलणी पॅरिसमध्ये चालू होतीच हे विसरता येणार नाही तेव्हा अशा बोलण्याची व तडजोडीचा योग्यायोग्यता व उपयुक्तता ही क्रांतिकारी चळवळीच्या तत्कालीन राजकीय गरजांच्या सदर्भातच ठरविली पाहिजे. प्रत्यक्ष जिवंत परिस्थितीचे वास्तववादी मल्यमापन केले पाहिजे हाच मार्क्सिस्ट–लेनिनिस्ट शिकवणीचा आत्मा आहे

८ वाटाघाटीचा निर्णय घेण्यापूर्वी सीपीआय् (एम्एल्.) ने आमजनतेची राजकीय परिस्थिती आणि स्वत ची व सरकारची तुलनात्मक ताकद याचे परखड मूल्यमापन केलेले आहे आपले बहुसंख्य कार्यकर्ते–नेते दीर्घकाळ तुरुगवासात असल्याने पक्षाची लढाऊ ताकद कमी झाली आहे ही वस्तुस्थिती नजरेआड केल्याने प्रश्न सुटणार नाही. (त्यामुळे नागरी स्वातत्र्यासाठी [ व पर्यायाने आपल्या राजबदी कॉम्रेड्स्च्या सुटकेसाठी ] मोहीम उघडणे आपणाला आवश्यक आहे) आपला पक्ष उघडपणे राजकीय पक्ष आहे व वरील कार्यासाठी शक्य त्या सर्वांची मदत घेण्यास मार्क्सिस्ट–लेनिनिस्ट तत्त्वाची हरकत नाही, मग तो मदतदाता कितीही अस्थिर, तात्कालिक किंवा अटी घालणारा असो.

## आजचे डावपेच व उद्याचे धोरण

या सर्व विवेचनावरून नक्षलवादाचे प्रचलित राजकीय डावपेच आणि त्याना केलेली सैद्धातिक समर्थनाची रंगरगोटी याचे स्वरूप स्पष्ट व्हावे. जनतापक्षाशी सीपीआय् (एम्एल्) चा सभाव्य सलोखा तात्पुरता असून तो त्याच्या भावी धोरणातला एक डावपेच आहे हे तऱ्यातून उघड होतेच; पण वर्तमान राजकीय घडामोडी व जनता पक्षाचा उदय याच्याविषयीचा नक्षलवादाचा पवित्राही स्पष्ट होतो. या पवित्र्यातून नक्षलवादाचे उद्याचे धोरण जन्म घेणार आहे. त्याची रूपरेषा नक्षलवाद्याच्याच शब्दात अशी देता येईल –

'कष्टकरी वर्गाच्या नेतृत्वाखाली दीर्घकालीन सघर्ष करून आमजनतेची लोकशाही क्रान्ती घडवून आणणे हे आपल्या पक्षाचे मूल-.

भूत ध्येय आहे. आपल्या समाजात मूलभूत परिवर्तन घडवून आणण्यासाठी व साम्राज्यवाद, सरंजामशाही आणि दलाली–नोकरशाहीयुक्त भांडवलदारी (Compradore bureaucratic capitalism) याचा नि पात करण्यासाठी आपल्याला पुढीलप्रमाणे पावले टाकावी लागतील –

**१. गेल्या दहा वर्षातील लढ्याद्वारे मुक्त केलेले भू-प्रदेश व कमविलेली मिळकत यांचे संरक्षण करण्यासाठी संघर्षाचे सर्व मार्ग व संधी वापरून लोकांना प्रवृत्त करणे.**

**२. शेतमजूर व शेतकरी यांना शोषक व अत्याचारी जमीनदारांविरुद्ध व गावातील. शतकानुशतकांच्या दडपशाहीविरुद्ध लढा देण्यास प्रवृत्त करण्यासाठी, उपलब्ध असलेल्या सर्व कायदेशीर मार्गाचा पुरेपूर फायदा उठविणे 'Path' मध्ये ग्रथित केलेल्या आपल्या पक्षाच्या सात कलमी कार्यक्रमानुसार शोषितांची सत्ता गावोगाव प्रस्थापित व्हावी यासाठी प्रयत्न करणे.**

**३. जमीनदारीविरोधी लढा मजबूत व प्रखर करण्यासाठी आवश्यक असलेल्या कम्युनिस्ट क्रांतिकारी राजबंद्यांची सुटका व्हावी व संघर्षभूमीतील पोलिसपथके काढून घेतली जावीत यासाठी प्रचंड प्रमाणावर लोकसंघर्ष संघटित करणे यासाठी निषेधाचे उपलब्ध असलेले सर्व प्रकार–पत्रके, निवेदने, शिष्टमंडळ, सह्यांची मोहीम, सभा, निदर्शने व शक्य तर संपसुद्धा – वापरावेत.**

नागरी स्वातंत्र्याच्या पुनरुज्जीवनाची वचने देतच जनता पक्ष सत्तेवर आलेला असल्यामुळे आपल्या कॉम्रेड्स्च्या सुटकेची मागणी करून आपण सरकारची सत्त्वपरीक्षाच घेणार आहोत. तेव्हा आपली ही सर्वांत महत्त्वाची मागणी जोराने पुढे रेटण्यासाठी संपूर्ण देशात सर्व पातळ्यावर नागरी स्वातंत्र्यरक्षण समित्याची स्थापना करावी व त्यासाठी सर्व देशभक्त व लोकशाहीवादी घटकाचे सहकार्य मिळवावे. आयटक व इटक युनियन्स आणि त्याचे खासदार यानाही पाठिंब्यासाठी आवाहन करावे. मात्र डागे प्रभृति प्रतिक्रियावादी क्रांतिविरोधकाना या मोहिमेत कोणतेही स्थान देऊ नये. इदिरेच्या कृष्णकृत्याना मदत करण्यच्या त्यांच्या गलिच्छ कारवायाची कडक शिक्षा जनतेने त्यांना दिलीच आहे.

४. पाश्चात्य साम्राज्यवाद, अमेरिकन साम्राज्यवादी भांडवलदारी, सोविएत सोशल इंपीरिॲलिझम व कॉम्प्रोदोर ब्यूरोक्रॅटिक कॅपिटॅलिझम आणि या सर्वांचे भारतात गुतलेले भाडवल या सर्वांचा निचरा करणे आणि एतद्देशीय भाडवलदारी–सरंजामदारी निपटून घेणे हे आपले प्रमुख ध्येय आहे. त्या दृष्टीने सघर्षमय जनजागृतीचा लढा सुरक्षित ग्रामीण भाग व महत्त्वाचे औद्योगिक टापू याच्यात पसरविणे हे आपल्या पक्षघटकाचे पहिले कर्तव्य राहील. लोकांच्या मागण्याचे लढे सघटित करण्यासाठी कामगार, शेतकरी, विद्यार्थी व इतर कष्टकरी समाजघटकांच्या मजबूत सघटना आपण बाधल्या पाहिजेत. आणीबाणीमुळे विस्कळित झालेल्या लोकसघर्ष समित्या पुन्हा उभ्या केल्या पाहिजेत. असे खडित लढे लढविताना त्यांचे उद्देश हे लोकामधील जागृती व त्याच्या इच्छा-आकाक्षा यावर अवलंबून ठेवावेत.

५. वरील लोकलढे लढविताना शक्य व योग्य त्या सर्व देशभक्त–लोकशाहीवादी शक्तीचे सहकार्य घेऊन सयुक्त आघाड्या उभारण्यास हरकत नाही. जनता पक्ष व CPM.ची डावी आघाडी यातील अंतर्गत मतभेदाचा फायदा घेऊन त्यातील प्रागतिक शक्तीनाही या सयुक्त सघर्ष आघाडीत सामील करून घ्यावे आणि त्या दोन पक्षात–विशेषत: जनता पक्षात–फूट पाडून नवे राजकीय ध्रुवीकरण घडवून आणावे.

६. लोकसघर्ष सघटित करताना संसदीय लोकशाही मार्गाचा अवलंब जरूर करावा. आपल्या पक्षाच्या कार्यक्रमाचा प्रचार–प्रसार करण्यासाठी त्याचा चागला वापर करून घेता येईल. एवढेच नव्हे तर नुकत्याच झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकांतही, फॅसिस्ट व प्रतिगामी सुधारणावादी शक्तीचा पराभव व्हावा यासाठी आपल्या पक्षाने भाग घेतला होता **तत्पूर्वीच्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा आपला निर्णय चुकीचा होता.** लोकाच्या आशा-आकांक्षाचे अचूक निदान करण्यास आपण त्या वेळी असमर्थ ठरलो फॅसिझमविरुद्ध विजयी लढा देण्यासाठी त्या निवडणुकांतही आपण भाग घ्यावयास हवा होता.

७. लोकसघर्ष संघटित करताना लढ्याचे सर्व उपलब्ध मार्ग व प्रकार (forms) आपण हाताळले पाहिजेत. उदाहरणार्थ,

अ : तुरुंगातील कॉम्रेड्स्ची सुटका झाली किंवा भूमिगत कॉम्रेड्स्वरील वॉरंटस् मागे घेण्यात आली की, त्यांनी उघडपणे व कायदेशीर मार्गांनी पक्षकार्य (प्रचार, संघटन इ.) सुरू करावे.

ब : मात्र याच वेळी उघडपणे कायदेशीर काम अगोदरच करीत असलेल्या **कार्यकर्त्यांनी पक्षसंघटन व तत्सम प्रश्नांबाबत पुरेशी गुप्तता राखावी.** यामुळे वर्गशत्रूच्या अचानक सभाव्य चढाईला किंवा परिस्थितीतील अकस्मात परिवर्तनाला त्याना सुरक्षितपणे तोंड देता येईल.

क : पक्षाच्या नावाखाली काम करताना संघटना व प्रचार (स्थानिक) लोकसघटनाचा व संयुक्त आघाड्याचा पुरेपूर वापर क्रांतिकार्य पुढे रेटण्यासाठी करण्यात यावा.

ड : लोकसंघर्ष सघटित करण्याचे काम उघडपणे चालणार असले तरी **लढाऊ पथके–पक्षघटक यांची उभारणी मात्र शत्रूंच्या हल्ल्यापासून सुरक्षित अशा ठिकाणी (म्हणजेच गुप्तपणे) करण्यात यावी.**

ई : संधी मिळेल तसतशी ठिकठिकाणी पक्षाची अधिकृत कार्यालये व कायदेशीर मुखपत्रे प्रचारार्थ सुरू करण्यात यावीत. **मात्र पक्षाच्या सर्व प्रकारच्या कामांसाठी ही कार्यालये वापरावीत असे नाही !**

याच वेळी पक्षातर्गत बाधणी सर्व पातळ्यावर 'भक्कमपणे होण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली आहे. नवे कार्यकर्ते मिळविणे, याआधीच्या लढ्यात झालेली मनुष्यहानी व पक्षसघटनेची नुकसानी भरून काढणे आणि सर्व कार्यकर्त्या पथकाना क्रांतिकार्यासाठी आवश्यक असे आधुनिक प्रशिक्षण देणे यावर पक्षाचे अतर्गत धोरण म्हणून भर देण्यात आला आहे यापूर्वी माडण्यात आलेल्या उद्दिष्टाच्या सौम्य–सरळ–साध्या भाषेतून नक्षलवादाचे भावी स्वरूप कसे डोकावत आहे हे साक्षेपी वाचकाना वेगळे स्पष्ट करून सागण्याची आवश्यकता नाही. सातव्या उद्दिष्टाच्या उपकलमामध्ये कायदेशीर व बेकायदेशीर संघर्षमार्गांची जी बेमालूम सागड घालण्यात आली आहे ते उदाहरणही नक्षलवादाचे भविष्यकालीन रगरूप उघड करण्यास पुरेसे आहे.

काळाच्या कसोटीवर नक्षलवादाची पाहणी–तपासणी एक राजकीय तत्त्वज्ञान आणि एक संस्थात्मक चळवळ म्हणून करताना आपण अगदी नजीकच्या वर्तमानकाळापर्यंत येऊन ठेपलो आहोत. एवढेच नव्हे तर या नवव्या लेखाकाच्या अखेरीस नक्षलवाद व जनता पक्ष निर्मिती यांच्यातील क्रियाप्रतिक्रियात्मक आतरसबध–विसंगती स्पष्ट केल्यानतर आपण नक्षलवादाच्या भविष्यकाळातही थोडेसे डोकावलो आहोत. आता दहाव्या आणि अखेरच्या लेखाकात आजपर्यंतच्या या शोधयात्रेचे पुनर्मूल्याकन केले की, नक्षलवादाचा हा शोध (काही अशी आणि एका मोठ्या टप्प्यापर्यंत तरी) पुरा होईल.

[ क्रमश: ]

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## पुणेकरांनी शर्यत पाहिली ..

आणि 'येणार, येणार' म्हणून गाजलेली ती शर्यत आलीच. लंडन–सिडने शर्यत. गाड्यांची शर्यत. एवढ्या दूरच्या पल्ल्याची शर्यत. पळणाऱ्या गाड्या पुण्यात येणार, तुमच्या-आमच्या नजरेसमोरून सुसाट धावत जाणार, म्हणजे केवढा अपूर्व योग ! विदेशी बनावटीच्या एवढ्या गाड्या एकदम पाहायला मिळणार या नुसत्या कल्पनेनेच आख्खा पुणेकर थ्रिल झाला. शर्यत येणार याची तशी माहिती आधी कुणालाच फारशी नव्हती. तोच एक दिवस सगळ्या वर्तमानपत्रात चित्रविचित्र गाड्याचे फोटो, त्यांच्या धावण्याचे, वेगाचे उच्चांक असा सगळा रोमहर्षक मसाला छापून आला आणि त्याबरोबरच ही मंडळी पुण्यातही येत असल्याचे शुभवर्तमान आले. पुणेकराच्या आनंदाला पारावार उरला नाही ! आयुष्यातून एकदाच येणारी असली सुवर्णसंधी वाया न दवडण्याचा चंग पुणेकरानी बांधला. एरवी सटर-फटर रिक्षा, फार तर टॅक्सी पाहून थकलेल्या डोळ्याना तेवढाच विसावा, त्यातून या गाड्या तर ताशी १०० किलोमीटर असल्या वेगाने पळणार ! पुण्याच्या खड्ड्यामधून, गटारांवरून हा वेग कसा काय टिकायचा अशीही उत्सुकता होतीच.

तर अशा रीतीने तमाम पुणेकर मंडळी त्या दिवशी मोटारगाड्याची शर्यत पाहायला रस्त्यावर कडेकडेने गर्दी करून राहिली. गाड्या सकाळी साडेनवाला मुबईहून सुटणार अशी बातमी होती तेंव्हा सगळा हिशेब मनात करून मंडळी ठीक अकरा वाजता रस्त्यावर जमू लागली. उत्सुकतेने माना वेळावून मोटारीची वाट पाहू लागली. कित्येक शाळानी सहलीसाठी म्हणून आपले विद्यार्थी रस्त्यावर आणून सोडले आणि मग गणवेश घालून आलेली छोटी छोटी बच्चेमंडळी रस्त्यावर हारीने मांडल्यागत बसली. त्याचे शिस्तप्रिय शिक्षक रस्त्यावर शिस्त पाळू लागले. आदेश देऊ लागले. दोनच्या-तीनच्या रांगा करून परेड घेऊ लागले. बहुसंख्य कॉलेजकुमारानी आपल्या पीरियड्सना दांडी मारून आज कँटिनऐवजी रस्त्यावर, फूटपाथवर आपला मोर्चा वळविला आणि रस्त्याकडेच्या एकूणएक कट्ट्यांवरून, भिंतीवरून टाळ्याचे, शिट्ट्याचे आवाज उठू लागले. कित्येक दक्ष सरकारी कर्मचारी वेळात वेळ काढून हा प्रसंग गोड करण्यासाठी रस्त्यावर उपस्थित होतेच. एकूण मॉब असा हा हा म्हणता शेकड्याचा हजारावर गेला. शर्यतीचे रस्ते गर्दीने फुलून गेले. अगदी सायकल चालविणेही अशक्य व्हावे अशी परिस्थितीही उद्भवली. परिस्थितीचे हे गांभीर्य पोलिसाच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांनी लगेच शिट्ट्या वाजवायला सुरुवात केली. उत्साही प्रेक्षकांना मागे ढकलण्याचा प्रयत्न सुरू केला; पण आधीच मोटारी यायला उशीर झालेला. सगळी प्रेक्षकमंडळी त्यामुळे कावलेली तेव्हा अशा वेळी शिस्तीचा काय उपयोग ? तेव्हा पोलिसाच्या या शिस्तीचा परिणाम नेहमी व्हायचा तोच झाला. सगळी गर्दी रस्त्याच्या मध्यभागीच दाटून उभी राहिली आणि पोलिसांच्या शिट्ट्या बंद झाल्या !

इतके होऊनही मोटारी येण्याची काही चिन्हे दिसेनात कित्येकांनी चिडून रेसची, त्या मोटारींची थट्टा सुरू केली. काहींनी रस्ता सोडून तडक आपल्या कामाचा मार्ग धरला. बिचारी शाळकरी मुले कंटाळून धाकाने जांभया आवरत बसली आणि मग अचानक एक गाडी आली. शर्यतीची गाडी !

–खूप मोठा हॉर्नचा आवाज आणि गाडी गेली !

दुसरी एक गाडी आली ..आणि गेली !

आणि मग तिसरीही एक आली...आणि गेलीसुद्धा !

पुणेकर धन्य झाले ! त्यानी रेसच्या कार्स पाहिल्या रेस–कार्स !

'काय पण गाड्या !'

'दिसल्यासुद्धा नाहीत !'

'काय ते एक्सपर्ट ड्रायव्हर ! एवढ्या गर्दीतून गाडी काढली !'

'तेही दिसलेसुद्धा नाहीत !'

कृत्यकृत्य होऊन पुणेकर घरी, कचेरीत परतले. न दिसणाऱ्या मोटारगाड्या, त्यांचे न दिसलेले ड्रायव्हर्स पाहून ते समाधान पावले; पण काहींचे एवढ्यात समाधान होणे कधीच शक्य नव्हते. शर्यत झाली म्हणून काय झाले ? पुणेकरांनाही त्यांची परीक्षा घेण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि त्यातून स्वतः पारखून पाहिल्याशिवाय पुणेकर कुणाचीच थोरवी मान्य करीत नसतात. तेव्हा काहींनी या कार-ड्रायव्हर्सची अगदी कसून परीक्षाही घेतली. कुठे, कुणी त्याच्या गाडीसमोर सायकल आडवी घातली. कुठे, कुणी ट्रकवाल्याने त्यांचा आणि त्यांच्या वेगाचा नक्षा उतरविला. कुठे, कुणी रिक्षावाल्याने त्याच्याशी आट्यापाट्या खेळून पाहिल्या. पुढच्या प्रवासात तर कुठे कुणी तरी या शर्यतीच्या गाड्यांवरही दगडफेक करून काचा फोडल्या; पण हा कदाचित सवयीचा परिणाम असावा. वेगाने जाणारी विलायती कार आणि आसपास बघ्यांची गर्दी म्हणजे मंत्र्यांची गाडी आणि म्हणजेच दगडफेक, चप्पलफेक असे काहीसे विचित्र समीकरण काही खुळ्याच्या डोक्यात बसले असल्याने त्याचा हा परिणाम असावा; पण याशिवाय या दिव्याला तोंड देणाऱ्या या वीराचे कित्येकानी अभिनंदनही केले. त्यांच्या वेगवान गाड्यांना घेरावो घातला. प्रेमभराने त्यांना थांबवून त्याची विचारपूस केली, त्यांना हार घातला. पुण्यात आलेले हे पाहुणे पुणेकराचा पाहुणचार न घेताच पुढे जातील हे कसे शक्य आहे ?

त्या दिवशी पुणेकरांनी संध्याकाळपर्यंत रस्त्याच्या कडेकडेला उभे राहून येणाऱ्या एकूणएक गाड्याचे असे स्वागत केले. त्यांना अडवून त्यांची परीक्षा घेतली आणि हसतखेळत पाहुण्यांचा निरोप घेतला. कुणी भले पुणेकरांच्या या वागण्याला गलथानपणा, मूर्खपणा म्हणोत. याचे दोन निष्कर्ष निश्चितच महत्त्वाचे आहेत–

१. पुणेकर मंडळी खरोखर आतिथ्यशील आहेत. अगदी गडबडीत असलेल्या पाहुण्यांचेही ते यथोचित स्वागत करतात.

२ कुठल्याही कामाच्या दिवशी पुण्यात असे हजारो, लाखो लोक तासनतास आपला वेळ रस्त्यात घालवू शकतात.

बाकी आता शर्यत भारताबाहेर गेलीच आहे. त्याची चर्चाही कमीकमी होऊ लागणारच. हळूहळू तिची आठवणही तुमच्या आमच्या मनातून पुसली जाईल. अगदी त्या कार्सचे कसबी ड्रायव्हरदेखील या स्पर्धेच्या आठवणी विसरू लागतील; पण एक-दोन महत्त्वाच्या गोष्टी मात्र त्यांच्या कायम लक्षात राहतील.

इराणमधलं वाळवंट फार भयानक असतं. तिथं गाड्या सारख्या पंक्चर होतात आणि पुण्यातली गर्दी मोठी विलक्षण असते. ती कधी काय करील हे सांगवत नाही. □

## पुस्तके

# बंगलोर ते रायबरेली

### राजकीय प्रवासाचे निवेदन

भारतामध्ये नुकत्याच येऊन गेलेल्या आणीबाणीने एक तरी फायदा निश्चितच झाला. भारतातील लेखकांना एक अत्यंत ताजं असं खाद्य मिळाल; पण यापैकी बरचसं साहित्य वाचकांच कुतूहल शमवणं (आणि भरपूर आर्थिक फायदा मिळवणं) या एकाच उद्देशाने निर्माण झालेलं दिसतं. घडल्या घटनांचा चिकित्सक अभ्यास करून त्यातून काही तरी नवं राजकीय चिंतन करण्याची किंवा करायला लावण्याची इच्छा यापैकी फारच थोड्या लेखकांच्या मनात असावी. जास्तीत जास्त खळबळजनक अशा Inside Stories बाहेर काढण्यातच सर्वत्र विशेष स्पर्धा दिसून येते. प्रकाशकांनीही 'धंदा' हा प्रमुख हेतू डोळ्यांसमोर ठेवून या सबंध परिस्थितीतून encashment करून घेतलेली दिसते. या पार्श्वभूमीवर श्री. वि. स. वाळिंबे यांचं 'बंगलोर ते रायबरेली' हे पुस्तक त्यातील दृष्टिकोन आणि मांडणीच्या पद्धतीमुळे निश्चितच उठून दिसत.

'बंगलोर ते रायबरेली' हा एक आठ-नऊ वर्षांचा राजकीय प्रवास आहे– एका व्यक्तीचा आणि तिच्याबरोबरच एका बलिष्ठ राजकीय पक्षाचा या प्रवासाचं तटस्थ निवेदन या पुस्तकात वाचायला मिळतं. १२ जुलै १९६९ रोजी बंगलोर येथे काँग्रेस महासमितीच अधिवेशन भरलं होतं. इतर अनेक मुद्द्यांबरोबरच डॉ. झाकिर हुसेन यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसपुरस्कृत उमेदवाराचं नाव निश्चित करणं हा एक अतिशय महत्त्वाचा प्रस्ताव संसदीय मंडळासमोर होता. इंदिराजींच्या मनात या वेळी काही वेगळाच बेत शिजत होता. काँग्रेसपुरस्कृत उमेदवार श्री. नीलम संजीव रेड्डी यांना पाठिंबा देण्याची त्यांची तयारी नव्हती. उलट त्यांना हवे असलेले श्री. व्ही. व्ही. गिरी या अपक्ष उमेदवाराचा छुपा प्रचार त्यांनी सुरू केला होता. कारण बाईंना आपल्या मतानुसार (आणि मनाप्रमाणे) वागणारा राष्ट्रपती हवा होता. पुस्तकास सुरुवात होते ती या वादळी अधिवेशनापासून आणि इंदिराजींच्या निवडणुकीतील पराभवाची साद्यंत हकीकत देऊन पुस्तक संपतं.

मध्यंतरीचा सर्व काळ एकूण बावीस प्रकरणांमध्ये विभागला आहे त्यापैकी पहिल्या दहा प्रकरणामध्ये काँग्रेसमधील अंतर्गत लाथाळ्या आणि त्यामध्ये इंदिराजींनी आपलं वर्चस्व सतत राखण्याचा केलेला प्रयत्न याचा ऊहापोह केला आहे नंतरची सहा प्रकरणं इंदिराजींच्या मनमुराद स्वातंत्र्याच्या कारकीर्दीचं दर्शन घडवतात तर शेवटली पाच प्रकरणं आणीबाणी आणि त्या काळातील महत्त्वाचे प्रसंग यावर केंद्रित केलेली आहेत. या पाचही प्रकरणातून बाईंची सतत विनाशाकडेच वाटचाल कशी चालू होती हेच सूचित करण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकातील आपली भूमिका फक्त 'निवेदका'ची आहे असं वाळिंब्यांनी प्रस्तावनेतच सांगून टाकलं आहे; पण हे निवेदन कशा पद्धतीने करायचं याचे हक्क मात्र त्यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. म्हणजे असं की या निवेदनात त्यांनी १९६९ ते १९७७ असा सरळ धोपटमार्ग अवलंबिलेला नाही. पुस्तकाची सुरुवात जरी बंगलोरच्या ६९ च्या अधिवेशनापासून होत असली तरी दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणात पं. नेहरूंच्या काळातील काही महत्त्वाच्या राजकीय घडामोडी, त्यांच्या निधनानंतर काँग्रेसपक्षामध्ये पंतप्रधानपदासाठी खेळण्यात आलेले पेच-प्रतिपेच, शास्त्रीजींची निवड आणि त्यांच्या अवघ्या दीड वर्षांच्या कारकीर्दीनंतर पुन्हा घेण्यात आलेल्या पंतप्रधानपदाच्या निवडणुकीतील इंदिरा गांधीचा विजय, यासंबंधीची चर्चा आहे अर्थात या प्रकरणांचा उपयोगही वाळिंब्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा ठसविण्यासाठी केला आहे. तो म्हणजे स्वत:चं वर्चस्व राखण्याची ईर्षा इंदिराजींना असल्याचं तर या प्रकरणांमधून सिद्धच होतं; पण पं. नेहरूंनाही स्वत च्या मनाविरुद्ध किंवा मताविरुद्ध कोणी वागलेलं फारसं रुचत नसे. हा एक फार महत्त्वाचा मुद्दा त्यांच्या कारकीर्दीतील काही निवडक प्रसंग देऊन वाळिंब्यांनी ध्वनित केला आहे. म्हणजे कादंबरी किंवा चित्रपटामध्ये ज्याप्रमाणे फ्लॅश-बॅकचा वापर करून पात्राच्या सध्याच्या कृतीची तार्किक संगती लावण्यासाठी भूतकाळातील काही प्रसंग दिले जातात तेच काम या प्रकरणांनी बजावलं आहे अर्थात त्यामुळे सहावं प्रकरण पुन्हा गिरी–संजीव रेड्डींच्या निवडणूक–लढतीवर नेऊन सोडत.

पुढली चार प्रकरणं इंडिकेट-सिंडिकेट यांच्यातील वाढतं वैमनस्य, हल्ले-प्रतिहल्ले, त्यातील बारकावे यांचं विवेचन करतात, तर त्यापाठोपाठच इंदिराजींच्या कारकीर्दीतील रुपयाचं अवमूल्यन, बँकांचं राष्ट्रीयीकरण, १९७१ च्या निवडणुका, भारत-पाकिस्तान युद्ध, नगरवाला–प्रकरण या महत्त्वाच्या घडामोडी येऊन जातात. '*भ्रष्टाचाराला अभयदान*' अशा सूचक शीर्षकापासून अठराव्या प्रकरणाला सुरुवात होते आणि अघोरी उपाय, दडपशाहीतील धुमाकूळ, अत्याचारांचे आवर्त, फसलेला अंदाज अशी एकाहून एक चढत जाणारी (इंदिराजींच्या दृष्टीने पडत जाणारी) प्रकरणं वाचकाला खिळवून टाकतात.

या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यातील बरेचसे प्रसंग आणि घडामोडी जरी माहीत असल्या तरी त्यांची अशा तऱ्हेने सुसंगत, तार्किक मांडणी संकलितपणे प्रथमच वाचायला मिळते. तसंच पक्ष आणि व्यक्ती यात श्रेष्ठ कोण? आणि हळूहळू असुरक्षिततेच्या भयगंडाने अधिकाधिक पछाडल्या जाणाऱ्या इंदिराजी हे दोन मुद्दे या सबंध पुस्तकामधून सतत वाचकाच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे.

या सर्वच दृष्टींनी पुस्तक वाचनीय होतं; पण आणीबाणीवरील किंवा त्या विषयाशी संबंधित अशी जी काही पुस्तकं मराठी आणि इंग्लिश या दोन भाषांमध्ये निघाली आहेत त्यांच्यामध्ये जो एक महत्त्वाचा दोष राहिला आहे त्याला हेही पुस्तक अपवाद नाही. ही पुस्तकं घटनांचं किंवा घडामोडींचं विवेचन उत्कृष्टपणे करतात; पण विच्छेदन मात्र मुळीच करत नाहीत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे चिंतनाचा भाग या पुस्तकामध्येही कुठेच फारसा आढळत नाही. 'बंगलोर ते रायबरेली' या पुस्तकामध्ये आपली भूमिका फक्त निवेदकाची आहे हे वाळिंब्यांनी जरी सुरुवातीलाच स्पष्ट केलेलं असलं तरी या शैलीदार निवेदनाला जर थोडीशी पृथक्करणाची जोड मिळाली असती तर पुस्तकाचं 'वजन' नक्कीच वाढल असत.

**—सतीश कामत**

**बंगलोर ते रायबरेली**
ले. वि. स. वाळिंबे
श्रीविद्या प्रकाशन, पुणे
किं. २० रुपये

# डोंगर म्हातारा झाला!

## फसलेली कादंबरी

श्री. अनिल बर्वे यांची ही नवी कादंबरी मला मुळीच समाधान देऊ शकली नाही. कादबरी खूपच उथळ आहे यातील अनुभव पत्रकारी पद्धतीचा आहे आणि तोसुद्धा प्रचारकी अभिनिवेशाने मांडला आहे.

एकशेसत्तावन्न पानांच्या या लहानशा कादंबरीत घटना कमी आहेत व्यक्तिरेखा मात्र त्यामानाने बऱ्याच आहेत. पुस्तकाची नव्वदहून अधिक पानं उलटल्यानंतर ज्याला कथानक म्हणता येईल अशा भागाची सुरुवात होते. तोपर्यंत मेजर कामा, मळकर्णीचा डोंगर, कमराद म्हातारा, डिसोझा मोटलवाला, मुन्ना, रतुशेठ अशा अनेकांचा आपल्याशी परिचय होतो. त्यानतर 'शोषित विरुद्ध शोषक' अशा लढ्यातील फारशी गुंतागुत नसलेली एक घटना घाई-गर्दीने रगवून बर्वे कादंबरी संपवितात.

कमराद म्हातारा हा कम्युनिस्ट पार्टीचा एक सच्चा कॉम्रेड अनेक वर्षे मळकर्णीच्या डोंगरातील ठाकरांचे नेतृत्व करीत असतो. मळकर्णीत मिशनच्या हॉस्पिटलऐवजी त्याच जागेत शेठलोकांचे 'फाइव्ह स्टार' हॉटेल होऊ द्यायचे नाही यासाठी कमराद ठाकराचा 'नि.शस्त्र ससदीय लढा' उभा करू पाहतो; पण पहिल्याच लढाईत रतुशेठ प्रत्यक्ष जागेवर लाचखाऊ पोलीस आणि धर्मरक्षकसंघाचे टगे यांच्या पाशवी बळावर आणि बाहेरच्या जगात लाचार पत्रकाराच्या खोटया प्रचाराने हा लढा उधळून लावतो.

रतुशेठ 'वनसेवा आश्रमा'च्या शेकडो एकर जमिनीवरील ठाकरांच्या झोपडया उखडून आणि पेटवून या लढ्यातील पहिला शह ठाकरांना दिला जातो. हॉटेल रस्त्याच्या नियोजित मार्गावर रस्त्याचे काम सुरू होऊ नये म्हणून ठाकर धरणे धरतात; परतु कुटिल रतुशेठने ठाकरांच्या कल्पनेआधीच धोक्याच्या इशाऱ्याचे झेंडे न लावताच पेरलेले सुरुंग धरणे सुरू होताच उडवण्यात येतात. यामुळे ठाकर जिवाच्या भीतीने पळ काढतात; पण कमरादचा जवान पण पांगळा मुलगा मुन्ना, धोका दिसत असूनही घोषणा देत पुढे जातो आणि धीराने मृत्यूला कवटाळतो. कृत्रिम पाय बसविल्याने त्याला नुकतेच कुठे पुन्हा चालता येऊ लागलेले असते.

लाडक्या मुन्नाला मूठमाती देऊन कमराद लढा पुढे चालविण्याचा आपला निश्चय ठाकराना सांगतो; पण दुसऱ्या दिवशी त्याला अटक होते. त्याआधीच त्याला नेहमी जामीन राहणाऱ्या डिसोझा मोटलवाल्यालाही पकडण्यात आलेले असते.

या सपूर्ण संघर्षाचा साक्षीदार असतो निवृत्त झालेला मेजर कामा. सगळ्यांपासून अलिप्त राहणारा, फटकून वागणारा हा शिपाईगडी मुबईला वैतागून मळकर्णीला स्थायिक व्हायच्या इराद्याने येतो आणि नकळत कमराद म्हाताऱ्याशी दोस्ती जमवून बसतो. त्यालाही हा ढळढळीत अन्याय, दरिद्री ठाकरांची व सच्च्या कमराद म्हाताऱ्याची ही क्रूर चेष्टा, जवान मुन्नाचे हकनाक मरण हे सारे सहन होत नाही. तो आतपासून हालतो, अस्वस्थ होतो आणि तडकाफडकी रतुशेठ, मदनशेठ ह्याना गोळया घालून मुंबईला चालता होतो जाताना एक सवादही फेकतो, 'नही, डिसिल्व्हा, जहांके पहाड पुढे हो चुके हैं, वहाँ रहनेको दिल नही चाहता!'

अशा ह्या गोष्टीत सारं कथानक अतिशय तकलादूपणाने उभे करण्यात आले आहे. कथानकाशी संबध नसलेला बराचसा फापटपसारा लेखकाने आपल्या चटपटीत शैलीत सजवून माडला आहे; पण त्यातून वाचकाला कसलाच अनुभव हाती लागत नाही. मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे हे वरवर पाहून सांगितलेले पत्रकारी पद्धतीचे लिखाण आहे कमराद म्हाताऱ्याच्या ध्येयवादी जगण्याचा किंवा मेजर कामाला आलेल्या घणाघाती अनुभवाचा कसलाच प्रत्यय वाचकाला येत नाही ठाकराचे दरिद्री, दडपले गेलेले, शुष्क जीवनही लेखकाने वाचकासमोर उभे केलेले नाही. कादंबरीच्या सुरुवातीला लेखक एका ठिकाणी लिहितो,—'मळकर्णीच्या डोंगराला राहून राहून एकाच गोष्टीचे वाईट वाटे आणि ते म्हणजे आपल्या सोबतीला हजार वर्षे राहणाऱ्या ठाकरांविषयी चार ओळी, चार शब्द कोणी का लिहीत नाही, बोलत नाही?' एखादा प्रसंग वगळता, इथे लेखकालाही असाच प्रश्न विचारावासा वाटतो. कारण त्याने बाकी जे काही सांगितले आहे त्यात काहीही नवीन नाही, वेगळे वाटेल असे नाही.

*कादबरीतील घटना गतिमान नाहीत.* लिखाणाची शैली मात्र फारशी दर्जेदार नसली तरी रंजक आहे. चुरचुरीत भाषेत, बारकाव्यासहित आणि काही ठिकाणी विनोदाची चांगली डूब देत परिसराची, व्यक्तिरेखांची वर्णने बर्व्यांनी केली आहेत. पुस्तक वाचताना असेही वाटते की, ही शैली (खरे म्हणजे धाटणी किंवा पद्धतच, शैली नव्हे) अशा गभीर विषयापेक्षा हलक्याफुलक्या लिखाणालाच बर्व्यांना उपयोगी ठरू शकेल.

व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत बर्व्यांचे यश फारच मर्यादित आहे. मेजर कामा किंवा कमराद म्हातारा या दोन प्रमुख व्यक्तिरेखाही त्याना वाचकाच्या लक्षात राहतील अशा उभ्या करता आलेल्या नाहीत. मुन्नाची व्यक्तिरेखा तर खूपच नाटकी पद्धतीने वापरली आहे. डिसिल्वा, रुस्तुमजी पेस्तनजी (आणि त्याबरोबर मेजर कामाचे बगलाखरेदीप्रकरण) यांचा कथानकाशी काय संबध? लहानसा जीव असलेल्या या कादबरीत बर्व्यांनी अशा अवांतर गोष्टी बऱ्याच घातल्या आहेत. मळकर्णी या नावाची व्युत्पत्ती म्हणून पार्वतीच्या अगच्या मळापासून गणपती जन्मल्याची गोष्ट सागून बर्व्यांनी असेच एक पान खर्ची घातले आहे. व्यक्तिरेखापैकी त्यातल्या त्यात डिसोझा आणि बॉय डिसोझा या दोनच व्यक्तिरेखा चागल्या उतरल्या आहेत.

प्रचारकी लिखाण हा या कादंबरीचा महत्त्वाचा दोष आहे बर्व्यांनी जो विषय हाताळला आहे तो विषय घेऊन चांगली कलाकृती निश्चितच उभी राहू शकेल; पण बर्व्यांनी ज्या अभिनिवेषाने आणि त्यातही घाईगर्दीने ही कादंबरी लिहिली आहे त्यावरून बर्व्यांना विषयाचे प्रचारकी मूल्यच अधिक भावले असावे असे दिसते. कमराद म्हातारा हा कम्युनिस्ट पार्टीचा कार्यकर्ताच असल्याने कम्युनिझमच्या काही सिद्धांतांचा कादबरीत उल्लेख होणे काही चूक नाही; पण हे उल्लेख येतात ते केवळ चर्चांमधून; घोरेबाजीच्या पद्धतीने त्यांची अपरिहार्यता कुठेही जाणवत नाही. उदाहरणार्थ, 'मेजरसाब, कला ही पैशाची बटकी असते बूर्ज्वा सोसायटीत. पेंटिंग्ज काढायला कॅनव्हास, कलर कोठून आणू?' 'ब्यूटी बिलॉंग्ज् टू क्लास बावा, ब्यूटी बिलॉंग्ज् टू एक्स्प्लॉयटेशन.' 'डीक्लास होणं इझी नाही कामा.. रिव्होल्यूशन इज प्रोसेस बावा, रिव्होल्यूशन इज प्रोसेस!' ही बर्व्यांची ठोक प्रचारकी वाक्ये माझ्या म्हणण्याची कल्पना देतील.

थोडक्यात सागायचे तर बर्व्यांची 'थॅंक्यू मिस्टर ग्लाड'च्याच पद्धतीने जाऊ पाहणारी ही कादबरी पूर्णपणे फसलेली आहे. 'ग्लाड'चा बदिस्तपणा इथे नाही. 'सोबत'च्या दिवाळी अंकात 'डोंगर म्हातारा झाला' या नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली होती हे तरी कितीजणांच्या लक्षात आहे?

**—अनिल काळे**

**डोंगर म्हातारा झाला!**
श्री. अनिल बर्वे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
पृष्ठे १५७, किंमत १० रु.

# अवती-भवती : पृष्ठ ७ वरून

स्वत:ला 'नेहरू–समाजवादी म्हणवून घेत असत अर्थात या दोन अध्यक्षांमधील साम्य केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नव्हते. संजय आणि इंदिरा यांच्यावर स्तुतिसुमने उधळण्यात दोघाची चढाओढ चाललेली असे. आणीबाणीमधील अतिरेकी अत्याचाराबाबत आपण तक्रार केली होती असे दोघानीही पुढे सांगितले आणि निवडणुकानंतर दोघानीही आपले धोरण सोइस्कररीत्या बदलले. राजकारणापासून अलिप्त असलेल्या सुखासीन मंडळीपैकी अनेक अंबिकाबाईंच्या मित्र–परिवारामध्ये होते.' अबिकाबाई ज्या वेळी राजकारणामध्ये काम करू लागल्या त्या वेळी त्यापैकी 'अनेकांनी ओंगळ राजकीय क्षेत्रामध्ये कशाला नसत्या उठाठेवी करता ?' अशी विचारणाही त्याच्याकडे केली; पण अबिकाबाई काही निश्चित हेतूने काम करीत होत्या. सजयचा विश्वास संपादन केल्यावर तर त्यांची वाटचाल आणखीनच सोपी झाली. त्या वेळेपर्यंत ज्याच्याबद्दल विलक्षण धास्ती वाटावी असा जबरदस्त शक्तिशाली नेता म्हणून संजयचा उदय झालेला होता आणि अंबिकाबाई या अशा संजयच्या विश्वासामधील. मग काय ? ज्याना कोणाला सजयकडे जायचे असेल, त्याला अबिकाबाईंमार्फत संपर्क साधणे सुलभ जाऊ लागले. अबिकाबाई या नावाला वजन प्राप्त झाले. अनेक मुख्य मत्री उगवत्या ताऱ्यांशी सपर्क साधता यावा म्हणून अंबिकाबाईंशी परिचय वाढवू लागले. सजयचा संपूर्ण विश्वास संपादन केल्यावर संजय आणि चंद्रजित याच्यामध्ये सुसवाद निर्माण व्हावा म्हणून खटपटीस प्रारंभ केला. एकदा चर्चेच्या ओघात चंद्रजितचे नाव येताच संजय म्हणाला, 'कोण ? तो कम्युनिस्ट, त्याचा कधीच विचार करण्याचे कारण नाही !' पण अबिकाबाईंनी चिकाटी सोडली नाही. आपलाच मुद्दा पुढे रेटून त्या म्हणाल्या की, 'कम्युनिस्टांबरोबरील आपले सर्व सबंध त्यानी पूर्वीच तोडले आहेत आणि...' पण त्यांचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच संजय म्हणाला, 'एकदा कम्युनिस्ट... तो कायमचा कम्युनिस्ट !' परंतु एवढे होऊनही चद्रजित यादव याची रदबदली करण्याची एकही सधी बाईंनी सोडली नाही. परिणामी संजयच्या राजदरबारामध्ये चंद्रजितचा चचुप्रवेश झाला; परतु आपण सजयशी संपर्क साधून आहोत ही गोष्ट त्यांनी गुप्त ठेवली. युवक कांग्रेसचे कार्य व्यवस्थित चालावे यासाठी त्यांनी आपल्या परीने भरपूर खटपट केली. समाजवादी राष्ट्रांनी आपले प्रतिनिधी युवक कांग्रेसच्या अधिवेशनासाठी पाठवावेत यासाठी त्यांनी अनेक समाजवादी देशांच्या वकिलातीचे उबरठे झिजविले. गोहत्ती येथे युवक कांग्रेसच्या अधिवेशनासाठी नेतेमंडळीना नेण्यासाठी एक खास विमान जाणार होते. याच विमानातून चद्रजित युवककांग्रेसअध्यक्षा अंबिका सोनी आणि संजय यानी एकत्र प्रवास केला. ज्या अंबिका सोनी यांनी पुढे संजयचा 'घटनाबाह्य अधिकार बळकावणारा नेता' असा उल्लेख केला, त्याच अबिकाबाई गोहत्ती युवककांग्रेस– मेळाव्यामध्ये– सजयच्या मागे-मागे करीत होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये त्यानी तरुण पिढीच्या आशाआकांक्षाचे केंद्रस्थानी असलेला नेता, असा शब्दात सजयचा गौरव केला. युवककांग्रेसच्या चलतीच्या काळात या अध्यक्षाबाई विलक्षण तोऱ्यात वागत असत. ज्यानी या बाईंना १० जनपथ येथील युवककांग्रेसच्या प्रमुख कचेरीमध्ये पाहिले आहे त्यांना या बाईंच्या त्या वेळच्या घमेंडखोर वागणुकीची अजूनही चांगलीच आठवण आहे. संजयजीच्या चैतन्यशाली नेतृत्वाचा आणि पाचदशलक्ष सदस्य असलेल्या युवककांग्रेसमार्फत येऊ घातलेल्या क्रांतीचा बाई सतत उद्घोष करीत असत. अबिकाबाई त्या वेळी इतक्या आत्मविश्वासाने बोलत असत की आपले वाक्य हे अखेरचा शब्द आहे याबद्दल त्यांची स्वत:ची पूर्ण खात्री पटलेली असावी संजयजीच्या प्रयत्नांमुळे लोकसभेच्या किमान दोनशे जागासाठी युवककांग्रेसच्या नेत्यांची कांग्रेस उमेदवार म्हणून निवड होईल असा त्यांना विश्वास होता. गोहत्ती अधिवेशनामध्ये इंदिराजी सहजपणे म्हणाल्या की, 'आमच्यामधील जोष तुम्ही तरुण मडळीनी पळविला आहे' त्या वेळी अबिकाबाई विलक्षण सुखावल्या. आपल्या कामाची पंतप्रधानांनी पावतीच दिली असे समजून त्या आणखी झटून काम करू लागल्या. आज ना उद्या इंदिराजीच्या जागी आपण जाऊन बसणार असे तेव्हा सुखदायी वाटणारे विचारही त्याच्या मनात अनेक वेळा येऊन गेले. निवडणुका तोंडावर आल्या होत्या आणि झटून काम करणे अत्यंत आवश्यक होते. सजयच्या निवडणुकीमधील विजयाबरोबर बाईंचे भवितव्य बाधले गेले होते. कांग्रेसच्या विजयाबद्दल त्यांना फारशी शका नव्हती; परतु सजयच्या निवडणूकप्रचारासाठी म्हणून त्या जेव्हा बाहेर पडल्या तेव्हा त्याना बदलत्या हवेची पहिली झुळुक जाणवली. अमेठी येथील मतदारांच्या गाठीभेटी घेत त्या दारोदार हिंडल्या. आता मागे पाहात असताना त्यांना असे वाटते की लोक अस्वस्थ होते आणि निवडणुकीआधी पुरेसे भयभीतही झाले होते. मी मतांसाठी हिंडत असताना त्यांच्या डोळ्यात केव्हा एकदा ही ब्याद येथून जाईल असा भाव तरंगताना दिसत असे. केवळ युवककांग्रेसचाच नव्हे तर इंदिराजीच्या एकछत्री अमलाचा अखेरचा दिवस जवळ येत असल्याची पहिली जाणीव आपल्याला त्याच वेळी झाली असे त्या आता म्हणतात. त्या भावनेचा पाठपुरावा करणारे एक उदाहरणही त्यांनी दिले आहे. एक दिवस अंबिकाबाईंचा अनुप नावाचा नऊ वर्षांचा मुलगा शाळेतून परत आला आणि आल्याबरोबर त्याने घोषणा केली, 'आई ग, माझ्या वर्गातील सर्वजण जनतापक्षाला मते देणार आहेत !' आपल्या मुलाला त्यानी हसून सांगितले की, 'मुलांना मतेच नसतात !' त्या नऊ वर्षांच्या मुलाने आईच्या खुळचटपणाचा उपहास केला आणि तो म्हणाला, 'आई, मी काही माझ्या वर्गमित्राची गोष्ट करीत नाही आहे. त्यांचे आईवडील कुणाला मते देणार हे मी तुला सागतो आहे !'

ज्या दिवशी संजयने राजकारणनिवृत्तीची घोषणा केली त्याच्या दुसऱ्या दिवशी अंबिकाबाईंनी त्याची गाठ घेऊन आपण राजकारणात भाग घेणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान अबिकाबाई राज्य-

सभेच्या सदस्य झाल्या असल्याने तशी फारशी चिंता नव्हतीच. आज मागे वळून पाहताना बाई म्हणतात की, सार्वजनिक जीवनामध्ये तुम्हाला काम करायचे असेल, तर तुमचे चारित्र्य वादातीत पाहिजे. ते तसे नसेल तर ही जुनी भुतावळ तुम्हाला कोठे आणि कशी पकडील हे सांगता येणार नाही!

## पंजाबातले अकाली

पंजाबातले अकाली ही एक मोठीच राजकीय शक्ती आहे. अकाली या शब्दाचा अर्थ माहीत आहे? अकाली म्हणजे अमरपट्टा घेऊन आलेला. अकाली दलाच्या बाबतीत तरी हा अर्थ पुष्कळ मोठ्या प्रमाणात खरा ठरला आहे. आपल्या डोळ्यांसमोर माणसे बदलली. मास्टर तारासिंग होते ते जाऊन संत फत्तेसिंग आले. फत्तेसिंग जाऊन आता अन्य मंडळी आली आहेत. धार्मिक व्यासपीठावरून राजकीय सत्तास्थाने काबीज केलेल्या शिखांच्या या संघटनेचा रोचक तपशील दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'लिंक' या डाव्या विचारसरणीच्या इंग्रजी साप्ताहिकाने आपल्या ताज्या अंकामध्ये दिलेला आहे. अकाली दलाच्या १३ वर्षांनंतर झालेल्या निवडणुकामध्ये जथेदार *जगदेवसिंग तलवंडी याची जथेदार मोहनसिंग तूर याच्या जागी* अकाली दलाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली आहे संत फत्तेसिंग यानी मोहनसिंग तूर याची आपला वारसा चालविण्यासाठी निवड केली होती. अकाली दलाच्या एकंदर स्वरूपामध्ये गेल्या बारा वर्षांमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत.

१९६७ साली झालेल्या निवडणुकामध्ये कॉंग्रेस-विरोधक विजयी झाले. त्या वेळी सत्तेवर आलेल्या कॉंग्रेसविरोधी मंत्रिमंडळाचे नेतृत्व गुरुनामसिंग यानी केले. १९६७ ते १९७२ या कालखंडामध्ये अकाली दल जनसंघाच्या सहकार्याने अथवा बाहेरून मिळणाऱ्या कॉंग्रेसच्या पाठिंब्याने सतत सत्तेवर राहिले होते. आता अलीकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकानंतर पंजाबमध्ये प्रकाशसिंग बादल याच्या नेतृत्वाखालील अकाली—जनता पक्षाचे संयुक्त मंत्रिमंडळ सत्तेवर आले आहे. संपन्न शिखवर्गाकडे अकाली दलाचे नेतृत्व गेल्यामुळे अकालीदलाचा चेहरा—मोहराच बदलून गेला आहे. जवळजवळ १९६० पर्यंत जथेदार म्हणून ओळखले जाणाऱ्या अकाली कार्यकर्त्यांचे पक्षावर वर्चस्व होते. त्यानंतर ग्रामीण आणि शहरी भागामधील संपन्न शिखमंडळीचा गट जथेदार होऊन पक्षाचे कार्य करू लागला. स्वाभाविकपणेच प्रबळ धार्मिक श्रद्धाच्या विश्वासाने मिशनरी पद्धतीने पक्षाचे काम करणारे जथेदार आणि आधुनिक दृष्टी असलेले हे नवीन अनुयायी याच्यामध्ये संघर्षाची बीजे पेरली गेली आणि त्या वेळचे मुख्य मंत्री गुरुनामसिंग आणि संत फत्तेसिंग यांच्यामध्ये मतभेदाची वावटळ उठली. आज या पक्षाचे नेतृत्व मुख्य मंत्री प्रकाशसिंग बादल आणि गुरुद्वार प्रबंधक समितीचे अध्यक्ष गुरुचरणसिंग तोहरा याच्याकडे आहे दोघेही नेते आज एकमताने कारभार करीत आहेत. धर्म-कारण आणि राजकारण यशस्वीपणे करणारी अकाली-दल ही या देशामधील अशा स्वरूपाची एकमेव महत्त्वपूर्ण संघटना आहे. गुरुद्वारांचे राजकारण आणि सत्ताकारण परस्परांशी जखडून गेले असले तरी गुरुद्वारांच्या राजकारणामध्ये *ज्याचे वर्चस्व राहते त्याचाच शब्द सत्ताकारणाच्या* क्षेत्रात मानला जातो असा आजवरचा अनुभव आहे. मास्तर तारासिंग यांनी गुरुद्वाराच्या राजकारणामध्ये निर्विवाद स्थान प्रस्थापित करून अकाली दलाच्या राजकीय हालचाली निश्चित केल्या. ज्या वेळी गुरुद्वारांवरील त्याचे वर्चस्व संपुष्टात आले त्याच वेळी राजकीय क्षेत्रामधील त्याच्या वर्चस्वाला उतरती कळा लागली. त्यांच्या पराभवातूनच संत फत्तेसिंग याचा उदय झाला. धर्मगुरु म्हणून दोघांनाही मान्यता होती. दोघेही शिखांच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचे पूर्ण जाणकार होते आणि अतिशय साधी रहाणी हे दोघाचेही वैशिष्ट्य होते

आज शिखांचे जे नेतृत्व आहे त्याच्याजवळ शिखसमाजाची या दोघाना जशी मान्यता होती तशी मान्यता नाही आणि साध्या राहणीबाबत संत फत्तेसिंग आणि संत तारासिंग याचा कटाक्ष असे. आजचे अकाली दलाचे शीख नेते हे पथ्य सांभाळीत नाहीत. खरे सांगायचे तर ते जरी धार्मिक व्यासपीठाचा वापर करीत असले तरी ते खरे राजकारणीच आहेत आणि त्याच्या नेतृत्वाखाली शीख गुरुद्वारांना आज राजकारणाच्या आखाड्याचे स्वरूप आले आहे. धर्मभावनेने प्रभावित असलेल्या अनेक कडव्या शीख अनुयायांना हा बदल मानवत नाही. स्वाभाविकपणे धार्मिक वृत्तीच्या सर्वसाधारण *शिखांच्या मनामध्ये जुन्या नेत्यांना जे स्थान होते ते स्थान प्रकाशसिंग* बादल याना मिळू शकत नाही. गेल्या चारशे वर्षांमध्ये शीखसमाज विविध अवस्थांमधून गेला असला तरी प्रबळ धर्मभावना हा या समाजाचा स्थायीभाव फारसा बदलू शकला नाही आणि त्यामुळेच धर्माच्या व्यासपीठावरून राजकारण करणे सुलभ झाले. महाराजा रणजितसिंगच्या काळामध्ये शिखांना राजाश्रय मिळाला आणि महत्त्वाच्या गुरुद्वारांना खूप मोठी मालमत्ता दिली गेली. महाराजा रणजितसिंग याच्या निधनानंतर गुरुद्वारांचे व्यवस्थापन पुजाऱ्यांनी बळकाविले आणि या संपन्न धर्मपीठाचे मालक असल्याप्रमाणेच ते वागू लागले. या पुजाऱ्यानी आणि महंतानी ब्रिटिश साम्राज्याशी सतत मिळते-जुळते घेऊन गुरुद्वारे सुरक्षित राखली तरी शीख समाजाला त्याचे हे धोरण आवडले नाही आणि त्यातून गुरुद्वार-मुक्तीची चळवळ आकाराला आली आणि या चळवळीने उग्र स्वरूप धारण केल्याने इच्छा नसूनही ब्रिटिशाना नमते घ्यावे लागले. अकाली चळवळ धार्मिक स्वरूपाची असली तरी साम्राज्यशाही-विरोधी आणि लोकशाही स्वरूपाची असल्यामुळे कॉंग्रेसची या चळवळीला नेहमीच सहानुभूती लाभली. अकाली चळवळ यशस्वी ठरल्यावर महात्मा गांधी यांनी त्या वेळचे अकाली नेते सरदार खरकसिंग यांना अभिनंदनाची तार पाठविली. अकाली चळवळीने नाव घेण्यासारखे यश मिळविल्यानंतर बारा वर्षांनी अकालीच्या मूळ धोरणामध्ये फेरफार झाले. विशाल राष्ट्रीय दृष्टिकोन बाजूला पडला आणि वेगळेपणाची आणि जातीय वादाची भावना मूळ धरू लागली. क्रिप्स समितीसमोर अकाली दलाने आझाद पंजाबची मागणी केली होती. आझाद पंजाब या कल्पनेचे पुढे स्वतंत्र शिखिस्तान या कल्पनेमध्ये रूपांतर झाले. १९४५ साली मास्टर तारासिंग याचे प्रमुख सहाय्यक असलेल्या ग्यानी कर्तारसिंग यांनी स्वतंत्र शिखस्तानाचा पुरस्कार केला.

*स्वातंत्र्योत्तर काळात अकाली* नेते कॉंग्रेसमध्ये सामील झाले; परंतु ही दोस्ती दीर्घ काळ टिकू शकली नाही. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकी-

पूर्वीच त्यानी कर्तारसिंग यांच्या नेतृत्वाखाली एक गट काँग्रेस सोडून बाहेर पडला. पंजाबी सुभ्याच्या मागणीचा पुरस्कार करून अकाली दलाने १९५२ सालच्या निवडणुका लढविल्या; परंतु या निवडणुकीमध्ये अकाली दलाचा धुव्वा उडाला! पजाबी सुभ्याची आपली मागणी सोडून न देता अकालीदलाने जास्त जोर लावून प्रयत्न करण्यास प्रारंभ केला. शिखाची वाढती सहानुभूती मिळत असल्याचे लक्षात आल्यावर पजाबी सुभ्याच्या मागणीसाठी एक मोठा मोर्चाही काढण्यात आला. त्यानंतर झालेल्या वाटाघाटी यशस्वी ठरल्या असा आभास निर्माण झाला. अकालीदलाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये सहभागी व्हावे असे आदेश देण्यात आले भाषावार प्रात-रचनेचे तत्त्व मान्य केले गेल्याने पजाबी सुभ्याची मागणी सोडून देण्यात आली. मास्टर तारासिंग याच्या घरसोडवृत्तीचा, प्रतिक्रियावादी धोरणाचा आणि जातीय दृष्टिकोनाचा शीख समाजालाच काहीसा उबग आला आणि शीख समाजातील तरुण मंडळी संत फत्तेसिंग यांच्याभोवती जमा झाली. पजाबी सुभ्याच्या मागणीला जो एक जातीय वास येत होता तो तर नाहीसा व्हावा; परंतु वेगळ्या राज्याची कल्पना डावलली जाऊ नये अशा पद्धतीने संत फत्तेसिंग यानी धोरणाची फेरआखणी केली आणि मास्टर तारासिंग यांच्या विरोधात उभे राहून त्यांनी त्या वेळेपर्यंत शीख समाजामध्ये मान असलेल्या या नेत्याचा दारुण पराभव केला. संत फत्तेसिंग यांच्या नेतृत्वाला मान्यता मिळाल्यानतर अकाली दलाच्या धोरणामध्ये बदल करण्यात आले. संत फत्तेसिंग यानी जुनाट विचारसरणीला फाटा देऊन एक प्रगत विचाराचा पक्ष अशी अकाली दलाची प्रतिमा निर्माण करण्यात आणि अकाली दलाच्या चळवळीना शीखसमाजाचा पाठिंबा मिळविण्यात भरघोस यश संपादन केले. एक सामर्थ्यशाली प्रादेशिक पक्ष म्हणून अकाली दल उभे राहिले आणि १९६७ च्या निवडणुकामध्ये या पक्षाने नाव घेण्यासारखे यशही मिळविले. राजकीय सत्ता मिळताच अकाली दलामधील शहरी आणि ग्रामीण भागामधील नेत्यांमध्ये संघर्ष सुरू झाला. दोन्ही गटांचे नेते आपल्या हितसबंधाचे रक्षण व्हावे यासाठी झटू लागले. सत फत्तेसिंग यांनीही प्रगत विचाराचा बुरखा फेकून देऊन आपले खरे स्वरूप प्रगट करण्यास प्रारभ केला. अकाली दलामधील अतर्गत सघर्ष चांगलाच उफाळून वर आला लछमनसिंग गिल आणि गुरुनामसिंग या अकाली दलाच्या दोन्ही मुख्य मत्र्यांनी संत फत्तेसिंगाविरुद्ध आवाज उठविला. सत फत्तेसिंग यांचे खरे स्वरूप स्पष्ट होताच त्यांच्याही लोकप्रियतेला ओहोटी लागली आणि त्यांच्या हयातीतच शिखसमाजामधील आपली घसरती प्रतिमा पाहण्याचे दुर्भाग्य त्यांच्या वाट्याला आले! त्याचे अनेक सहकारी त्यांची साथ करीत होते; परंतु त्यांना सत फत्तेसिंग यांची धोरणे मान्य नव्हती आणि खाजगी चर्चेमध्ये त्यांपैकी अनेक, गुरुनामसिंग संत फत्तेसिंग याच्याबद्दल जेवढ्या कडवटपणे बोलत त्यापेक्षा जास्त कडवटपणे बोलत असत. पक्षांतर्गत संघर्षातून काही फुटीर गट निर्माण झाले; परंतु त्याचा जाणविण्यासारखा प्रभाव कधीच पडला नाही. गुरुद्वारावर ज्या गटाचे वर्चस्व होते त्याचे स्थान तसे अबाधितच होते. शिखाचे गुरुद्वार म्हणजे केवळ देऊळ नव्हे! ते एक सामाजिक चळवळीचे केंद्र असून राजकीय सत्तेची बीजेही याच धर्मस्थानामध्ये केंद्रीभूत झालेली दिसतात. शिखाचे १०० वे गुरु गोविंदसिंग यानी गुरुद्वारांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालावा यासाठी खटपट केली. गोविंदसिंगानतर गुरूची प्रथाही बंद पडली आणि समाजाच्या हिताचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी गुरु गोविंदसिंग यानी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुरुद्वारांचा वापर होऊ लागला. १९२५ साली कायदा करून गुरुद्वारांचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी शिखसमाजावर सोपविण्यात आली. प्रारंभी खरकसिंग यांच्या नेतृत्वाखाली काम करणारा एक गट, तारासिंग यांच्या नेतृत्वाला मानणारा एक गट आणि राष्ट्रीय विचाराने प्रेरित झालेल्या काँग्रेसमधील अनुयायांचा एक गट असे तीन गट गुरुद्वाराचे व्यवस्थापन करीत असत. गुरुद्वारप्रबधक समितीमध्ये या तिघांनाही प्रतिनिधित्व होते आणि साठ सालापर्यंत गुरुद्वाराच्या व्यवस्थापनामध्ये इतर विचारांची मंडळी दिसत असत; परंतु आस्ते आस्ते इतर मडळीना बाजूला काढून धर्मभावनेने प्रेरित झालेल्या अकाली दलाने प्रबंधक समितीवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आणि धार्मिक सत्तेमध्ये एकाधिकार प्राप्त झाल्यावर त्याच सामर्थ्याचा वापर करून राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे राजकारण अकाली दलाने यशस्वी करून दाखविले. गुरुद्वार प्रबंधक समितीचे वार्षिक उत्पन्न तीन कोटी रुपये आहे. या रकमेचा अर्थातच राजकीय कारणासाठीही भरपूर वापर सुरू झाला. असख्य पगारी कार्यकर्ते नेमले गेले आणि प्रबळ राष्ट्रीय पक्षांना बाजूला सारून पंजाबमधील सत्ता हस्तगत करण्यात अकाली दलाला यश आले. विधानसभा निवडणुकीच्या वेळी समता अकाली दलाचे आणि जनता पक्षाचे जमले नसते तर अकालीचे मोठे अडले असते असे नव्हे. बंगालमध्ये जनता पक्षाशी टक्कर घेऊन डावे कम्युनिस्ट सत्तेवर आले त्याचप्रमाणे पजाबमध्ये अकाली दलाने आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले असते. तथापि जनता पक्षाने तडजोडीचे धोरण स्वीकारल्याने बादल-मत्रिमडळामध्ये जनता पक्षाचे किमान दोन-चार तरी चेहरे दिसत आहेत. अकाली दलाने धर्मकारण आणि राजकारण हे कसे एकरूप करून टाकले आहे याचे उत्तम उदाहरण म्हणून गुरुचरणसिंग तोहरा यांच्याकडे बोट दाखविता येईल. ते गुरुद्वारसमितीचे अध्यक्ष आणि लोकसभेमधील अकाली-दलाचे नेतृत्वही त्यांच्याकडेच आहे. □

प्रेक्षकांच्या भरघोस उत्साहात पार पडलेल्या
आणि परीक्षकांच्या वादग्रस्त निर्णयाने चर्चेत गाजत असलेल्या

**पुण्याच्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धा**

**माणूस : पुढील अंकी**

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# पॉइंट ब्लँक

## फार दिवसांनी नवे काही तरी

पुणेकर आणि प्रायोगिक रंगभूमी.

हा काही गणेशोत्सवातल्या एखाद्या भाषणाचा किंवा परिसंवादाचा विषय नव्हे. मुंबईच्या 'अभिव्यक्ती' या प्रायोगिक नाट्यसंस्थेच्या एक सूत्रधार रेखा सबनीस यांची अलीकडेच गाठ पडली तेव्हा झालेल्या दिलखुलास चर्चेतला हा एक मुद्दा होता.

आणि चर्चेचा योग आला तो दोन प्रायोगिक नाट्यप्रयोगांच्या निमित्तानं. 'पॉइंट ब्लँक' या दिलीप खाडेकर लिखित आणि अच्युत देशिंगकर दिग्दर्शित नाटकाचा आणि 'नो एक्झिट' या 'अभिव्यक्तीच्या'च नव्या नाटकाचा (याच्याबद्दल वेगळं लिहिलेलं आहेच. याच अंकात इतरत्र.) पुण्यातील पहिला प्रयोग नुकताच होऊन गेला. अर्थात 'पॉइंट ब्लँक'चा हा पुण्यातला पहिलाच प्रयोग असला तरी प्रत्यक्षात तो एकूणात तिसावा प्रयोग होता.

चर्चेचा मुद्दा असं मागं म्हटलं तो हाच.

पुण्यात प्रायोगिक नाटकं फार कमी होतात. जवळजवळ नाहीपैकीच असं का असावं?

पुणेकरांना काय आधुनिक नाटकातलं काही कळत नाही?

का इंटरेस्ट वाटत नाही? आस्था नाही?

का नावीन्याची, नव्या प्रयोगाची हौस/गरज वाटत नाही? की जोमानं उभी राहात असलेली ही चळवळ वाढावी असं त्यांना वाटत नाही?

खरोखरच मुंबईत ही चळवळ भलत्या झपाट्यानं मूळ धरून राहिली आहे. मूळच का नवी पालवी फुटायची तयारी सुरू झाली.

प्रायोगिक नाटकासाठीच सुरुवातीला भीत भीत आणि अनेक अडचणी, नुकसान सोसून सुरू केलेलं छबिलदास हायस्कूलमधलं मिनिथिएटर आज धडाक्यानं चालतंय. बारा-पंधरा प्रायोगिक नाट्यसंस्था तिथं हिरीरीनं प्रयोग करतायत. रोज संध्याकाळी व रात्री असे दोन खेळही घ्यावे लागतात. तारखा मिळायला अवघड जातं वगैरे.

प्रेक्षकवर्गाचा प्रतिसादही उदंड.

छबिलदास नाट्यगृहाचं आता चांगलं वळण पडलंय.

त्याच्या यशातून प्रेरणा घेऊन असंच आणखी एक मिनिथिएटर, इन्टिमेट थिएटर उभं करायच्या योजना चालल्यायत.

मुंबईत हे असं तर पुण्यात अंधार का?

प्रायोगिक रंगभूमीच्या चळवळीच्या आवश्यकतेबद्दल तर दुमत नाही ना?

मग स्थानिक प्रमाणावरही पुरेसे प्रयोग का होऊ नयेत?

महाराष्ट्रीय कलोपासक, पी. डी. ए., थिएटर ॲकॅडमी, रंगदीप, भरत नाट्य संशोधन मंदिर—नाट्यसंस्थांची यादी पुष्कळ लांबविता येईल; पण त्यानंतर निव्वळ हौशी आणि स्पर्धात्मक नाट्य-प्रयत्न जरा बाजूला ठेवले तर प्रयोगाखातर प्रयोगाचं प्रमाण काय पडेल? किंवा हे दोन नाट्य-प्रयत्न जमेला धरूनही ते कितपत समाधानकारक ठरेल?

उत्तर राखून ठेवलेलेच बरे. ज्याचे त्याने पारखून घ्यावे.

बाहेरून (म्हणजे पुन्हा मुंबईतूनच) प्रायोगिकतेची आयात करता येणार नाही काय?

येईल; पण तिथे आर्थिक अडचणी आडव्या येतात. मुंबई-पुणे भाडेखर्च व इथला प्रयोग-खर्च करून एखादं प्रायोगिक नाटक करावं तर मुद्दलासकट साफ बुडण्याची भीती. कारण प्रेक्षकांचा काहीच भरवसा देता येत नाही!

तो का नाही? तर पुण्यात प्रायोगिक नाटकंच पुरेशी होत नाहीत म्हणून भरपूर प्रेक्षकवर्ग नाही, विश्वासार्ह—कायमचा—हमखास येणारा प्रायोगिक चळवळीचा चाहतावर्ग पुरेसा निर्माण झालेला नाही.

(थोडक्यात, वळण पडलेलं नाही.)

आणि असा मोठा आश्रयदातावर्ग नाही म्हणून प्रायोगिक नाटकं होत नाहीत.

(वळण पडत नाही), असं हे दुष्टचक्र.

हे दुष्टचक्र भेदण्याचे उपाय थिअरीमध्ये तरी बरेच आहेत उदाहरणार्थ, एखाद-दुसऱ्या बऱ्या स्थितीतल्या प्रायोगिक नाट्यसंस्थेने सुरुवातीला थोडा तोटा सोसून आपला प्रेक्षकवर्ग स्वतः निर्माण करायची तयारी दाखविणं.

इथल्या संपन्न संस्थांनी एकत्र येऊन चांगले प्रायोगिक नाट्यप्रयोग स्पॉन्सर करणं, अंशतः आर्थिक जबाबदारी घेऊन.

आणि अर्थातच सुबुद्ध प्रेक्षकांनीही या नव्या अंकुराकडे पाठ फिरवणं. वगैरे.

या थिअरीवरचं एक प्रॅक्टिकल मुंबईच्या 'अभिव्यक्ती'नं पुण्यात नुकतंच करून पाहिलं 'पॉइंट ब्लँक' व 'नो एक्झिट'च्या द्वारे.

'पॉइंट ब्लँक' ही (शेवट वगळता) मूळची एक सत्यकथा. एका वृत्तपत्रीय बातमीत कल्पना ओतून दिलीप खाडेकर यांनी बनवलेलं रसायन.

ऑलिव्हियाच्या वर्चस्वाखाली अंशतः स्वातंत्र्य मिळालेलं राष्ट्र गोंदोलँड. सरकार ऑलिव्हियाच्या चमच्याचं बनलेलं, पण संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढणारी एक गनिमी संघटना. तिचा एक बॉस.

विमानतळावरून ही संघटना एका ऑलिव्हियन शिक्षिकेला पळवून आपल्या तळावर आणते. चक्क किडनॅप वगैरे. ओलीस म्हणून. ती शिक्षिकाही आयुष्यात सुखी नाहीच. नवऱ्यापासून घटस्फोट घेऊन निघालेली.

ती चिडते, रडते. मग प्रतिकार करते. विनवण्या करते. तो प्रकार सगळा तटबंदीवर डोकं आपटल्यापैकी.

अर्थात तसं तिला बऱ्याच चांगल्या प्रकारे वागवलं जातं म्हणजे सौम्यतेनं नाही, तरी सभ्यतेनं.

मग तिच्या बदल्यात ऑलिव्हियाकडे मागण्या. सौदेबाजी. दोन्ही बाजू आपापल्या पवित्र्यावर अढळ आणि मरणाच्या टांगत्या

तलवारीखाली तिच्या आयुष्याची असहाय कुतरओढ. तीही अनिश्चित काळपर्यंत. ती एक क्षुद्र प्यादं. सौद्याच्या राजकारणाच्या पटावरचं. जीव आपला, पण मालकी दुसऱ्याची.

बॉसच्या आणि तिच्या सतत चकमकी. आपल्यावरची बंधनं मानायला तिचा वारंवार साफ नकार. त्यातून संघर्ष. अगतिक चिडचीड. कधी किरकोळ विजय.

तिच्याबद्दल सहानुभूती बाळगणारा आणि तिच्याच देशाचा, पण गनिमांच्या गोटात वावरणारा एक पत्रकार. मग तिच्यावर एक फिल्म करून ती ऑलिव्हियन टी. व्ही. वर दाखवायची व्यवस्था वगैरे. इकडे दोन देशांत तणाव. वाटाघाटीचा दरबारी तमाशा निष्फळ पण यथास्थित.

'या राजकारणाशी माझा काय संबंध ? तुमच्यॉ या गलिच्छ खेळात माझाच बळी का ?' असा तिचा दुबळा आणि पुनरावृत्त पण अनुत्तरित सवाल.

एका डेस्परेट क्षणी तिची सर्वस्व द्यायची तयारी; पण पुरुष बॉसला तिच्या मनात इंटरेस्ट नाही तसाच शरीरातही. अटॅचमेंट असलीच तरी नगण्य. त्याला तिच्या प्राणांची बाजी लावून केलेल्या मागण्याची पूर्तता तरी हवी असते,

किंवा तिचे प्राण तरी. त्यापेक्षा कमी–जास्त काही नाही.

शेवटी ऑलिव्हियन सरकार वाकत, झुकत, नमत नाही. मागण्या मान्य करीत नाही. एकट्या ओलीस बाईच्या जिवाखातर अख्ख्या गोदोलॅंडचा घास टाकणं त्यांच्या राजकारणाच्या हिशेबात बसत नसतं.

दिलेली मुदत संपते.

ती ही संपते.

'पॉइंट ब्लॅंक'ची कथाकल्पना ही अशी आहे. हेही एक समूह-नाट्य आहे. महत्त्वाची पात्रे अर्थातच ती शिक्षिका (मीनल पेंडसे), बॉसची एक हस्तक (रेखा सबनीस) आणि बॉस व पत्रकार. (त्यांची नावं मला माहीत असायला हवी होती.)

चौघेही आपापल्या ठिकाणी चोख मीनल पेंडसे यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय. एका सावकाश होरपळत जाणाऱ्या जिवाच्या यातना त्यांनी प्रभावी मुद्राभिनयाला पुरेशा आंगिक अभिनयाची जोड देऊन प्रेक्षकांपर्यंत उत्तम पोचविल्या. बॉसचा संयमी अभिनयही अभिनंदनीय. एरवी ही भूमिका भडक (आणि हास्यास्पद) करायला खूप वाव होता. नाटकाच्या अखेरीस एकदा दोघेही गमतीखातर आपापल्या भूमिका बदलतात, तो प्रसंग दोघांच्याही पर्फेक्ट बेअरिंगमुळे झकास वठला.

एकंदरीतच प्रेक्षकांपर्यंत पूर्णपणे पोचलेलं हे एक उल्लेखनीय प्रायोगिक नाटक म्हटलं पाहिजे कारण कदाचित् त्यामुळेच याची समूहनाट्याची पार्श्वभूमी, एखादा formalistic experiment करायचा म्हणून त्याच्यावर लादण्यासारखी वाटली नाही. एरवी ड्रील, समूह-दृश्यं आता बोअर व्हायला लागलीत.

अच्युत देशिंगकर यांचं दिग्दर्शनही संहितेशी व कथावस्तूशी प्रामाणिक, तिच्या आशयघनतेशी सुसंगत. आटोपशीर. बंदिस्त. अघळपघळ मोठेपणा (त्यांच्या वागण्यात दिसला, सुखद वाटला तरी) त्यात नाही. मात्र नाटकाचा एरवीचा फास्ट टॅंपो क्वचित कुठे तरी (उदा. नाटकाच्या शेवटापाशी) कमी पडला तर कंटाळा यायची शक्यता.

दिलीप खांडेकरांचं लेखन (म्हणजे इथे मुख्यत: संवादच) या कथावस्तूला हवेत तसेच सरळसोट, अनलंकृत आणि पाल्हाळ नसणारे, (कदाचित म्हणूनच) ठाशीव व परिणामकारक.

राष्ट्रा-राष्ट्रांच्या सत्तेच्या राजकारणात व्यक्तीचं होणारं शोषण, व्यक्तीवरील अन्याय–जुलूम यांची कहाणी निर्भीडपणे मांडणारं हे नाटक आणीबाणीतच उभं राहिलं आणि चाललं.

नवल आहेही आणि नाहीही.

पण यथावकाश ते शासनाच्या डोळ्यांवर आलं असावं. क्षुल्लक तांत्रिक अडचणी काढून नाट्यप्रयोग होऊ न द्यायचं तंत्र पोलीसांनी स्वीकारलं. 'ही भलती घोरपड आपल्या गळ्यात नको' असं म्हणून वागळे हायस्कूलनं प्रयोगासाठी दिलेला आपला हॉल 'अभिव्यक्ती'कडून काढून घेतला आणि एक संभाव्य मिनिथिएटर उभं राहण्यापूर्वीच मोडलं.

'पॉइंट ब्लॅंक'ला असा त्रास व्हावा याचं नवल वाटलं नाही. नाटकात उघडउघड लोकशाहीवादी पवित्रा आहे, निवडणुकीच्या मागणीच्या घोषणा आहेत, मूलभूत व्यक्तिगत हक्काची तरफदारी आहे, राज्ययंत्रणेकडून होणाऱ्या व्यक्तीच्या शोषणाचा निषेध आहे. शिवाय हे सगळं एकदम, directly, तडक आणि कडकपणे मांडलय.'

असो. 'पॉइंट ब्लॅंक' सर्वगुणसंपन्न किंवा पूर्ण निर्दोष असल्याचा माझा दावा नाही. कुणाचाच नसावा. जरूर तर (व तेव्हा) त्यातल्या दोषांचीही चिकित्सा करता येईल.

सध्या एवढंच पुरे आहे की ही मंडळी नाटकाशी प्रामाणिक आहेत. प्रायोगिकतेच्या चळवळीशी असलेली त्यांची निष्ठा अस्सल आहे. म्हणूनच त्यांच्या अपयशातही ती कित्येक व्यावसायिकांपेक्षा अधिक यशस्वी ठरतात.

त्यांचं आणि त्यांच्या हातून रंगभूमीचं भलं व्हावं !

*

# नो एक्झिट

## अपुरी अभिव्यक्ती

अरविंद भोमे

ज्यॉ पॉल सार्त्र ह्या वडील इसमाचं Huis Clos (म्हणजे मला वाटतं Vicious Circle) ह्या नावाचं फ्रेंच नाटक. त्याचा In Camera हा इंग्लिश अनुवाद वाचला होता. त्याच नाटकाचा कु. रेखा सबनीसनं केलेला No Exit हा मराठी अनुवाद. एकंदरीत नाटकाचा अनुवाद पुरेसा चांगला आहे; पण 'अमृतझरा', 'हिरकणी' असे बोली भाषेच्या बाहेरचे (non colloquial) शब्द सहज टाळता आले असते–कृत्रिमपणा कमी होण्यास मदत झाली असती.

पात्रं तीन. एक पत्रकार, एक पोस्टातली क्लार्क आणि एस्थेल ही फटाकडी सुन्दर युवती. या तिघांना एका जुनाट हॉलमध्ये कोंडलेलं. शिवाय देखरेख करणारा Porter. तिघंही जीवनात हारलेले, आपापल्या विवेकाची–कॉन्शन्सची बोचणी घेऊन वावरणारे. त्यांचं हे after-death life–मरणोत्तर जीवन. त्या बोचणीमुळं आपला

खूप छळ होणार असं वाटणारे. पण प्रत्यक्ष torturer–यातनाकार कुणीच नाही. खरं तर हेच एकमेकांचे यातनाकार. नाटकभर एकमेकाची चिरफाड करतात, तेव्हा ही जाणीव त्यांना असतेच. आपण एकमेकांचा छळ केला, करणार हे यातनाकाराला माहीत आहे, अपेक्षित आहे आणि यातून आपली सुटका नाही हे शेवटी समजतं तेव्हा सगळे डेस्परेटली हसतात. पुन्हा खेळ सुरू करू असं म्हणतात आणि नाटक संपतं.

आता ही पात्रं एकमेकाचे यातनाकार खरं की त्यापेक्षा जास्त म्हणजे तें . एकमेकाचे कॉन्शान्स आहेत–सदसद्विवेकबुद्धी ( किंवा–द्वया ) आहेत ? आणि असा abstract level नं अर्थ लावला तर मधूनमधून होणाऱ्या after death life च्या किंवा त्यांच्या मरणाच्या उल्लेखाचं काय ? – ह्या आणि अशा इतर वादात पडता येईल; पण ही ती जागा नव्हे.

खटकणाऱ्या गोष्टी अनेक. पत्रकार ( शंकर नाग ) ह्याचा मेक–अप्, कॉस्च्यूमस्. माझ्या मते तो जास्त वय झालेला दिसायला हवा. दुसरी जास्त महत्त्वाची गोष्ट, ह्या माणसाचे looks bold असले तरी आवाज फारच कृत्रिम, 'लावलेला' वाटत होता. आवाज 'लावायला' हरकत नाही; पण त्यानं सगळं संभाषणच कृत्रिम वाटत असेल तर ? ह्या पत्रकाराला एक tic असते–चेहरा वाकडा करण्याची सवय. मेडिकल सायन्सेसप्रमाणे ही गोष्ट मनोविकृतीचं द्योतक असू शकेल. शंकर नाग जी tic चेहऱ्यावर दाखवतात ही सहज, कारण नसताना, सवय ( Habit Spasm ) म्हणून येणारी वाटत नाही. पोर्टर झालेले रामनाथ थरवळ जास्त इस्तरलेल्या चेहऱ्यानं काम करू शकले असते तर ती भूमिका विनोदी वाटली नसती. ( असो. ) त्या भूमिकेला जो एक विशिष्ट त्रयस्थ अर्थ अभिप्रेत आहे तो कुठेही उतरला नाही. रेखा सबनीस–पोस्टल क्लार्क–मुळात पुरेशी कुरूप दिसणं आवश्यक आहे. हिचीही संवादाची फेक ( शेवटचा अपवाद वगळता ) फारशी प्रभावी वाटली नाही. शेवटी एस्चेल आणि तो पत्रकार जेव्हा रोमान्स सुरू करतात तेव्हा सबनीस प्रभाव दाखवू शकली असती. तिची एक्साइटमेंट व तिने चालविलेल्या टकळीला शंकर नागचा रिस्पॉन्स फारच कमी पडला फटाकडी एस्चेल–मीनल पेंडसे हिनं नाटकाचा टेंपो बराच राखला. इतर तिघांच्या मानानं हिचं काम बरंच निर्दोष वाटलं हे खरं. ( पुण्यातही ) प्रायोगिक नाटकं फॅशन म्हणून पाहू लागलेल्या काही प्रेक्षकांनी तिला अवास्तव दाद दिली. असो. तोही आपला विषय नाही, वगैरे वगैरे.

विषय महत्त्वाचा आहे तो सार्त्रनं जे माडलंय, ते उतरतंय की नाही ह्याचा. उत्तर अर्थात्– 'नाही' – निदान 'पुरेसं नाही.' शेवटी सगळे डेस्परेटली जे हसतात ते पुरेसं रजिस्टर होत नाही, फारसं डेस्परेटही वाटत नाही आणि त्यानंतरचा एक जो अस्वस्थ– ( Dead Pause ) – जो नाटकाच्या एकदर प्रवाहालाच कलाटणी देतो– आणि त्यानंतर येणाऱ्या 'पुन्हा नव्यान सुरू करू या' या वाक्याला विशिष्ट खोली देतो– हा पॉज्सुद्धा अति प्रभावहीन झाला. हे फार महत्त्वाच आहे असं नक्कीच वाटतं.

बाकी सगळं अर्थात् 'निर्दोष' – शंकर नागची वेषभूषा थोडी विचित्र वाटते. एस्चेलनंही ओढणीऐवजी पाश्चात्य स्टाइलचो लाबलचक कॉलर वापरली असती तर जास्त चागलं झाल असतं. एकंदरीत मुव्हमेंटस् कमी पडल्या–त्यामुळे कृत्रिमता वाढली असं मला वाटत. प्रकाश वगैरे ठीक.

सारांश, अनुवाद पुरेसा चांगला होऊनही टोटल इफेक्ट कमीच. आधी उल्लेखिलेल्या abstract level वर नाटक जाऊ शकेल की नाही हा भाग निराळा; पण तसं पुसट चिन्हही या प्रयोगात जाणवलं नाही हे अपयश नक्कीच. कृत्रिमता हा मुख्य दोष. मत अर्थात् वैयक्तिक. पूर्वग्रह नाही. चुका सार्त्रच्या, क्रेडिट आमचं असं कुणी म्हणणार नाही, म्हणू नये ही अपेक्षा. *

---

हिंदी चित्रपट

# ड्रीम गर्ल

## स्वप्नसुंदरीची परेड

---

वेळ जात नव्हता आणि दुसरा उद्योग नव्हता म्हणूनच ड्रीम गर्ल पाहायला गेलो, तेव्हा त्याच्याबद्दल तक्रार करण्यात किंवा त्याला नावं ठेवण्यात फारसा पॉइंट नाही. आणि इतक्या थातुरमातुर धंदेवाईक सिनेमाबद्दल आपली फारशी तक्रार नसतेही त्यातून 'ड्रीम गर्ल'चे दिग्दर्शक चक्कीभाई याने प्रमोद चक्रवर्ती. हे गृहस्थ धंद्याचे जातिवंत आणि निष्ठावंत पाईक. 'प्राण जाये पर धंदा न जाये' अशा काही तरी जिगरीचे यांची एक खासियत म्हणजे यांच्या बऱ्याचशा सिनेमात परदेशदर्शनाशिवाय पान हलत नाही. 'बारूद' हे लेटेस्ट आणि ज्वलंत वगैरे उदाहरण. त्या सिनेमाचं तर ब्रीदच 'दुनिया की सैर कर लो' असल्या धर्तीचं होतं. 'ड्रीम गर्ल'मध्ये त्यांना तेवढा स्कोप (आणि कदाचित बजेट) मिळाला नसला तरी एका गाण्याच्या निमित्ताने, स्वप्नसुंदरीला पडलेले स्वप्न वगैरे म्हणून त्यांनी अमेरिकेतल्या डिस्नेलँडचं मनोवेधक, दिलखेचक इत्यादी सुभगदर्शन घडवलेलं आहे. हेमामालिनीही पाच-सात पोरांना तोडी लावण्यासारखी घेऊन या डिस्नेलँडमधून बागडली आहे. अर्थात ती ड्रीम गर्ल असली तरी लोकांचं लक्ष तिच्यापेक्षा डिस्नेलँडच्या नानाविध जादू–खेळामध्येच जास्त असतं तो मुद्दा अलाहिदा. एकाच वेळी आई–बापांना आणि पोरांनाही झुलवण्याची ही चक्कीभाईछाप युक्ती मोठी नामीच म्हटली पाहिजे.

तर हा 'ड्रीम गर्ल' असा मोठा मजेदार सिनेमा आहे. त्याच्या निर्मात्यांपैकी एक जया चक्रवर्ती. म्हणजे हेमाची अम्मा. दुसरे आय्. के. बहल म्हणजे हेमाचे सेक्रेटरी तेव्हा ड्रीम गर्ल ही हेमामालिनीची फॅशन परेड झाली आहे असा अंदाज कुणी केला तर तो फारसा चुकीचा ठरणार नाही असं वाटतं. सिनेमाभर हेमाला दोन एक डझन तऱ्हांच्या केश-वेषभूषेत हिंडवल आहे. त्याला शोभतीलसे भव्य खर्चिक सेट्स् उधळमाधळ वगैरेची पर्वा न करता उभारलेले आहेत. एवढं पुरणार नाही म्हणून तिला अनाथाश्रम चालविण्यापासून चोऱ्यामाऱ्यांपर्यंत नाना प्रकारची मनोरंजक कामे फावल्या वेळात करायला लावली आहेत. त्यातली अनाथाश्रमाची मध्यवर्ती कल्पना शम्मीकपूरच्या 'ब्रह्मचारी' या गाजलेल्या चित्रपटावरून चोरली आहे.

'ड्रीम गर्ल'मध्ये अजिबात नाहीत अशा गोष्टी फार थोड्या सापडतील. एक मात्र आहे– धर्मेंद्र–हेमा जोडी जमेल आणि काहीतरी हॉट रोमान्स पाहायला मिळेल अशा अपेक्षेनं आलेला प्रेक्षक हमखास चुकतो आणि वैतागतो. प्रमोदभाई हा एक महत्त्वाचा घटक कसा विसरले राम जाणे. अर्थात असे मुद्दाम किंवा चुकून घडले– घडविलेले घोटाळे आणि विनोदही 'ड्रीम गर्ल'मध्ये कमी नाहीत. 'ड्रीम गर्ल' म्हणजे काही फक्त स्वप्नसुंदरी नव्हे. 'ड्रीम गर्ल'चा अर्थ आहे दीनदुबळ्यांना आसरा देणारी, म्हाताऱ्यांना, दलितांना सहारा देणारी' अशी एक अती अजब व्याख्या अशोककुमार चित्रपटाच्या अखेरीस धर्मेंद्रला सागतो. हा आपल्याला सर्वांत आवडलेला जोक ! □

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'स्थिर' शासनामुळे महाराष्ट्रात सहकारी कारखानदारी वाढली. निवडक ग्रामीण भागाला भरभराट आली.

यशवंतरावजींच्या रसिकतेमुळे साहित्य-संगीत-नाटयादी क्षेत्रातही त्यांना मान्यता लाभली.

वेगळ्या अर्थाने हे झाले केवळ ' गोब्राह्मणप्रतिपालन '

# पण

नवमहाराष्ट्राचे नवशिवाजी ठरायचे तर एवढेच वैशिष्टय कसे पुरे पडणार ?
शिवाजीमहाराज होते ' क्षत्रियकुलावतंस . . . '
आयुष्यभर लढले आणि शेवटची फक्त सहा वर्षे त्यांना छत्रपतीपद लाभले.

प्रतीशिवाजी म्हणून पुढे आलेल्या यशवंतरावजींच्या बाबतीत मात्र
नेमका उलटा प्रकार घडला.

' सत्तापद टिकवणे ' हेच एकमात्र उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवल्याने, शिवाजी-टिळक या लढाऊ मराठी परंपरेचा वारसा त्यांनी सोडून दिल्याने, महाराष्ट्राच्या सीमेबाहेर, इतर प्रांतांत, सर्व देशात हे नेतृत्व झेपावले नाही, स्फूर्तिप्रद ठरू शकले नाही.

कृष्णा-कोयनेचा परिसर हीच

# ' गोब्राह्मणप्रतिपालक ' यशवंतराव चव्हाण

यांच्या नेतृत्वाची आजवरची मर्यादा ठरत राहिली.

आणि आता यशवंतराव चव्हाण म्हणत आहेत. . . . .
' मी आक्रमक धोरण स्वीकारणार ' . . . . वगैरे.

हे शक्य आहे काय ?
यशवंतराव चव्हाण यांच्या ' अनाक्रमक ' राजकारणाचा मागोवा घेणारा

# माणूस

# कृष्णा - कोयना विशेषांक

प्रसिद्धी : १ ऑक्टोबर.

किंमत : ( अंदाजे सव्वा रुपया )

अधिक तपशील पुढील अंकी.

' रायबरेली अंक ' कमी पडला. तेव्हा विक्रेत्यांनी आपल्या मागण्या त्वरित नोंदवाव्यात.